सप्टेंबर २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## घर तुमचे आमचे

## घर हक्काचे...

# महाराष्ट्र गौरव गीत

गिरिकंदरी
अन् सागरी
सह्याद्रीच्या
तू शिखरांवरी

तू नर्मदा
गोदावरी
लोणार तू
तू अंबाझरी

हृदयात तू प्राणात तू
अन् वाहशी रक्तात तू
प्रत्येक या श्वासात तू
वंदन तुला गे महाभूमी

इतिहास भव्य जरी
वेध तुज भविष्याचा
शब्द वाट दाखवतो
तुकयाचा - ज्ञानेशाचा

चौसष्ठ कला नांदती
त्यात लावणी देखणी
आदिवासी नाच रंगे
सातपुड्याच्या अंगणी



शिवबांच्या मावळ्यांचे
रक्त जिथे सांडले
अबीर-गुलाल आम्ही
स्वराज्याचे उधळले

हृदयात तू प्राणात तू
अन् वाहशी रक्तात तू
प्रत्येक या श्वासात तू
वंदन तुला गे महाभूमी

फुले शाहू आंबेडकर
क्रांतिकारी प्रबोधन
गाडगे बाबांचा झाडू
झाडतो तुझे अंगण

सर्व धर्मांचा संगम
तुझ्या ठायी गं जाहला
सागरात ओघ जसा
नद्यांचा विसावला

विठूरायाच्या नामात
सुख दुःख विसरतो
वारीमध्ये आम्हा फक्त
पांडुरंग आठवतो

हृदयात तू प्राणात तू
अन् वाहशी रक्तात तू
प्रत्येक या श्वासात तू
वंदन तुला गे महाभूमी



संकटे आली जरी
तरी धाडसाने परतवू
सामर्थ्य या मातीतले
काळास आम्ही दाखवू

माती तुझी संजीवनी
लावू टिळा भाळी तिचा
अन् उमटवू काळावरी
आम्ही ठसा तव किर्तीचा

होतो पुढे, आहो पुढे
राहू पुढे जगतामध्ये
तव शक्तीचे झडवू पुन्हा
चौघडे विश्वामध्ये

घुमवू पुन्हा
दाही दिशांतून
शिवप्रतापी गर्जना
ही आण आम्हा मातीची
महाराष्ट्र हा बनवू महा

- डॉ. दिलीप पांढरपट्टे

महाराष्ट्र शासन
चित्र आश्वासक विकासाचे, हीरकमहोत्सवी महाराष्ट्राचे
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय


## ६ घरकुलाचे स्वप्न साकार

ग्रामविकास विभागामार्फत २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत महाआवास अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात आले. या अभियानांतर्गत सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांची बांधकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. या अभियानातून अवघ्या साडेसहा महिन्यांच्या कालावधीत सुमारे ८ लाख कुटुंबांना घरकुलाचा लाभ दिला आहे.



## २५ 'उद्योग'चा मदतीचा हात

कोविड-१९ च्या संकटात जीव वाचवणे हीच प्राथमिकता बनल्याने राज्याने आरोग्य व्यवस्था बळकट केली. सोबतच आर्थिक चक्र सुरू ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना करून उद्योगाला चालना दिली. उद्योगांना संजीवनी मिळाल्याने उद्योग विभागाने एक पाऊल पुढे टाकत सामाजिक दायित्वाचे पालन केले.



## १० गृहनिर्मिती प्रकल्पांना गती

सर्वसामान्य नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २०२२ पर्यंत १९.४० लाख घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट राज्याने निश्चित केले आहे. गृहनिर्माण विभागाने अनेक गृहनिर्मिती प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गत विविध गृहनिर्मिती प्रकल्प राबवले जात आहेत.



## २९ लसीकरणात अव्वल

कोरोनाची दुसरी लाट राज्यात काहीशी कमी होताना दिसून येत आहे. लसीकरणामध्ये महाराष्ट्राने देशात अग्रसेर स्थान कायम राखत १ कोटींहून अधिक नागरिकांना लसीची दोन्ही मात्रा (लसीचे डोस) देऊन त्यांना संपूर्ण संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाधानाची बाब अशी की, राज्यातील कोरोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्यादेखील ८० हजारापर्यंत आली आहे.




## १७ क्षण स्वप्नपूर्तीचे

चांगले, टुमदार घर असावे असे सर्वांचेच स्वप्न असते. मात्र सर्वसामान्यांना तसेच हातावर पोट असणाऱ्यांना हे स्वप्न पूर्ण करताना मोठी तडजोड करावी लागते. गोरगरिबांना तर पक्के घर बांधणे बहुधा शक्य होत नाही. मात्र शासन त्यांच्या घराची स्वप्नपूर्ती करण्यास कटिबद्ध आहे. सर्वांना हक्काचे घर मिळावे, यासाठी राज्य शासन महाआवास अभियान राबवत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध योजनेंतर्गत विविध घटकांतील नागरिकांच्या घरांची स्वप्नपूर्ती झाली आहे. स्वप्नपूर्तीच्या प्रातिनिधिक यशकथा..

## ३३ भूजल संवर्धनाचा निर्धार

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला १६ जुलै २०२१ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या संभाव्य टंचाईचा अंदाज वर्तवणे, स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबवणे आदी कामे करण्यात येतात. राज्याच्या ग्रामीण भागातील ८५ टक्के भाग पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. तसेच जवळपास ७० टक्के शेती भूजलावर अवलंबून आहे.




| | | | |
|---|---|---|---|
| घरकुलाचे स्वप्न साकार | ६ | कौशल्यातून रोजगाराकडे... | ३० |
| गृहनिर्मिती प्रकल्पांना गती | १० | भूजल संवर्धनाचा निर्धार | ३३ |
| सिडको : हक्काचा निवारा | १५ | कामगारांच्या हिताला प्राधान्य | ३७ |
| क्षण स्वप्नपूर्तीचे | १७ | सुखनिद्रागार | ४१ |
| 'उद्योग'चा मदतीचा हात | २५ | आधारवड | ४३ |
| नवा मार्गदर्शक : इनक्युबेशन सेंटर | २८ | पाऊल पडते पुढे | ४६ |
| लसीकरणात अव्वल | २९ | मंत्रिमंडळात ठरले | ५६ |

वर्ष ७३ वे | अंक १ | सप्टेंबर २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| ■ मुख्य संपादक | डॉ. दिलीप पांढरपट्टे |
| ■ प्रबंध संपादक | गणेश रामदासी |
| ■ संपादक | अनिल आलूरकर |
| ■ उपसंपादक | प्रवीण कुलकर्णी |
| | गजानन पाटील |
| | राजाराम देवकर |
| ■ वितरण अधिकारी | मंगेश वरकड |
| ■ मुखपृष्ठ | सीमा रनाळकर |
| | सुशिम कांबळे |
| ■ मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| ■ मुद्रितशोधन | उमा नाबर |
| ■ मुद्रण | मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# कोरोनामुक्त करण्याचा निश्चय करू या..

**कोरोनाला** पराभूत करत आपल्याला कोरोनामुक्त व्हायचे आहे. आपण सर्वजण मिळून नक्कीच या संकटावर मात करू. मी माझा देश, राज्य कोरोनामुक्त करणारच आणि पुढील स्वातंत्र्यदिन कोरोनामुक्त वातावरणातच साजरा करणार असा सर्वजण मिळून निश्चय करू या, यासाठी संयम आणि शिस्तीचे पालन करू या, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. स्वातंत्र्याच्या ७४व्या वर्धापनदिनानिमित्त मंत्रालय प्रांगणात आयोजित राष्ट्रध्वजारोहण समारंभात ते बोलत होते. भारतीय स्वातंत्र्य दिन आणि स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मुख्यमंत्र्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व शहिदांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कोरोनाविषयक नियमांचे पालन करून मर्यादीत उपस्थितीत कार्यक्रम साजरा करण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दिपांकर दत्ता, राज्याचे गृह मंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे, मुख्य सचिव सीताराम कुंटे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या कोरोनायोद्ध्यांची भेट घेतली, त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून ते करत असलेल्या कामकाजाची माहिती घेतली. यानंतर मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. राज्यातील राष्ट्रपती पदके मिळवलेल्या पोलिसांचा तसेच इतर पुरस्कार विजेत्यांचा नामोल्लेख करून मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात त्यांचे अभिनंदन व कार्याचा गौरव केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीयांचे आक्रमण परतवून लावत खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची बीजे रुजवली. परकीयांविरुद्ध आपण लढून जिंकू शकतो, आक्रमण परतवून लावू शकतो हे छत्रपती शिवाजी महाराजांनी फक्त दाखवूनच नाही दिले, तर तसा विश्वास आणि प्रेरणाही आपल्याला दिली. राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील कुप्रथा, विषमता यांच्या बेड्या तोडल्या. विषमतेविरूद्ध लढा उभारून स्वातंत्र्य, समता म्हणजे काय हे सांगितले, असे मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी सांगितले.

कोरोनामुळे एक नवीन पारतंत्र्य आपण मागच्या दीड वर्षांपासून अनुभवत आहोत. आता आपण बरीच बंधने शिथिल करत आहोत. कोरोनाचे संकट अजूनही टळलेले नाही. परदेशात काही ठिकाणी ते नव्याने उसळले आहे. आपल्याकडे हे संकट नव्याने उसळू नये म्हणून आपण सर्वांना काळजी घ्यायची आहे. ऑक्सिजनचे प्रमाण लक्षात घेऊन आपण निर्बंधात शिथिलता आणत आहोत. पण तरीही आपल्याला काळजी घेणे अत्यावश्यक आहे. ऑक्सिजन क्षमता लक्षात घेतली आणि रुग्णसंख्या वाढू लागली तर नाइलाजाने पुन्हा एकदा लॉकडाऊन लावावे लागेल. त्यामुळे कोरोना प्रतिबंधक नियमांचे यापुढेही कटाक्षाने पालन करावे, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी केले.

कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी अनेक कोरोनायोद्ध्यांनी दिवसरात्र संघर्ष केला. अनेकांना कोरोनाची बाधा झाली. यात अनेकजण बरे झाले, तर काही जणांना दुर्दैवाने प्राण गमवावे लागले. या कोरोनावीरांना मुख्यमंत्र्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राज्यात लसीकरणाने आता वेग घेतला आहे.

# घराची स्वप्नपूर्ती

निवारा ही मूलभूत गरज आहे. मानवी संस्कृतीच्या विकसनशील काळात ही गरज अधिक स्पष्ट आणि समृद्ध होत गेली आहे. त्यामुळे घर हे केवळ निवाऱ्याचे ठिकाण नाही, तर ते पिढ्यांचे संस्कृतिवाहकही आहे. त्यामुळे प्रत्येकाला स्वतःचे मालकी हक्काचे घर असणे ही सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक गरज झाली आहे. नागरिकीकरणाचा वेग अधिक असलेल्या महाराष्ट्रात तर घरांची निर्मिती आणि उपलब्धता हा महत्त्वाचा विषय बनला आहे. त्यामुळे घरे निर्मिती हा राज्य शासनाचा सर्वात आघाडीवर असलेला अजेंडा आहे आणि तो केवळ निवाऱ्याची उपलब्धता या स्वरूपाचा नसून बदलत्या जगाशी जोडून त्यातून निर्माण झालेल्या विविधांगी बदलांचा समुच्चय विकास या अनुषंगानेही महत्त्वपूर्ण आहे.

राज्य शासनाच्या 'महाआवास' योजनेतून सर्वसामान्यांच्या जीवनात मालकी हक्काच्या घराचा दिवस येताना दिसत आहे. त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. प्रत्येकाला हक्काचे पक्के घर मिळावे हे राज्य शासनाचे धोरण आहे. गोरगरीब, असहाय घटकांपासून ते मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, खेळाडू, कलाकार अशा सर्व घटकांना घर मिळेल, या दृष्टीने राज्य शासन पावले टाकत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध घरकूल योजना 'महाआवास' अभियानांतर्गत एका छताखाली राबवल्या जात आहेत. यामुळे कमी सायासाने सर्वसामान्यांचे टुमदार घराचे स्वप्न पूर्ण होत आहे.



विविध योजनांच्या माध्यमातून घरकुल उपलब्ध करून दिले जात आहे. याला जोड मिळाली आहे ती 'प्रधानमंत्री आवास योजना - सर्वांसाठी घरे' या घोषणेची. राज्यातील ३९१ स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होत आहे. या योजनेंतर्गत २०२२ पर्यंत राज्याने १९.४० लाख घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केले असून, आतापर्यंत जवळपास १५ लाख घरकुलांना मंजुरीही मिळाली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्नगट किंवा मध्यम उत्पन्न गटातील ज्या व्यक्तीचे कुठेही पक्के घर नाही अशी व्यक्ती या योजनेंतर्गत लाभास पात्र ठरवण्यात आल्याने सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यात विविध गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून घरकुलांचे अनेक प्रकल्प राबवण्यात येत आहेत. यामध्ये म्हाडा व सिडको या संस्थांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. शहरांमध्ये सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यात या संस्थांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी, गोरेगावमधील पत्राचाळचा पुनर्विकास, झोपडपट्टी पुनर्वसन, बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास आदी गृह प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घराचे स्वप्न साकार होत आहे.

ग्रामविकास विभागामार्फत महाआवास अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लाखो गरजूंना हक्काचा निवारा मिळाला आहे. या मोहिमेंतर्गत नुकत्याच ३ लाख २३ हजार लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. त्याचबरोबर या अभियानांतर्गत सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांची बांधकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. अवघ्या साडेसहा महिन्यांच्या कालावधीत सुमारे ८ लाख कुटुंबांना हक्काचे घर मिळवून देण्यात राज्य शासनाला यश मिळाले आहे.

सर्वांचे घरकुलाचे स्वप्न साकार करणारे 'महाआवास' अभियान व विविध घरकुल योजनांची माहिती 'लोकराज्य'च्या या अंकात देण्यात येत आहे. शिवाय या योजनांच्या लाभार्थ्यांच्या यशकथा हे या अंकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. कौशल्य विकास, भूजल सर्वेक्षण, गडकिल्ल्यांचे संवर्धन, लसीकरण मोहीम, कामगार आयुक्तालयाचे शताब्दी वर्ष आदी विषयांचादेखील या अंकात समावेश आहे.

अलीकडेच अतिवृष्टीमुळे, पूरपरिस्थितीमुळे आणि भूस्खलनामुळे झालेले अतोनात नुकसान व जीवितहानी कधीही भरून न निघणारी आहे. राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मदत कार्य व उपाययोजना युद्धपातळीवर करण्यात येत आहेत. त्यासोबतच अवघ्या महाराष्ट्रातून मदतीचा ओघ मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने पूरग्रस्तांना या संकटातून सावरण्यासाठी बळ मिळत आहे. त्याचबरोबर दरडग्रस्त तळीये गाव व इतर नुकसानग्रस्त ठिकाणी राज्य शासन पुनर्वसनाचे काम प्राधान्याने करत आहे. त्यामुळे पक्क्या घरांबरोबर गावही पुन्हा उभे राहणार आहे.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)

# घरकुलाचे स्वप्न साकार

**ग्रामविकास विभागामार्फत २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत महाआवास अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात आले. या मोहिमेंतर्गत विविध योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मिळालेल्या ३ लाख २३ हजार लाभार्थ्यांनी नुकताच गृहप्रवेश केला आहे. त्याचबरोबर या अभियानांतर्गत सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांची बांधकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. अशा पद्धतीने या अभियानातून अवघ्या साडेसहा महिन्यांच्या कालावधीत सुमारे ८ लाख कुटुंबांना घरकुलाचा लाभ देऊन ग्रामविकास विभागाने कौतुकास्पद कामगिरी केली आहे.**

**इर्शाद बागवान**

महाआवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीदरम्यान कोरोना प्रतिबंधविषयक आवश्यक ती काळजी घेत जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींचे लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था यांच्यासह लोकांच्या सहभागातून बेघरांना घरकुले देण्यात आली. या मोहिमेंतर्गत ३ लाख २३ हजार लाभार्थ्यांचा गृहप्रवेश झाला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांचा गृहप्रवेश संपन्न झाला. त्याचबरोबर सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांची बांधकामे पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने या अभियानातून अवघ्या साडेसहा महिन्यांच्या कालावधीत सुमारे ८ लाख कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळाला आहे.

## ४० लाख लोकांना निवारा

मागील दीड वर्षापासून राज्य कोरोनाच्या संकटाशी लढत असताना राज्य शासन नागरिकांना घरात राहा, सुरक्षित राहा असे आवाहन करत आहे. परंतु घर नसलेल्यांनी घरात कसे राहायचे, भूमिहीनांनी घरात सुरक्षित कसे राहायचे हा प्रश्न होता, ज्याचे उत्तर ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या महाआवास अभियानाच्या माध्यमातून ग्रामविकास विभागाने दिले.

अभियान कालावधीत ८ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट विभागाने निश्चित केले होते. त्यातील ३ लाख २३ हजार घरकुले बांधून पूर्ण झाली असून लाभार्थ्यांना ई-गृह प्रवेशांतर्गत नुकतेच त्या त्या जिल्ह्यात चाव्यांचे वितरण करण्यात आले. उर्वरित ४ लाख ६८ हजार घरांचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. महाआवास अभियानामध्ये गृहप्रवेश केलेली कुटुंबे आणि बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर असलेली कुटुंबे अशा




'महाआवास'अंतर्गत लाभार्थी महिलेला घरकुलाची चावी प्रदान करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे व ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास मंत्री

## कुणीही बेघर राहणार नाही

घरकूलविषयक सर्व योजना या ग्रामीण भागातील गरीब, बेघर, वंचितांना दिलासा देणाऱ्या आणि घरकुलाचे त्यांचे स्वप्न साकार करणाऱ्या महत्त्वाच्या योजना आहेत. महाआवास अभियानामधून सुमारे ४० लाख लोकांना हक्काचे छत मिळाले आहे. कोरोनाचे संकट असतानाही सर्व यंत्रणेने एकजुटीने अभियान यशस्वी केले. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा, गवंडी प्रशिक्षण, घरकूल मार्टसारखे प्रयोग करून घरांचा दर्जा राखला. राज्यात ग्रामीण भागात स्वत:चे घर नाही असे एकही कुटुंब बाकी राहू देणार नाही.



**अब्दुल सत्तार**
महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास आणि विशेष साहाय्य राज्यमंत्री

## गृहनिर्मितीबरोबरच रोजगारनिर्मिती

आपले स्वतःचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ आणि सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकाराने राज्यातील ३.५ लाख कुटुंबांना हक्काचा निवारा मिळाला. लवकरच ४.५ लाख कुटुंबांनाही घर मिळेल. महाआवास अभियानांतर्गत फक्त निवारा नव्हे तर गवंडी प्रशिक्षण देऊन रोजगारही उपलब्ध करून दिला गेला. हा अभियानाचा एक भाग असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.

एकूण सुमारे ८ लाख कुटुंबांची सरासरी सदस्य संख्या लक्षात घेतली, तर सुमारे ४० लाख लोकांना घरकुलाचे छत मिळाले आहे. शासन अनेक योजना राबवते. त्यात अनेक योजना केवळ जाहीर होतात, पण ग्रामविकास विभागाने जलदगतीने घरे



बांधून गोरगरिबांना त्यांचे हक्काचे घर मिळवून दिले आहे.

### रमाई, शबरी आवास योजना

ग्रामविकास विभागाने विविध विभागांच्या सहयोगातून महाआवास अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवले. सामाजिक न्याय, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार या विभागांच्या योजनेतूनही घरकुलांचा लाभ देण्यात आला. त्यामुळे वंचित घटकांचा सामाजिक स्तर उंचावण्यात अभियानाचा मोठा फायदा झाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) बरोबरच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना राबविण्यात आल्या. यामधून अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, बांधकाम कामगार या वंचित घटकांना घरांचा लाभ देण्यात आला.

### भूमिहीनांना घरकुलासाठी जागा

राज्यात असे काही लाभार्थी होते की ज्यांना घरकूल मंजूर झाले, पण ते बांधण्यासाठी जागा नव्हती. अशा लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेतून जागा उपलब्ध करून देण्यात आली. अभियान कालावधीत अशा ५० हजार ११२ भूमिहीन लाभार्थ्यांना घरे बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे जागेअभावी रखडलेल्या लाभार्थ्यांचेही घराचे स्वप्न पूर्ण झाले.

ग्रामीण भागातील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचाही राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. गायरान, वन जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वास्तव्यास अयोग्य जमिनी वगळून इतर शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे सध्या आहेत त्या ठिकाणी नियमानुकूल करणे, तसेच सध्या आहे त्या ठिकाणी अतिक्रमणे नियमानुकूल करणे शक्य नसल्यास अशा अतिक्रमणांचे पर्यायी जागेत पुनर्वसन करणे या पद्धतीने या ग्रामस्थांचे घराचे बांधकाम नियमित करण्यात येत आहे. या निर्णयामुळेही अनेक ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.

### गवंडी प्रशिक्षण उपक्रम

महाआवास अभियान राबवताना ग्रामीण भागात प्रशिक्षित गवंड्यांची कमतरता भासू लागली. ती दूर करण्याकरिता अभियानात गवंडी प्रशिक्षणाचा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. घराचे डिझाईन, शौचालयाचे



बांधकाम आदी अनुषंगाने हे प्रशिक्षण देण्यात आले, त्यामुळे गावागावात प्रशिक्षित गवंडी उपलब्ध झाले. त्यामुळे घरकुलांच्या बांधकामाला मोठ्या प्रमाणात गती प्राप्त झाली. ८ हजार ८१५ ग्रामीण गवंड्यांना प्रशिक्षण देण्यात आले, तर १३ हजार २९५ ग्रामीण गवंड्यांचे प्रशिक्षण सध्या प्रगतिपथावर आहे.

### डेमो हाऊसेसमधून मार्गदर्शन

घराचे आदर्श डिझाईन नेमके कसे






असावे याची माहिती देण्यासाठी ठिकठिकाणी डेमो हाऊसेस उभारण्यात आले. लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारी ३२० डेमो हाऊसेस राज्याच्या विविध भागात उभारण्यात आली. डेमो हाऊसेस पाहून लाभार्थ्यांसह या योजनेची अंमलबजावणी करणारे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, गवंडी यांना घरकुलाचे बांधकाम नेमके कसे करावे याची निश्चित दिशा मिळाली. घरकुलांचे बांधकाम दर्जेदार होण्यामध्ये या डेमो हाऊसेसचा मोठा फायदा झाला.

## गृहकर्जासाठी मदत

काही लोकांना मोठे घर बांधायचे होते, किंवा घरामध्ये अधिकच्या सुविधा, आकर्षकपणा निर्माण करायचा होता. या लोकांना अनुदानाशिवाय बँका, पतसंस्था आदी वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवून देण्यासाठीही ग्रामविकास विभागाने कामगिरी केली. महाआवास अभियान कालावधीत ४२ हजार १८० लाभार्थ्यांना अनुदानाव्यतिरीक्त वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवून देण्यात आले. या लाभार्थ्यांनी अनुदान आणि गृहकर्ज मिळून दर्जेदार आणि आकर्षक अशा घरांची निर्मिती केली. शासनाच्या योजनेतून तयार झालेली ही घरे आता लोकांसाठी कौतुकाचा विषय झाली आहेत. लाभार्थ्यांनाही स्वत:च्या दर्जेदार घरात राहण्याचे समाधान मिळत आहे.

## आकर्षक बहुमजली इमारती

काही गावांमध्ये घरकूल बांधण्यासाठी पुरेशी जागा नसल्यास त्याठिकाणी विविध लाभार्थ्यांना एकत्र करून बहुमजली इमारती (जी+१ व जी+२) उभारण्यात आल्या. राज्यात अशा १ हजार २८६ बहुमजली इमारती उभारण्यात आल्या. शहरी भागात म्हाडा किंवा सिडकोसारख्या मोठ्या संस्थांमार्फत निवासी इमारती उभ्या करण्यात येतात. त्याच धर्तीवर ग्रामविकास विभागाने गावातील लोकांसाठी उभारलेल्या या छोट्या निवासी इमारती आता कौतुकाचा विषय ठरत आहेत.

## गृहसंकुलांची उभारणी

एखाद्या गावात पुरेशी जागा उपलब्ध असल्यास तिथे विविध लाभार्थ्यांना एकत्र करून गृहसंकुले उभारण्यात आली. ६२५ गृहसंकुले उभारून हा उपक्रम यशस्वी करण्यात आला. ही गृहसंकुले आदर्श पद्धतीने बांधण्यात आली असून त्यांची



रंगसंगती, लोकांनी घरांसमोर तयार केलेल्या छोटेखानी परसबागा यामुळे त्यांचे सौंदर्य वाढले आहे. स्वत:च्या चांगल्या घरामध्ये राहण्याचा आनंद लाभार्थ्यांना मिळत आहे. अभियान कालावधीमध्ये पूर्ण झालेल्या घरकुलांपैकी १ लाख २२ हजार १०४ घरकुले ही मूलभूत नागरी सुविधांनी युक्त आहेत.

## घरकुलाबरोबर नागरी सुविधा

लोकांना फक्त घरकुले देऊन ग्रामविकास विभाग थांबला नाही. फक्त घर असेल आणि त्यात जीवनावश्यक मूलभूत सुविधा नसतील तर त्याचा उपयोग काय? हे लक्षात घेऊन या घरांना पाणी, वीज, शौचालय, स्वयंपाकाचा गॅस या



सुविधाही असाव्यात असा चंग ग्रामविकास विभागाच्या यंत्रणेमार्फत बांधण्यात आला. यासाठी शासनाच्या विविध विभागांच्या संबंधित योजनांशी कृतिसंगम करण्यात आला. या कृतिसंगमामधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना जलजीवन मिशनमधून ८ लाख ६ हजार ८९५ घरकुलांना नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. याबरोबरच पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाशी कृतिसंगम करून स्वच्छ भारत अभियानामधून ९ लाख ३२ हजार १०२ घरकुलांना शौचालयाचा लाभ देण्यात आला. तसेच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमधून ७ लाख २७ हजार ०३१ गॅस जोडणी देण्यात आली. सौभाग्य योजनेतून ७ लाख ५१ हजार १५० विद्युत जोडणी देण्यात आली. अशा पद्धतीने या घरांना सर्व सोयी-सुविधांनी स्वयंपूर्ण करण्यात

आले. या सर्व लाभार्थ्यांमध्ये अभियान कालावधीत बांधण्यात आलेल्या तसेच आधीच्या कालावधीत बांधण्यात आलेल्या घरकुलांचा समावेश आहे.

## उमेद, रोहयोमधून रोजगार

ग्रामविकास विभागाची यंत्रणा घरकूल लाभार्थ्यांना फक्त सोयी-सुविधा देऊन थांबली नाही. या लोकांना रोजगारही उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. याअंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन अर्थात उमेद अभियानातून ८ लाख १० हजार ०३१ लाभार्थ्यांना उपजीविका उपलब्ध करून देण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ६ कोटी १० लाख ६ हजार २८० इतकी मनुष्यबळ निर्मिती करून रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

## दर्जेदार घरांसाठी भागीदारी

राज्यातील ग्रामीण भागातील घरकूल योजनांना चालना देण्यासाठी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात ग्रामविकास विभाग आणि आयआयटी (मुंबई), रिलायन्स फाऊंडेशन आणि हुडको यांच्यामध्ये भागीदारी करण्यात आली. राज्यात स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार घरकूल डिझाईन करणे, कमी खर्चातील पण दर्जेदार अशा घरकुलाचे तंत्रज्ञान विकसित



करणे तसेच भूकंप, वादळ आदी नैसर्गिक आपत्तींचा सामना करू शकणाऱ्या घरकुलांची निर्मिती करण्यासाठी आयआयटी (मुंबई) यांची मदत घेतली जात आहे. त्याचबरोबर आयआयटीच्या सहयोगातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण देण्यात येत असून इंटरर्नशीपच्या माध्यमातून आयआयटीमधील विद्यार्थ्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये सहभाग घेतला जात आहे. आयआयटी ही देशातील अग्रगण्य आणि नामांकित संस्था असून त्यांच्या सहयोगातून ग्रामीण भागातील घरकुले अधिक दर्जेदार होण्यास मदत होत आहे.

हुडको (हाऊसिंग आणि अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) यांच्याकडून ग्रामीण गृहनिर्माणासाठी तांत्रिक सहकार्य तसेच सीएसआर आदी माध्यमातून आर्थिक सहकार्य घेण्यात येत आहे. मोठ्या गावांमध्ये बहुमजली इमारती तसेच



### ‘घरकूल मार्ट’मुळे बचत

घरकुलासाठी लागणारे साहित्य एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकूल मार्ट ही संकल्पना पुढे आली. घरांच्या बांधणीसाठी लागणारे साहित्य महिला बचतगटांच्या ‘घरकूल मार्ट’मधून उपलब्ध करून देऊन त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्याचे कामही विभागाने केले आहे. या घरकूल मार्टमुळे लोकांची सोय झाली. शिवाय सर्व साहित्य एकाच ठिकाणी मिळत असल्याने साहित्याची वाहतूक व इतर अनुषंगिक खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली. बांधकामाचे साहित्य वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी ६१२ घरकूल मार्ट सुरू करण्यात आली आहेत.

हाऊसिंग कॉलनी आदींमध्ये सीएसआरच्या माध्यमातून मूलभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी हुडको सहकार्य करत आहे. तसेच कमी खर्चातील घरकुलाचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठीही हुडको सहकार्य करत आहे. घरकुलविषयक विविध योजनांची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांपर्यंत ऑडिओ, व्हिडिओ तसेच टेक्स्ट मेसेजद्वारे पोहोचवण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशन सहकार्य करत आहे. त्याचबरोबर ग्रामीण घरकूल योजनांची माहिती देण्यासाठी हेल्पलाईनही तयार करण्यात येत आहे.

ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पुढाकारातून आता राज्यातील उर्वरित घरकुले लवकरात लवकर पूर्ण करुन ‘मिशन झीरो’ राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. घरकूलविषयक योजनांसाठी काम करणे हे एक प्रकारचे सामाजिक कार्यच आहे अशी भावना बाळगून जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. लवकरच राज्याचा ग्रामीण भाग बेघरमुक्त करण्याचा निर्धार ग्रामविकास विभागाने केला आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

# गृहनिर्मिती प्रकल्पांना गती

**सर्वसामान्य नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २०२२ पर्यंत १९.४० लाख घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट राज्याने निश्चित केले आहे. गृहनिर्माण विभागाने अनेक गृहनिर्मिती प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गत विविध गृहनिर्मिती प्रकल्प राबवले जात आहेत. यामध्ये बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास हा प्रकल्पही असून तो दक्षिण आशियाई देशांमधील सर्वात मोठा नागरी पुनर्विकास प्रकल्प ठरणार आहे.**

**देवेंद्र पाटील**

गृहनिर्माण विभागाच्या म्हाडाअंतर्गत असंख्य नागरिकांची स्वप्नपूती झाली आहे. राज्य शासनाची गृहनिर्मिती क्षेत्रात म्हाडा ही देशातील अग्रेसर संस्था आहे. गेल्या दीड वर्षांत म्हाडाच्या क्षेत्रीय मंडळांतर्फे सुमारे दहा हजार घरे नागरिकांना सोडतीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली. म्हाडा पुणे मंडळाने २,९०८ सदनिकांची नुकतीच सोडत जाहीर केली आहे तर जानेवारी २०२१ मध्ये ५,६४७ सदनिका सोडतीद्वारे नागरिकांना वितरित केल्या आहेत. तसेच ६८ भूखंडही उपलब्ध करवून देण्यात आले आहे.

म्हाडाच्या औरंगाबाद मंडळातर्फे ८६४ कुटुंबीयांची संगणकीय सोडत प्रणालीद्वारे गृह स्वप्नपूर्ती करण्यात आली. नाशिक मंडळातर्फे गेल्या दीड वर्षांमध्ये तीन स्वतंत्र सोडती काढून एकूण १,२१८ सदनिका सोडत प्रक्रियेद्वारे वितरित केल्या आहेत. त्याचबरोबर कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर आणि ठाणे ग्रामीण विभाग, पालघर, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण येथील विविध गृहप्रकल्पांतर्गत सुमारे आठ हजार घरांची सोडत जाहीर करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

बंद गिरण्यांतील कामगारांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. अद्यापपर्यंत राज्य शासनाने म्हाडाच्या माध्यमातून १५,८७० गिरणी कामगारांना हक्काचा निवारा उपलब्ध करवून दिला आहे. १ मार्च २०२० रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते बॉम्बे डाईंग टेक्सटाईल मिल, बॉम्बे डाईंग स्प्रिंग मिल व श्रीनिवास मिलच्या





**डॉ. जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

## गृहनिर्माणला नवसंजीवनी देऊ

सर्वसामान्यांच्या निवारा या गरजेप्रति कटिबद्ध असलेल्या राज्य शासनाने कोविड -१९ विषाणू संसर्गाच्या आव्हानात्मक परिस्थितीतही गृहनिर्मितीच्या क्षेत्रात गेल्या दीड वर्षात अनेक सकारात्मक निर्णय जाहीर केले आहेत. त्यामुळे राज्यातील गृहनिर्मितीला गती मिळाली. राज्य शासनाने गृहनिर्मितीला चालना देणारी जाहीर केलेली नवीन धोरणे म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी निश्चितच उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मोठी मदत होईल.



**सतेज पाटील**
गृहनिर्माण राज्यमंत्री

## गृहनिर्मितीला चालना

सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी तसेच परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. कोरोना महामारीचे संकट असूनही गेल्या दीड वर्षाच्या कालावधीत गृहनिर्माण विभागाने न थांबता अतिशय महत्त्वाचे व दूरगामी परिणाम करणारे अनेक निर्णय घेतले आहेत.त्यामुळे गृह निर्मितीला निश्चितच चालना मिळेल यात शंका नाही.पुढील तीन वर्षात मोठ्या प्रमाणात घरांची निर्मिती करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

जागांवर उभारण्यात आलेल्या ३ हजार ८९४ सदनिका संगणकीय सोडतीद्वारे वितरित करण्यात आल्या. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विभागीय मंडळांतर्फे २०२१-२२ या कालावधीत ९८६९ सदनिकांच्या बांधकामाचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे.

## उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी

मुंबई शहर बेटावरील सुमारे १९,६४२ इमारतींना उपकर लावण्यात आला. त्यानंतर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सर्व उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याचे काम सुरू केले. सद्य:स्थितीत १४,२०७ उपकर प्राप्त इमारती असून त्यापैकी बहुतांश इमारतींची आयुर्मयादा संपुष्टात आली आहे. या दृष्टिकोनातून शासनाने म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या असून, त्यामार्फत मुंबई शहर बेटावरील जीर्ण व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींना संबंधित प्राधिकरणांकडून सूचना प्राप्त झाल्यापासून ६ महिन्यांच्या कालावधीत संबंधित इमारतीच्या मालकास पुनर्विकासाची संधी प्रदान करण्यात येणार आहे. यास मालक अपयशी ठरल्यास संबंधित इमारतीतील प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्था यांना पुनर्विकासाकरिता ६ महिन्यांचा कालावधी देण्यात येणार आहे. तरीही पुनर्विकासाचा प्रकल्प कार्यान्वित न झाल्यास अशा प्रकरणी म्हाडामार्फत या इमारतीचा पुनर्विकास करण्यात येईल.

## गोरेगावमधील पत्राचाळचा पुनर्विकास

गोरेगांव, मुंबई येथील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून रखडला होता. या म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत राज्य शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला. या निर्णयानुसार गोरेगांव, मुंबई येथील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) सहकारी गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास उच्च न्यायालय / कंपनी लॉ ट्रिब्युनलच्या आदेशाच्या अधीन राहून म्हाडाने करावयाचा आहे. या प्रकल्पाचे काम सुरू केल्यानंतर रहिवाशांना म्हाडामार्फत भाडे देण्यात येणार आहे. गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या हा पुनर्विकास प्रकल्प आता मार्गी लागेल. त्यामुळे आता पत्राचाळ येथील मूळ ६७२ गाळेधारक व म्हाडा हिश्श्यांतील सोडत काढलेल्या ३०६ विजेत्यांसाठी लवकरच त्यांच्या हक्काचे घर मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

## पुनर्विकास प्रकल्पांना तातडीने मंजुरी

कोविड-१९ या महामारीच्या काळात बांधकाम क्षेत्रामध्ये आलेली मंदी लक्षात घेता बांधकाम व्यवसायाला चालना मिळण्याकरिता राज्य शासनाने १४ जानेवारी २०२१ रोजी म्हाडास भरणा करावयाच्या अधिमूल्यामध्ये ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत ५०% सवलत जाहीर केली आहे. म्हाडाने पुनर्विकासाकरिता म्हाडा वसाहतीतील संस्थांकडून आकारावयाच्या अधिमूल्यावरील व्याजदर पूर्वी १२% एवढा होता, तो व्याजदर ८.५०% इतका करण्यात आलेला आहे. म्हाडाच्या पुनर्विकास प्रकल्पांचा मंजुरीचा कालावधी पूर्वी ७५ ते १०५ दिवस इतका होता. आता हा कालावधी ईज ऑफ डुइंग बिझनेसअंतर्गत ४५ दिवसापर्यंत कमी करण्यात आलेला आहे.

## पोलीस घरे: उपाययोजनांसाठी समिती

मुंबईतील बी.डी.डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना जी सेवा निवासस्थाने दिलेली आहेत ती त्वरित रिकामी करून देण्याबाबत व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायमस्वरूपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील, यावर उपायोजना सुचवण्यासाठी तसेच तद्नुषंगिक मुद्द्यांबाबत सखोल अभ्यास करून शासनास सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, तर गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील हे या समितीचे सहअध्यक्ष असतील.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता ठाणे मुख्यालय असलेले एकच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता) स्थापन करण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका, (सिडको आणि नैना क्षेत्रासह), ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, उल्हासनगर अशा एकूण ८ महानगरपालिका आणि अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान आणि कर्जत नगरपरिषद अशा एकूण ७ नगरपालिका / नगरपरिषद यांचा समावेश करून मुंबई महानगर प्रदेश

## प्रधानमंत्री आवास योजना

सर्वांना पक्की घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरेची घोषणा झाली आहे. या योजनेची राज्यातील ३९१ स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत २०२२ पर्यंत राज्याने १९.४० लक्ष घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. योजनेसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सुकाणू अभिकरण व अभियान संचालनालय म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे. या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी संबंधित स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

जी व्यक्ती आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), अल्प उत्पन्नगट (एलआयजी) किंवा मध्यम उत्पन्न गटात (एमआयजी) मोडते व तिचे संपूर्ण देशात कुठेही पक्के घर नाही अशी व्यक्ती या योजनेंतर्गत लाभास पात्र ठरते. राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण १४,८३,९५८ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.

क्षेत्राकरिता ठाणे मुख्यालय असलेले एकच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता) लागू करण्याबाबतची अभ्यासगटाची शिफारस मान्य करण्यात आली आहे.

## झोपडपट्टी पुनर्वसनसाठी अभ्यासगट

प्रमुख शहरात झोपडपट्ट्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई, पुणे व पिंपरी-चिंचवड, नागपूर आणि मुंबई महानगर प्रदेश वगळता राज्यातील इतर प्रमुख शहरातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाबाबत अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विविध योजनांचे आशयपत्र मंजुरीच्या प्रस्तावाची तपासणी ६ टप्प्यांवर करण्यात येत होती. यात सुधारणा करून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या आशयपत्र मंजुरीचा कालावधी कमी करणे व योजनांच्या विकासकामाला गती देण्यासाठी तसेच प्राधिकरणातील कारभारात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आशयपत्र मंजुरीच्या प्रस्तावाची तपासणी ३ टप्प्यांवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## बीडीडी पुनर्वसन कामाचा शुभारंभ

राज्य शासनाने बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्याचा मोठा नागरी प्रकल्प हाती घेतला आहे. मुंबईच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या प्रमुख उपस्थितीत वरळी येथील जांबोरी मैदानावर झाला.

'बीडीडी चाळींचा एक मोठा इतिहास आहे. या चाळींनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पाहिली, महाराष्ट्रासाठी रस्त्यावर सांडलेले रक्त पाहिले. वासुदेव बळवंत फडके यांसारखे क्रांतिकारकदेखील या चाळींमध्ये राहिले. बटाट्याची चाळ या पुस्तकातून पु. ल. देशपांडे यांनी चाळीच्या जीवनाचे सुंदर वर्णन केले आहे. अनेक क्रांतिकारी चळवळी तसेच आणि मुंबईच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडणीत चाळींचा व त्यातील कष्टकऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्या लोकांचे फार मोठे योगदान मुंबईच्या विकासात राहिले आहे. आपण कितीही मजली इमारती आणि टॉवर्स या ठिकाणी बांधले तरी या चाळींच्या ऋणातून आपण मुक्त होणार नाही', अशा भावना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बांधकामाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केल्या. संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांपैकी अनेकांचे वास्तव्य या मुंबईच्या चाळींमध्ये होते. या हुतात्म्यांची आपण नेहमी आठवण ठेवली पाहिजे. उद्या चाळीतून तुम्ही टॉवरमध्ये जरी गेलात तरी आपली संस्कृती तुटू देऊ नका, असे आवाहनही त्यांनी केले.

ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार म्हणाले, बीडीडी चाळींना अतिशय गौरवशाली इतिहास आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, आचार्य अत्रे अशा कितीतरी महान व्यक्ती व क्रांतिकारकांचे वास्तव्य या चाळींमध्ये होते. महाराष्ट्राच्या ऐक्याचे येथे दर्शन घडते. अशा या चाळींचा इतिहास आपण जतन केला पाहिजे. चाळींच्या जागी




**वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक, मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर आदी.**

इमारती उभ्या राहतील पण तुमच्या कष्टाचा ठेवा विकू नका तसेच या भागातील मराठी टक्का कमी करू नका, असे आवाहनही श्री. पवार केले.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात या वेळी म्हणाले, अनेक विकासाचे प्रकल्प राज्यात सुरू आहेत. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामुळे राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला जाणार आहे. या प्रकल्पातील भाडेकरू रहिवाशांच्या ज्या मागण्या होत्या, त्या मान्य झाल्या असून, या पुनर्विकास प्रकल्पातील अडथळे त्यामुळे दूर झाले आहेत.

गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड म्हणाले, अनेक क्रांतिकारक, साहित्यिकांसह रामनाथ पारकर यांच्यासारखे क्रिकेटपटूही या बीडीडी चाळीमध्ये वास्तव्याला होते. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम करताना अनेक अडचणी येत होत्या. करारनामा, विस्थापितांचे प्रश्न अशी अनेक आव्हाने होती. परंतु त्यातून मार्ग काढला. पुढील ३६ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येईल. सुमारे तीन हजार पोलिसांना घरे देण्याचे प्रस्तावित असून येथील निवृत्त पोलीस तसेच २०१० पूर्वीपासून ज्यांचे वास्तव्य आहे अशा पोलिसांनाही घरे देण्याचे नियोजन आहे. कामाठीपुरा व कुलाबा येथील झोपडपट्टीचाही समूह पुनर्विकास करण्यात येणार आहे. तर बीडीडी पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट असून येथे इतर सोयीसुविधाही उपलब्ध करून देण्यावर भर असल्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांनी सांगितले. दरम्यान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व मान्यवरांच्या हस्ते 'चाळींतले टॉवर' या कॉफीटेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले.

## बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास

दक्षिण आशियाई देशांमधील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास हा सर्वात मोठा नागरी पुनर्विकास प्रकल्प आहे.

वरळी, ना.म.जोशी मार्ग-परळ व नायगाव येथील शासनाच्या ३४.०५ हेक्टर जागेवर १९५ चाळी आहेत. प्रत्येक चाळ ही तळ+३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी ८० रहिवासी गाळे आहेत. या चाळींचा पुनर्विकास करून त्या चाळीतील निवासी पात्र गाळेधारकांना ५०० चौरस फुट चटई क्षेत्रफळाची सदनिका विनामूल्य व मालकी हक्काने देण्यासाठीचा तसेच या ठिकाणच्या



वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे संकल्प चित्र

झोपडीधारकांना महाराष्ट्र झोपडपट्टी निर्मूलन अधिनियमातील तरतुदीनुसार पात्र झोपडपट्टी धारकांप्रमाणे २६९ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास योजनेंतर्गत राज्य शासनाच्या जमिनीवर या योजनेद्वारे १५ हजार ५९३ पुनर्वसन गाळ्यांव्यतिरिक्त सुमारे ८ हजार १२० विक्रीयोग्य गाळे बांधण्यात येणार आहेत.

राज्यशासनाच्या जागेवर १५,५९३ गाळे, स्टॉल्स व अधिकृत झोपड्या आहेत. बीडीडी चाळींचा विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) ब) च्या अंतर्गत करण्यात येणार आहे. बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने म्हाडाची सुकाणू अभिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प योग्य रीतीने राबवण्यासाठी म्हाडास मार्गदर्शन करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्तिप्रदत्त समिती गठित करण्यात आली आहे. पुनर्विकास प्रकल्प टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार असून, काही रहिवाशांना प्रकल्प जागेजवळ असलेल्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. नायगाव व ना. म. जोशी मार्ग येथील पुनर्विकास प्रकल्प येत्या ७ वर्षात, तर वरळी येथील प्रकल्प येत्या ८ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**प्रस्तावित प्रकल्पाचा तपशील :** नायगाव योजनेत चाळीतील पुनर्वसन गाळ्यांची संख्या ३ हजार ३४४ (निवासी ३२८९+ अनिवासी ५५) असून पुनर्वसन इमारत २२ मजल्यापर्यंत व विक्रीयोग्य इमारत ६० मजल्यापर्यंत प्रस्तावित आहे. ना. म. जोशी मार्ग योजनेत चाळीतील पुनर्वसन गाळ्यांची संख्या २ हजार ५६० (निवासी २५३६+ अनिवासी २४) असून पुनर्वसन इमारत २२ मजल्यापर्यंत व विक्रीयोग्य इमारत ४० मजल्यापर्यंत प्रस्तावित आहे.

वरळी योजनेत चाळीतील पुनर्वसन गाळ्यांची संख्या ९ हजार ६८९ (निवासी ९३९४+ अनिवासी २९५) असून पुनर्वसन इमारत ४० मजल्यापर्यंत व विक्रीयोग्य इमारत ६६ मजल्यापर्यंत प्रस्तावित आहे. अशा प्रकारे तीनही योजनेत मिळून १५ हजार ५९३ पुनर्वसन गाळे (निवासी व अनिवासी ) निर्माण करण्यात येणार आहेत. तीनही बीडीडी चाळींच्या प्रकल्प जागेवर भाडेकरूंना पुनर्वसन सदनिका व अंतर्गत सोयीसुविधा कशा असतील, याची माहिती मिळण्यासाठी नमुना सदनिका बांधण्यात आल्या आहेत.

## बीडीडी चाळींचा इतिहास

साधारणतः १९२०च्या दरम्यान ब्रिटिशांनी या बीडीडी चाळीच्या इमारती बांधल्या. म्हणजे सुमारे १२२ वर्षांचा इतिहास या चाळींचा आहे. दुसऱ्या

महायुद्धातील कैद्यांना ठेवण्यासाठी या चाळी वापरण्यात आल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर जेव्हा लोकल रेल्वे सुरू झाली, त्यानंतर या भागाकडे लोकांचे येणे जाणे वाढले, स्थलांतर झाले. त्यामुळे जागेची अधिक आवश्यकता भासू लागली. या पार्श्वभूमीवर सर जॉर्ज लॉईड यांनी गृहनिर्मिती व विकासाची मोठी योजना तयार केली. या योजनेची अंमलबजावणी बॉम्बे डेव्हलपमेंट डिपार्टमेंट म्हणजेच बीडीडीच्या माध्यमातून करण्यात आली. मुंबई राज्याच्या तत्कालीन समाजव्यवस्थेत कामगार वर्गाचे आश्रयस्थान अशी बीडीडी चाळींची त्या काळी ओळख होती.

## महारेरा : ग्राहक हिताचे रक्षण

राज्यात रेरा कायदा १ मे २०१७ पासून लागू झाला आहे. या कायद्यानुसार राज्यात असलेले स्थावर संपदा प्रकल्प महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणीकृत करणे बंधनकारक झाले आहे. यामध्ये नवीन सुरू होणारे प्रकल्प तर नोंदणी करायला हवेतच, परंतु त्याचबरोबर जे प्रकल्प चालू स्थितीत होते, म्हणजेच पूर्ण झालेले नाहीत ते देखील नोंदणी करणे आवश्यक बनले. या प्रकल्पांबाबत इत्यंभूत माहिती रेराकडे उपलब्ध असते. यामुळे ग्राहकांच्या फसवणुकीला आळा बसला असून त्यांच्या हितांचे रक्षण होत आहे.

राज्यात गेल्या ४ वर्षामध्ये जवळपास ३० हजार प्रकल्प महारेरा अंतर्गत नोंदणीकृत झाले आहेत. प्रत्येक प्रकल्प नोंदणी करताना त्यांची संपूर्ण माहिती म्हणजेच मंजूर झालेले नकाशे, एकूण किती सदनिका आहेत. त्यांचे क्षेत्रफळ, जागेची कायदेशीर मालकी, प्रवर्तकाचे नाव, प्रकल्पाची अंदाजित रक्कम, प्रकल्पामधील बुकिंग आणि मुख्य म्हणजे प्रकल्पाला लागणारा एकूण वेळ म्हणजे प्रकल्प पुर्णत्वाची तारीख देणे बंधनकारक आहे आणि हे सर्व महारेराच्या संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेसाठी देखील उपलब्ध आहे. त्यामध्ये अशा नोंदणीकृत असलेल्या प्रकल्पांविषयी संपूर्ण माहिती उपलब्ध होते आणि आपल्याला सदनिका कधी मिळू शकते हे देखील समजते.

## तक्रारीची सुविधा

योग्य वेळेस गृहप्रकल्प पूर्ण झाला नाही व ग्राहकाला त्याचा ताबा मिळाला नाही, तर ग्राहक महारेरामध्ये तक्रार दाखल करू शकतो. महारेरामध्ये त्या तक्रारीवर सुनावणी घेऊन योग्य तो निवाडा केला जातो. म्हणजेच ग्राहकाला उशिरा ताबा मिळाला असेल, तर तितक्या दिवसांचे व्याज प्रवर्तकाला त्या ग्राहकाला द्यावे लागते आणि जर सदनिकेचा ताबा उशिरा मिळणार म्हणून जर त्या ग्राहकाने सदनिका नाकारली असेल, तर व्याजासकट त्याला पैसे परत करावे लागतात.

## विकासकांवर बंधने

महारेरा कायद्याप्रमाणे प्रवर्तकाला ठरलेल्या वेळेमध्ये प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक आहे. कायद्याप्रमाणे त्याला एक वर्षाची मुदत वाढ मिळू शकते. परंतु एक वर्षापेक्षा जास्त मुदत वाढ हवी असल्यास एकूण सदनिकाधारकांपैकी ५१ टक्के सदनिकाधारकांची संमती मिळणे आवश्यक आहे आणि त्यांनी संमती दिली तरच त्याला वाढीव कालावधी मिळू शकतो. जर संमती नाकारली आणि प्रवर्तकाविरोधात तक्रार केली, तर प्रकल्पाचा ताबा प्रवर्तकाकडून काढून घेऊन प्राधान्याने ग्राहकाच्या संस्थेला देण्याची तरतूद कायद्यात आहे.

## प्रकल्प काळ्या यादीत

महारेराने जे १८०० प्रकल्प काळ्या यादीत टाकले आहेत त्या प्रकल्पांची यादी जाहीर केली आहे. त्या सर्व प्रकल्पांचा कालावधी हा संपुष्टात आला असून त्यांनी कोणतीही मुदतवाढ घेतलेली नाही किंवा घेतली असेल, तर त्याचा कालावधी देखील संपलेला आहे व तो संपूर्ण प्रकल्प तसाच अपूर्ण अवस्थेत पडून आहे. साहजिकच त्यामध्ये आता कोणी गुंतवणूक केली तर असे ग्राहक अडचणीत येऊ शकतात. त्यांना सावध करावे म्हणूनच महारेराने अशा प्रकल्पांची यादी जाहीर केली. अर्थात अशा प्रकल्पांमध्येखील त्या त्या प्रकल्पाच्या ग्राहकांनी एकत्रित येऊन ठरवले, तर त्यातून त्यांची सोडवणूक करता येऊ शकते, महारेरा त्याबाबत सदैव सहकार्याच्या भूमिकेत असेल.

## ऑनलाइन सुविधा

महारेराने गेल्या ४ वर्षामध्ये ३० हजारांपेक्षा अधिक प्रकल्प नोंदणीकृत केले असून ३० हजारहून अधिक एजन्टचीदेखील नोंदणी केली आहे. महारेरामध्ये जवळपास १५ हजार तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी जवळपास १० हजार तक्रारींचा निर्णय झाला आहे. प्रवर्तकांकडून ग्राहकांना पैसे मिळण्यास विलंब होत आहे, अशा ठिकाणी प्रवर्तकांविरुद्ध ४०० हून अधिक वॉरन्टदेखील काढलेले आहेत.

गेल्या दीड वर्षामध्ये कोरोनाची साथ व लॉकडाऊन असतानादेखील महारेराचे काम संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने अविरत चालू आहे. प्रकल्पांच्या नोंदणीची प्रक्रिया ही संपूर्णपणे ऑनलाईन असून, भारतामध्ये नोंदणी होणाऱ्या प्रकल्पांपैकी जवळपास ४६ टक्के प्रकल्प एकट्या महाराष्ट्रात नोंदणी होत आहेत. तसेच तक्रार निवारणासाठीदेखील महारेराने संपूर्ण ऑनलाईन पद्धत अवलंबली आहे. त्याचे ग्राहकांनी स्वागतच केले आहे. लॉकडाऊनच्या काळात देखील तक्रार निवारणाची प्रक्रिया अव्यातहपणे चालू आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# सिडको : हक्काचा निवारा

मुंबई आणि एकंदरीत मुंबई महानगर प्रदेशात घरांच्या गगनाला भिडणाऱ्या किमती पाहता, या शहरात रोजीरोटीसाठी येणाऱ्या अनेकांचे घराचे स्वप्न हे स्वप्नच राहते. अशा सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता, सिडको महामंडळ आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सातत्याने परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देत आहे. यामुळे आजवर लक्षावधी कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत झाली आहे. शासनाच्या 'सर्वांसाठी घरे' या उद्दिष्टपूर्तीअंतर्गत 'सिडको' भरीव कामगिरी करत आहे.

**प्रिया रातांबे**

नगर नियोजन व विकास क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था, याबरोबरच नवी मुंबई क्षेत्रात सातत्याने समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांसाठी दर्जेदार घरांची निर्मिती करणारे नियोजन प्राधिकरण असाही शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडकोचा लौकिक आहे.

### उदंड प्रतिसाद

नवी मुंबईसारखे जागतिक दर्जाचे शहर विकसित करण्याबरोबरच सिडकोने या शहरात राज्यातील व देशाच्या अन्य भागांतील लोकांना वास्तव्य करण्याची संधी मिळावी म्हणून नवी मुंबईमध्ये आजपर्यंत विविध गृहनिर्माण योजना राबवल्या. या सर्व योजनांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळून त्या यशस्वी ठरल्या.

### सर्वसामान्यांना प्राधान्य

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट आणि उच्च उत्पन्न गट अशा विविध आर्थिक स्तरांतील नागरिकांसाठी सिडकोने विविध गृहनिर्माण योजना राबवल्या आहेत. सिडकोने आजवर बांधलेल्या १,२३,५७७ घरांपैकी ५१ टक्के घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गटासाठी, २६ टक्के घरे ही मध्यम उत्पन्न गटासाठी, तर २३ टक्के घरे ही उच्च उत्पन्न गटासाठी बांधण्यात आली आहेत. या आकडेवारीवरून सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देणे हेच सिडकोच्या गृहनिर्माण धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे दिसून येते.



### महत्त्वाच्या गृहनिर्माण योजना

सिडकोने पाच दशकांत अनेक महत्त्वपूर्ण गृहनिर्माण योजना राबवल्या. त्यामध्ये आर्टिस्ट व्हिलेज, सीवुड्स इस्टेट, मिलेनियम टॉवर्स, घरकूल, स्पाघेटी, घरोंदा, निवारा, सिम्प्लेक्स, वास्तुविहार आणि सेलिब्रेशन, उन्नती, व्हॅली शिल्प, स्वप्नपूर्ती या प्रकल्पांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

### १५ हजार घरांची निर्मिती

सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे या महत्त्वाकांक्षी



**उद्धव ठाकरे**
मुख्यमंत्री

### सिडको विकासाचा चेहरा

महाराष्ट्र शासनाने 'सर्वांसाठी घरे' योजनेंतर्गत ठरवून दिलेले घरांचे उद्दिष्ट 'सिडको' वेगाने गाठत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारत असलेली सिडको आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सर्वसामान्यांकरिता, सातत्याने परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देते. याद्वारे राज्याच्या विकासाचा मानवी चेहराच सिडकोच्या विकास धोरणामध्ये प्रतिबिंबित होत आहे.



**एकनाथ शिंदे**
नगरविकास मंत्री

## पोलिसांसाठी विशेष धोरण

पोलिसांच्या घरांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागून निवृत्तीनंतर त्यांची घरासाठीची वणवण थांबावी, यासाठी नगरविकास विभाग पोलिसांना त्यांच्या हक्काची घरे मिळवून देण्यासाठी विशेष धोरण तयार करत असून गृह आणि गृहनिर्माण या विभागांच्या समन्वयाने लवकरच त्याला अंतिम स्वरूप देऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर मांडले जाईल.

उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी १३ ऑगस्ट २०१८ रोजी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांसाठी १४,८३८ घरांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत नवी मुंबईतील घणसोली, खारघर, कळंबोली, तळोजा आणि द्रोणागिरी या ५ नोड्मध्ये घरे साकारण्यात आली. एकूण १४,८३८ घरांपैकी ५,२६२ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी, तर ९,५७६ घरे अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. अर्ज नोंदणी ते सोडत यादरम्यानच्या सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यात आलेली सिडकोच्या इतिहासातील ही पहिली गृहनिर्माण योजना ठरली.

कोविड-१९ व टाळेबंदीच्या काळातही या योजनेतील घरांचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण करून १ जुलै २०२१ रोजी यशस्वी अर्जदारांना घरांचा ताबा देण्यात आला.

## पोलिसांसाठी गृहनिर्माण योजना

सिडको महामंडळातर्फे पोलीस कर्मचाऱ्यांकरिता एका विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ २७ जुलै २०२० रोजी करण्यात आला. त्या अंतर्गत ४,४६६ सदनिका मुंबई महानगर क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी या पाच नोडमध्ये या सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. एकूण ४,४६६ सदनिकांपैकी १,०५७ सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि ३,४०९ या अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. १० नोव्हेंबर २०२० रोजी या योजनेची संगणकीय सोडत यशस्वीरीत्या पार पडली. लवकरच, योजनेतील यशस्वी अर्जदारांना घरांचा ताबा देण्यात येणार आहे.

**पोलिसांसाठी विशेष गृहनिर्माण धोरण :** या धोरणाबाबत नुकत्याच झालेल्या बैठकीत पोलिसांसाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करण्याला नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्त्वतः मंजुरी दिली आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील दीड लाख पोलीस हक्काच्या घरापासून वंचित आहेत. त्याना घरं मिळवून द्यायची असल्यास तेवढ्या मोठ्या संख्येने घरांची निर्मिती करण्याची गरज आहे. यासाठीच शॉर्ट टर्म, मिडियम टर्म आणि लाँग टर्म अशा तीन टप्प्यात या धोरणाचे प्रारूप तयार करण्यात आले आहे. त्यासोबतच पोलिसांना सेवा बजावताना लागणारी सेवा निवासस्थाने आणि निवृत्तीनंतर लागणारी मालकी हक्काची निवासस्थाने अशी दुहेरी गरज लक्षात घेऊनच या योजनेचे अंतिम स्वरूप तयार करण्यात येणार आहे.

पोलिसांसाठी घरे निर्माण करण्याचे अनेक पर्याय समोर आले असून गृह विभाग व गृहनिर्माण विभागाच्या समन्वयाने या धोरणाला अंतिम रूप दिले जाईल. शासनाला मिळत असलेला हाऊसिंग स्टॉक आणि इतर योजनांमधून उपलब्ध होणारी घरे वगळता अजून घरे पोलिसांना कशी उपलब्ध करून देता येतील, याला सरकारचे प्राधान्य आहे.

## परवडणाऱ्या घरांसाठी प्राधान्य

सिडकोच्या आजपर्यंतच्या गृहनिर्माण योजनांमध्ये नेहमीच सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच येणाऱ्या काळात साकार होत असलेल्या सिडकोच्या गृहनिर्माण योजनांद्वारेही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटांसाठी मोठ्या प्रमाणावर घरे उपलब्ध होणार असल्याची माहिती सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी दिली.

## परिवहन केंद्रित गृहनिर्माण योजना

सिडको लवकरच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता एक नवीन भव्य गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करणार आहे. ही गृहनिर्माण योजना 'परिवहन केंद्रित विकास' या संकल्पनेवर आधारित आहे. नवी मुंबईतील रस्ते, रेल्वे आणि महामार्ग यांद्वारे लाभलेल्या परिवहन जोडणीचा उपयोग करून ही योजना साकारण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील बस डेपो, ट्रक टर्मिनल, रेल्वे स्थानक, फोरकोर्ट एरिया परिसरामध्ये घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे प्रवासासाठी लागणाऱ्या वेळेत व खर्चात बचत होण्याबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या वापरासही प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होण्यासही मदत होणार आहे.

सिडकोच्या वर्तमानातील तसेच भविष्यातील गृहनिर्माण योजनांमुळे हक्काचा निवारा मिळण्याबरोबरच, नवी मुंबईसारख्या पायाभूत सोयीसुविधांनी पूर्ण असणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरामध्ये वास्तव्य करण्याचे अनेकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

जनसंपर्क अधिकारी, सिडको

# क्षण स्वप्नपूर्तीचे

**चांगले, टुमदार घर असावे असे सर्वांचेच स्वप्न असते. मात्र सर्वसामान्यांना तसेच हातावर पोट असणाऱ्यांना हे स्वप्न पूर्ण करताना मोठी तडजोड करावी लागते. गोरगरिबांना तर पक्के घरे बांधणे बहुधा शक्य होत नाही. मात्र शासन त्यांच्या घराची स्वप्नपूर्ती करण्यास कटिबद्ध आहे. सर्वांना हक्काचे घर मिळावे, यासाठी राज्य शासन महाआवास अभियान राबवत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध योजनेंतर्गत विविध घटकांतील नागरिकांच्या घरांची स्वप्नपूर्ती झाली आहे. स्वप्नपूर्तीच्या या प्रातिनिधिक यशकथा.**

## आधार रमाई घरकुलाचा!

औरंगाबादपासून ३० कि.मी. अंतरावरील पैठण तालुक्यातील कारकीन गाव. गावाची लोकसंख्या जवळपास चार हजार. गावातील विविध वस्तीत अनुसूचित जातीतील ग्रामस्थ राहतात. येथीलच नवीन वस्तीतील मदिना कॉलनीत राहणारे दिनेश ताकवाले यांचे रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

गरिबीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. शेतमजुरी करूनच कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. घराचे स्वप्न पूर्ण झाल्याचे समाधान श्री. ताकवाले यांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसते. घराविषयी बोलताना ते म्हणतात, ‘आमचे झोपडीवजा घर. या घरात मी, माझी पत्नी कल्पना (वय ३०), आठवीत शिकत असलेली वर्षा, पाचवीतील दीपक आणि पाच वर्षांची प्रतीक्षा राहतो. आपण पक्क्या घरात राहावे, असे प्रत्येकालाच वाटते. परंतु पैशांअभावी ते शक्य होत नव्हते. मात्र, मला २०१९-२० मध्ये शासनाच्या रमाई आवास योजनेचा लाभ मिळाला. या योजनेतून मला आतापर्यंत एक लक्ष २० हजार रुपये मिळाले. त्या पैशातून व माझ्याजवळ असलेल्या रकमेतून पक्के घराचे स्वप्न साकार होत आहे. शासनाची रमाई आवास योजना खरोखरच लाभदायी आहे. मला त्याचा लाभ मिळाला तसा इतरांनाही तो मिळावा अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांना पक्के घर मिळते आहे. त्यासाठी शासन अनुदान देते आहे, खरंच यामुळे मनाला खूप समाधान लाभले आहे. या योजनेमुळे मला आता १२ बाय ११ च्या दोन खोल्यांचे बांधकाम पूर्ण करता आले आहे.’

कारकीन येथे २०१६ ते २०२१ पर्यंत ८३ घरकुलांना मंजुरी मिळालेली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ४२ लाभार्थ्यांपैकी ३६ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. रमाई आवास योजनेंतर्गत २१ घरकुलांपैकी १० घरकुलांचे काम पूर्ण झालेले आहे. शबरी आवास योजनेंतर्गत २० पैकी १९ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत. महाआवास अभियानामुळे गावातील लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होत असल्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी व्यक्त केला आहे.

**– डॉ. श्याम टरके,** माहिती सहायक, औरंगाबाद



दिनेश ताकवाले यांचे समाधानी कुटुंब

## तिच्या दाराच्या तोरणाची गोष्ट!

आमच्या घरात सारेच मोलमजुरी करणारे. माझे पती नांदेडला जाऊन रिक्षा चालवायचे. जे काही शिल्लक राहील त्यात माझे सासू-सासरे आणि तीन लहान मुलं यात संसार व्हायचा. आमच्या वस्तीची जागा आसना नदीच्या बाजूला असल्याने दर पावसाळ्यात गुडघाभर पाणी हे गणित हमखास ठरलेले. पुराच्या सात-आठ दिवसांत आमची व्यवस्था शासनातर्फे शाळेत व्हायची. कुडाच्या या घरातून मार्ग म्हणून २००९ मध्ये माझ्या पतीने हातउसनवारी करून १८ हजाराला ही जागा घेतली. स्वत:च्या घराला तोरण बांधायचे स्वप्न आणि यातील संघर्ष कल्पना पाटोळे सांगत होती. नांदेडच्या उत्तरेला असलेले निळा हे तिचे गाव.


कल्पना पाटोळे

२०१३ मध्ये माझ्या पतीच्या अकाली निधनामुळे ते स्वप्न तसेच राहिले होते. लहान मुले, त्यांना पाहायचे की, कामावर जायचे असा प्रश्न माझ्या पुढे होता. कमावते कोणी नसल्याने कामावर जाण्याशिवाय पर्याय नव्हता. मोठ्या हिमतीने मुलांना शिकवले. मोठा मुलगा तेव्हा दहावीत होता. नात्यातल्या एका लग्नात तो बाहेरगावी गेला होता. नेमके काय झाले माहीत नाही. काळाने हा मुलगाही हिरावून घेतला. मी खचले नाही. उलट जी दोन मुले आहेत त्यांच्यासाठी आपले स्वत:चे घर बांधून आठवणीला जपत तोरण बांधायचे स्वप्न मी पाहिले, असे त्याच हिमतीने कल्पनाबाई सांगत होती.

घर चालवण्यासाठी मजुरी करण्याशिवाय पर्याय नव्हता. काही महिन्यात मजुरीचे काम शिकल्यामुळे एक दिवस मी हिमतीने आमच्या जागेवर काही विटा गोळा केल्या. ग्रामपंचायतीने माझ्या घरकुलाची जिद्द ओळखली. यातूनच पुढे शासनाच्या घरकुल योजनेच्या माध्यमातून स्वप्नपूर्तीसाठी मी माझ्यातला आत्मविश्वास जागवला. महाआवास अभियानांतर्गत घरकुलासाठी मी अर्ज केला. मला घरकूल मंजूर झाले. मी, माझे वयस्कर सासू-सासरे आणि मुलांनी दोन महिने घरासाठी मेहनत घेतली. शासनाच्या अनुदानातून विटा, सिमेंट हे साहित्य घेतले तर मजुरी आम्ही घरच्या सर्व सदस्यांनी केली.

दोन महिन्यात आमचे हे घरकूल उभे झाले. आयुष्यात जी आव्हाने पदोपदी आली त्या आव्हानावरच स्वत:च्या घराला तोरण बांधायचे मी स्वप्न बाळगले होते ते स्वप्न शासनाच्या महाआवास योजनेमुळे साकार झाले. आसना नदीला परवाच पूर येऊन गेला. नेहमीप्रमाणे माझ्या जुन्या घरात गुडघाभर पाणी होते. आता मी जमिनीपेक्षा गुडघाभर उंच असलेल्या माझ्या घरकुलात सुरक्षित आहे, याचा खूप आनंद त्यांनी व्यक्त केला.

**– विनोद रापतवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड

## ई–गृहप्रवेश

पुणे जिल्ह्यातील क्रांतिवीर देशभक्त राजगुरू यांचे जन्मगाव असलेले राजगुरुनगर (खेड) हे शहर. या तालुक्याच्या पश्चिमेला साधारण ४५ किमी अंतरावर सह्याद्री डोंगररांगेच्या कुशीत भिमानदीच्या काठी वसलेले निसर्गरम्य भोमाळे हे गाव. या गावामध्ये आदिवासी लोकवस्ती आहे. खरीप हंगामातील भात हे या भागातील प्रमुख पीक. या आदिवासी समाजातील १४ लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत पक्के घर बांधून देण्यात आले.


अनिल भोमाळे

भोमाळे गावातील गरीब अदिवासी अनिल भोमाळे यांचे दगडमातीचे कच्चे घर होते. ते शेतमजुरीचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत. 'महाआवास अभियान ग्रामीण'अंतर्गत अनिल श्रीपती भोमाळे यांचा घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समितीला पाठवण्यात आला. तेथून प्रशासकीय मान्यतेसाठी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय घोडेगाव व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला.

'महाआवास अभियान ग्रामीण'मध्ये २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत हे घरकूल मंजूर होऊन अभियान कालावधीत त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. १६ जून २०२१ रोजी पार पडलेल्या महाआवास अभियान ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रमादरम्यान अनिल श्रीपती भोमाळे यांना घरकुलाची चावी देऊन गृहप्रवेश करण्यात आला.

अनिल श्रीपती भोमाळे हे मातीच्या कच्च्या घरातून स्वतःच्या हक्काच्या पक्क्या घरकुलात आल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद ओसंडून वाहत होता. त्यांचे व कुटुंबीयांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने मूलभूत सुविधांमधील पक्का निवारा त्यांना मिळवून देण्यात आला.

**– दत्तात्रय कोकरे,**
माहिती अधिकारी, पुणे

## पत्र्याच्या शेडमधून पक्क्या घरात

केंद्र व राज्य शासनाच्या घरकुलांच्या अनेक योजना आहेत. या योजनेच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील अनेक गरीब कुटुंबांना उत्तम दर्जाची घरे मिळाली आहेत. सातारा जिल्हा आवास योजना राबवण्यात राज्यातच नव्हे, तर देशपातळीवर आघाडीवर राहिला आहे.

सातारा तालुक्यातील पानमळेवाडी येथील राजेंद्र धर्मान्ना शिंदे यांची परिस्थिती अत्यंत गरीब. मोलमजुरी केल्याशिवाय उदरनिर्वाह शक्य नाही, कोणताही इतर आर्थिक आधार नाही, राहायला पत्र्याच्या शेडमध्ये.. तिन्ही ऋतूत हाल व्हायचे.. पावसाळ्यात घर ओले, हिवाळ्यात प्रचंड गारवा, उन्हाळ्यात प्रचंड गरमी... पक्के घर दुरापास्तच... मात्र रमाई आवास योजनेमुळे सर्व सोयींयुक्त चांगले घर मिळाले, आदर्श घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाल्याचे आनंदानी अगदी पाणावलेल्या डोळ्यांनी राजेंद्र धर्मान्ना शिंदे सांगतात.

मी पानमळेवाडी (ता.जि. सातारा) येथे ४० वर्षांपासून वास्तव्यास आहे. माझे कुटुंब शेतामध्ये मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत आहे. मला ग्रामसेवक यांच्यामार्फत रमाई आवास योजनेची


राजेंद्र धर्मान्ना शिंदे

माहिती मिळाली. या योजनेच्या लाभासाठी आवश्यक कागदपत्रे परिपूर्ण प्रस्तावासह ग्रामसेवकांमार्फत पंचायत समितीमध्ये पाठवण्यात आला आणि मला रमाई आवास योजनेंतर्गत घरकूल मंजूर झाले.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी जागेची पाहणी करून बांधकामाची आखणी करून दिली व तांत्रिक मार्गदर्शन करून योजनेच्या लाभाची माहिती करून दिली. मला टप्पेनिहाय १ लाख २० हजार तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे २३ हजार ४२० व शौचालय बांधणीसाठी १२ हजार असे एकूण १ लाख ५३ हजार ४२० रुपये बँक खात्यावर जमा करण्यात आले.

गॅस जोडणी नसल्यामुळे प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडणी देण्यात आली. तसेच रस्ता, नळ जोडणी, विद्युत जोडणी व्यवस्थाही ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली. रमाई आवास योजनेमुळे आज मी पत्र्याच्या शेडमधून पक्क्या घरात आलो आहे. माझ्या घरामध्ये आज सर्व आवश्यक सुविधा आहेत. मिळालेल्या सुविधांमुळे माझे कुटुंब चांगल्या पद्धतीने घरामध्ये राहत आहे. माझ्यासारख्या गरीब मोलमजुरी करणाऱ्याला शासनाने पक्के घर बांधून दिल्यामुळे माझ्या स्वप्नांची पूर्ती झाली असून मी सुखी आहे, याबद्दल श्री. शिंदे यांनी शासनाचे आभार मानले.

**– युवराज पाटील,**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

## मायलेकाचे हक्काचे घर

गडचिरोलीमधील फुले वॉर्डात राहणारा मंगेश वादीकर एका नाश्त्याच्या स्टॉलवर नोकरी करतो. बालपणीच पितृछत्र हरवले. त्याच्या आईने लोकांच्या घरी भांडी घासून त्याला लहानाचा मोठा केला. दोघेच मायलेक कसेबसे जगतात. त्यात त्यांचे झोपडीवजा कौलारू घर मोडकळीस आले होते. पावसाळ्यात छत गळायचे. आता ते कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या बेतात होते. घर बांधायची अत्यंत गरज होती. पण घर बांधणे काही त्यांना परवडणारे नव्हते.

मंगेशला रमाई आवास योजनेची माहिती मिळाली. त्याने अर्ज केला. समाज कल्याण विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केलं. २०२० मध्ये त्याला ही


मंगेश वादीकर

योजना मिळाली. या योजनेमध्ये घर बांधण्याकरिता २.५० लाख रुपये मिळाले. बघता-बघता या मायलेकांच्या स्वप्नातले घर साकार झाले. दोघेही आता या नव्या घरात समाधाने राहत समाजकल्याण विभागाला अंत:करणातून धन्यवाद देत आहेत. मंगेश म्हणतो, 'मी लहान होतो तवाच महा बाप मरण पावला. आईनं लोकायच्या घरचे भांडे घासू-घासू मले पोसलं. कोनाचाच आधार भेटला नाई. मंग शिक्षन अर्ध्यांत राहालं. आईले मदत मनून मी दुकानात कामाले जातो. पन घर पडाले लागलं तं आमचा जीव कावराबावरा झाला. का करावं समजत नोतं. उघड्या मैदानात राहा लागन असा वाटे. बिनाघरांच कसं होईन अशी चिंता मनाले खात होती. पण सरकारची योजना भेटली. आता स्वत:चं घर हाये. आमी मायलेक खुस आहो. सरकारले आन सरकारच्या समाज कल्याण विभागले लई लई धन्यवाद!'

**– सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

## घरकुलामुळे प्रतिष्ठा मिळाली

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात विविध विकासकामांच्या पाहणीसाठी आणि कोरोना उपाययोजनेचा आढावा घेण्यासाठी पोहोचले. शेजारीच खडखड धरणाजवळ असणाऱ्या ढापरपाडा या निसर्ग सौंदर्य लाभलेल्या गावात पोहोचले. जव्हार तालुका पर्यटनदृष्ट्या समृद्ध होऊ शकतो, हे मुख्यमंत्र्यांच्या कलासक्त नजरेने ओळखले. पर्यटनावर चर्चा सुरू होती तोच या गर्दीत एक तरुण स्वत:च्या लग्नाची पत्रिका घेऊन आला आणि त्याने मुख्यमंत्र्यांना लग्नाचे निमंत्रण देऊन सांगितले, माझे घर हे शासनाच्या ग्रामीण आवास योजनेतून तयार झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. त्यांनी तत्काळ त्याच्या लग्नाचे आमंत्रण स्वीकारून त्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कु. विठ्ठल रमेश पारधी असे या तरुणाचे नाव.


विठ्ठल पारधी

महाआवासअंतर्गत शबरी घरकूल योजनेचा तो लाभार्थी. या तरुणाकडे स्वत:च्या हक्काचे घर नसल्यामुळे त्याचे लग्न जुळत नव्हते. त्यामुळे समाजात आणि गावात तो गमतीचा विषय झाला होता. मात्र शासनाच्या महाआवास ग्रामीण घरकूल योजनेमुळे स्वत:च्या हक्काचे घर झाले



आणि त्याचे लग्नही ठरले. घर झाल्यामुळे समाजात गावात मिळालेली प्रतिष्ठा आणि जीवनमानात झालेले बदल याबद्दल विठ्ठल पारधी भरभरून बोलतो आणि शासनाचे आभार मानतो. हक्काचे पक्के घरही मिळाले आणि संसारही सुरू झाल्याचे तो आनंदाने सांगतो.

कोकण विभागात जुलै २०२१ अखेर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ४९,८२१ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. एकूणच महाराष्ट्राच्या आकडेवारीवर नजर टाकली असता विविध घरकुल योजनेत कोकण विभाग हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे ही कोकणासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## झोपडीतून पक्क्या घरात

रायगड जिल्ह्यातील खालापूर नगरपंचायतीच्या हद्दीत क्रांतीनगर या भागात राहणारे संतोष हरिश्चंद्र गायकवाड. हक्काच्या घरापासून वंचित असलेले. कुटुंबात पाच व्यक्ती. वार्षिक उत्पन्न ५० हजाराहूनही कमी. राहायला साधी कुढा-



संतोष गायकवाड

मेढीची झोपडी. कुटुंबात वृद्ध आई-वडील. झोपडीवजा घर... घर कसले... नावाला आसराच जणू.. शौचालय नाही, त्यामुळे खूपच कुचंबना होत होती.

मात्र नगरपालिका मुख्याधिकारी सुरेखा रामदास भणगे यांनी या गरजू वंचित घटकाला हक्काचे घर मिळवून देण्यासाठी योग्य ती कार्यवाही सुरू केली. त्यांनी



शासनाच्या रमाई आवास योजनेंतर्गत श्री. गायकवाड यांना हक्काचे पक्के घर मिळवण्यासाठी त्यांचा प्रस्ताव साहाय्यक आयुक्त, समाजकल्याण व त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला. प्रस्ताव परिपूर्ण असल्याने तत्काळ मान्यता मिळाली व श्री. गायकवाड यांना घर मंजूर झाले. हक्काचे पक्के घर आता मिळाल्याने गायकवाड कुटुंब आनंदी व समाधानी आहे. हे घर लवकरच बांधून होणार असल्याने हक्काच्या पक्क्या घरात गृहप्रवेश करण्यासाठी आपण आतूर असल्याचे गायकवाड कुटुंबीय सांगतात.

**– मनोज सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी, रायगड

## मोकळे आणि हवेशीर घर

'सर्वांसाठी घरे- २०२२' या मोहिमेंतर्गत धुळे जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी शबरी आदिवासी घरकुल योजना, रमाई आवास योजना, पारधी आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

शिरपूर तालुक्यातील धुमालकातर



राकेश पावरा

गावचे राकेश बादल पावरा यांना शबरी आदिवासी आवास योजनेतून घरकूलाचा लाभ देण्यात आला. डोंगराळ भाग असल्याने येथे पावसाचे प्रमाण अधिक आहे. त्यात त्यांचे कौलारू घर होते. त्यामुळे पावसाळ्यात घराला ठिकठिकाणी गळती लागत असे. मात्र, शबरी आदिवासी घरकूल योजनेच्या माध्यमातून त्यांना घरकूल मंजूर झाले. त्यांची स्वत:ची जागा



शांताराम मालचे

होतीच. घरकुलासाठी टप्प्याटप्प्याने निधी मिळाला. त्यात त्यांनी थोडी पदरमोड करून छानसे घरकूल उभारले. त्यामुळे पावसाळ्यात घर गळण्याची चिंता मिटली आहे. या नव्या घरामुळे पत्नी, मुलेही आनंदी आहेत. पाणीपुरवठा योजनेचा नळ, वीज, शौचालय आदी सुविधाही उपलब्ध झालेल्या त्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे.

शिंदखेडे तालुक्यातील गोराणे गावचे शांताराम रुमाल्या मालचे यांनादेखील शबरी आदिवासी आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यात आला. गावांत त्यांची स्वत:ची जागा होती. मात्र, घर नव्हते. त्यामुळे भाड्याच्या घरात ते राहत होते. शेतीत रोजंदारी करून उदरनिर्वाह

करतात. त्यामुळे स्वतःचे घर बांधण्यासाठी पुरेशी रक्कम नव्हती. २०१९-२० मध्ये त्यांना घरकुल मंजूर झाले. त्यासाठी चार टप्प्यात एक लाख २० हजार रुपयांचा निधी मिळाला. त्यातून त्यांचे स्वतःचे घर आकारास आले. 'नवे घर मोकळे आणि हवेशीर आहे. नव्या घरात मुलांसह वास्तव्य करण्याचा खूप आनंद आहे. मुलेही नव्या घरात रमली आहेत. त्यांना अभ्यासासाठी आता मोकळीक मिळाली आहे.', अशा भावना श्री. मालचे यांनी व्यक्त केला.

**– गोपाल साळुंखे,**
माहिती सहायक, धुळे

## जीव सुरक्षित झाला

१५ वर्षांपूर्वी पतीचे निधन झाल्यावर मुलगा, मुलगी आणि सासूबाई यांना घेऊन गावात मातीच्या घरात राहणाऱ्या अलकाताईंना कधी त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होईल, असे वाटलेही नव्हते. परंतु शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमुळे डोक्यावर पक्के छत मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.


अलका देशमुख

वर्ध्यापासून १० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या वायगाव निपाणी या २ हजार लोकवस्तीच्या गावात राहणाऱ्या आणि मोल मजुरी करून चरितार्थ चालवणाऱ्या अलका देवीदास देशमुख यांच्यासारख्या गरिबांचे पक्क्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरते तेव्हा या योजनेचा उद्देश सफल होतो, असे वाटते.

अलकाताई यांच्या पतीचे १५ वर्षांपूर्वी निधन झाले. तेव्हापासून कुटुंबाचा चरितार्थ चालवण्याचा भार त्यांनी आपल्या खांद्यावर घेतला. दोन मुले आणि सासूबाई यांची जबाबदारी त्या पार पाडत असताना ऑगस्ट २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीने त्यांचे मातीचे राहते घर पडले. त्या वेळी मुलगा आणि अलकाताई घरातच होत्या. मात्र त्यांचा जीव थोडक्यात वाचला. त्यांचे आवास योजनेच्या यादीत नाव होतेच. घर पडल्यामुळे त्यांना प्राधान्याने ते मंजूर करण्यात आले.

फेब्रुवारी २०२१ मध्ये बांधकामाला सुरुवात झाली. शासनाकडून १ लक्ष ६० हजार रुपये, त्यांनी स्वतः रोहयोंतर्गत स्वतःच्या घरासाठी केलेले काम आणि नातेवाईकांनी केलेली मदत यामुळे ४ महिन्यात ३ खोल्यांचे पक्के घर बांधून झाले. चार महिने भाड्याच्या घरात राहिल्यामुळे आणि भाडे परवडत नसल्यामुळे आम्ही लवकर गृहप्रवेश केला, असे अलका यांनी सांगितले. घर पडून जीव जाणार नाही, याची खात्री असल्यामुळे आता रात्री शांत झोप लागते, असेही अलका भावुक होऊन सांगतात.

**– मनीषा सावळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

## घर आमचे मनासारखे

स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न सत्यात उतरण्यापेक्षा दुसरा मोठा आनंद तो कोणता! असा आनंद राजू ठाकरेच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसतो. कुडाच्या घरामुळे असलेली 'सगळी झंजट गेली' या वाक्यातून त्याचा आनंद प्रकटही होत होता. शासन आणि ग्रामपंचायतीविषयी असलेली कृतज्ञतेची भावना त्याच्या शब्दातून वारंवार प्रकट होत होती. त्याच्या जीवनात असे क्षण आलेत ते प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून.

नंदुरबार जिल्ह्यात शहादा तालुक्यातील तिखोरा हे अडीच हजार लोकवस्तीचे गाव आहे. याच गावात गोमाई नदीच्या किनाऱ्यालगतच्या भागात राजू ठाकरेचे जुने कुडाचे घर होते. तुटलेल्या कौलांवर प्लास्टिकचा कागद आच्छादून पावसापासून संरक्षण करायची कसरत दरवर्षीची. पावसाचे पाणी घरात आले की, काही दिवस जमिनीतील ओलावा कायम राहत असे. लहानशा घरात तीन मुलांचा संसार सावरताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागे. जोरदार पाऊस आल्यावर वस्तीतून नदीकडे जाणारे पाणी घरातही येत असे.

राजू स्वतः मालेमजुरी करतात. त्यांची पत्नी रमणबाईदेखील मजूरी करून त्यांना मदत करते. मुलांना चांगले शिक्षण द्यावे असे वाटत असूनही परिस्थितीमुळे मर्यादा येतात. अशा परिस्थितीत स्वतःचे पक्के घर बांधणे त्यांच्यासाठी केवळ एक स्वप्न होते. त्यामुळे सरपंच परशुराम भिल यांनी प्रधानमंत्री आवास योजनेविषयी माहिती दिल्यानंतर खरंच घर मिळेल किंवा कसे, याविषयी त्यांच्या मनात शंका होती.

नोव्हेंबर २०१९ मध्ये त्यांना योजनेंतर्गत पहिला हप्ता मिळाल्यानंतर घर मिळण्याबद्दल त्यांच्या मनात विश्वास निर्माण झाला. पूर्वी झालेला त्रास परत होऊ नये, यासाठी चांगले घर बांधण्याचा निश्चय त्यांनी केला. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचा लाभ मिळावा, यासाठी घराच्या बांधकामासाठी त्यांनी स्वतः कष्ट घेतले. काम बंद असताना इतर ठिकाणी मजूरी करून घरासाठी अधिकची रक्कम उधारही घेतली. ग्रामसेवक अनिल कुंवर यांनी त्यांना सहकार्य केले.


राजू ठाकरे

राजू यांची सर्व धडपड 'मनासारखे' घर उभारण्यासाठी होती. त्यांच्या परिश्रमाला फळदेखील मिळाले. सिमेंट काँक्रिटचे आणि छताला पत्रा बसवलेले घर बांधून तयार झाले. घरात आवश्यक सुविधाही

झाल्या आहेत. त्यासाठी त्यांना १ लाख २० हजार रुपये अनुदान आणि १९ हजार रुपये मजुरीचे मिळाले. घर मिळाल्याने आज कुटुंबातील सर्व मंडळी समाधानी आहे. त्यांच्याशी बोलताना स्वप्नातले घर मिळाल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. 'खूप समाधान वाटत आहे. घराच्या सगळ्या समस्या दूर झाल्या. दरवर्षी घर दुरुस्तीची कटकटही आता नाही. पावसाळ्यात होणारा त्रास वाचेल. मनासारखे घर तयार झाले.' असे राजू ठाकरे म्हणतात. तर 'नव्या घरात आता सुरक्षित वाटते. मुलींच्या दृष्टीनेही हे घर चांगले आहे. मेहनत घेतली पण त्रास खूप कमी झाला आहे.' अशा भावना रमणबाई यांनी व्यक्त केल्या.

**– डॉ. किरण मोघे,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## स्वप्न पूर्ण झाले

महाआवासअंतर्गत रमाई आवास योजनेमुळे आपले घराचे स्वप्न पूर्ण झाल्याचे रिक्षाचालक संभाजी मोरे अगदी समाधानाने सांगतात. श्री. मोरे यांना रमाई आवास घरकूल योजनेतून २ लाख ५० हजार रुपये इतके अनुदान तीन टप्प्यात प्राप्त झाले. स्वत:कडील २ लाख ५० हजार रुपये खर्च


संभाजी मोरे

करून त्यांनी मिरज शहरातील पूर्व म्हाडा कॉलनीतील रमा उद्यान मिरज येथे ४५० स्क्वेअर फुटाचे टुमदार आरसीसी घर उभारले आहे. घराविषयी बोलताना श्री. मोरे म्हणाले, 'रिक्षा व्यवसाय करून जेमतेम जगणे होत होते. १३ वर्षे भाड्याच्या घरात राहून स्थैर्य लाभत नव्हते. जास्तीत जास्त दोन-तीन वर्षे एका ठिकाणी राहता येत होते. प्रत्येक वेळी भाड्यासाठी दुसरे घर पाहणे, सामानाची हालवाहालव, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न यामुळे छोटे का असेना पण स्वत:चे घर असावे, असा मनात विचार कायम घोळत असायचा.

परिस्थितीमुळे शिक्षण न मिळाल्यामुळे नोकरीही कुठे मिळत नव्हती. अशा वेळी ट्रॅक्टरवर मोलमजुरी करण्यासाठी जाऊ लागलो. त्यातच रिक्षाही चालवायला शिकलो. मनामध्ये ठाम विचार करून रिक्षा रात्रंदिवस चालवून इतरही कामे करत घराचा गाडा ओढत होतो. अशा वेळी ५०० स्क्वेअर फुटाचा प्लॉट मिरज शहरापासून २ कि.मी. बाहेर खरेदी केला. त्यानंतर घर उभारणीसाठी प्रयत्न सुरू केले. याच वेळी घर बांधणीसाठी समाज कल्याण विभागाकडून रमाई आवास योजनेतून अर्थसाहाय्याची माहिती मिळाली आणि त्यासाठी पाठपुरावा सुरू केला. या पाठपुराव्याला यश आले. रमाई आवास घरकूल योजनेतून २ लाख ५० हजार रुपये इतके अनुदान मिळाले. याच अनुदानाच्या मदतीतून ४५० स्क्वेअर फूटाचे बांधकाम केले. भाड्याच्या घरापासून सुरू झालेला जीवनाचा प्रवास स्वत:च्या घरात येऊन पूर्ण झाला.'

**– वर्षा पाटोळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

## मिळालं हक्काचं घरपण

'उन्हाळ्यात उकडतंय... पावसाळ्यात गळतंय अन् हिवाळ्यात कुडकुडतंय अशीच काही मोडकळीस आलेल्या आणि सतरा ठिकाणी डागडुजी केलेल्या आमच्या कच्च्या घरांची अवस्था होती. दिवसभराच्या मोलमजुरीत आज बांधू, उद्या बांधू नव्या घराचा हा विचार कथेतील माकडाच्या घराच्या विचारासारखा उद्याच्या भाकरीसाठी आजच्या रात्रीच्या काळोखात विरून जायचा. प्रधानमंत्री आवास, रमाई आवास योजनेतून हक्काचा निवारा तर मिळालाच सोबत घरपणही मिळालं,' अशा समाधानाच्या प्रतिक्रिया या योजनेच्या लाभार्थ्यांनी बोलून दाखवल्या.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळगावच्या ६०


सविता तळगावकर

वर्षीय सविता सत्यवान तळगावकर यांना प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये घरकूल मंजूर झाले. घरबांधणीसाठी त्यांना एक लाख रुपये तीन हप्त्यांमध्ये मिळाले. अजून २० हजाराचा शेवटचा चौथा हप्ता मिळणार आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमधून १८ हजार आणि शौचालयाचे ११ हजार मिळणार आहेत. ४० वर्षांपासून जुन्या कौलारू घरात त्या राहत होत्या. सध्या या घरात त्या व त्यांचे पुतणे समाधानाने राहत आहेत.


अरुण चव्हाण

तळगावचे ६० वर्षीय अरुण भिवा चव्हाण यांनाही प्रधानमंत्री आवास योजनेमधून घरकूल मंजूर झाले व १ लाख २० हजार व शौचालय आणि महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे ३० हजार त्यांना मिळाले. स्वत:कडील थोडे पैसे घालून त्यांनी हवे तसं पक्कं घर बांधून घेतले. पत्नी अनिता, तीन मुलांसह ते या घरात राहत आहेत. हक्काच्या नव्या घरात पत्नी व मुलांसह राहताना एक वेगळं घरपण आणि आनंद मिळत असल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले.

अणाव या गावच्या ७० वर्षीय रुक्मिणी शंकर जाधव यांना रमाई आवास योजनेतून २०१९-२० साली घरकूल मंजूर झाले. गेल्या दोन महिन्यांपासून त्या या घरात


रुक्मिणी जाधव

सुनेसह समाधानाने राहत आहेत. शासनाच्या या योजनेतून घरकूल पूर्ण करण्यासाठी कोणतीही अडचण आली नसल्याचे त्या सांगतात. नव्या घराचा एक वेगळाच आनंद असतोय आणि तो मी घेत आहे, असे श्रीमती रुक्मिणीबाई म्हणाल्या.

**– प्रशांत सातपुते,**
जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

## सर्वात आनंदाचा क्षण

नाशिक तालुक्यातील गौळाणे गावातील मीराबाई चुंबळे यांनी २००४ मध्ये पतीच्या निधनानंतर शेतीच्या आधाराने आपल्या तिन्ही मुलांचे शिक्षण पूर्ण केले. आईची मेहनत आणि शिक्षणाच्या आधारे आज त्यांचा मोठा मुलगा नोकरी करतो, दुसरा मुलगा फोटोग्राफर, तर सर्वात लहान मुलाचा पोल्ट्री फार्म आहे. तिन्ही मुलांना आपल्या पायावर उभे केल्यावर स्वत:च असं एक घर असावं या उद्देशाने मीराबाईनी प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुलाचा लाभ मिळावा याकरिता अर्ज केला. त्यानंतर काही दिवसांतच मीराबाई यांच्या अर्जानुसार त्यांना एक- दोन हप्त्यात शासनामार्फत एक लाख २० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आले. शासनामार्फत करण्यात आलेली आर्थिक मदत व स्वत:कडील कष्टाने जमवलेली रक्कम अशा एकूण रकमेत मीराबाई यांनी साधारण १२०० ते १३०० चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या जागेत घराचे बांधकाम केले. घराचे कामदेखील वेगाने पूर्ण झाले. डिसेंबर २०२० मध्ये मीराबाई व त्यांच्या मुलांनी त्यांच्या घरकुलात प्रवेश केला आहे.



'नवीन घराची चावी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मिळणे ही आमच्या सामान्य नागरिकांसाठी खूप मोलाची आणि अविस्मरणीय गोष्ट आहे', असे श्रीमती मीराबाई म्हणतात. कुटुंबाचं मातीच्या घरातून भक्कम व तिन्ही मुलांच्या दृष्टीने राहण्याची सोय असलेल्या घरात राहायला जायचे स्वप्न प्रधानमंत्री आवास योजना(ग्रामीण)च्या साहाय्याने पूर्ण झाले असल्याचे त्या समाधानाने सांगत होत्या.

नाशिक जिल्ह्यातील तालुका सिन्नर येथील वडजिरी गावातील रामदास दत्तू आंबेकर यांना शबरी आवास योजनेतून घरकुल मिळाले आहे. श्री. आंबेकर आपल्या भावना व्यक्त करताना म्हणतात, 'मीही माझ्या हक्काच्या घरासाठी स्वप्न बघितले, पण परिस्थितीमुळे मला ते पूर्ण करण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. अशातच शासनाच्या महाआवास अभियानांतर्गत घरकूल योजनेची माहिती मिळाली. या माध्यमातून मला माझे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शबरी घरकूल योजनेतून घर बांधण्यासाठी १ लाख २३ हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला. यासाठी मी शासनाचे आभार मानतो'

श्री.आंबेकर यांची परिस्थिती बेताचीच!

## मिळाला हक्काचा निवारा

भंडारा जिल्ह्यात महाआवास अंतर्गत २७ हजारांवर घरकुले पूर्ण झाली. महाआवासमुळे गोरगरिबांना एक प्रकारे हक्काचा निवारा मिळाला. १५ जून रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना घरकूल वितरित केले. प्रातिनिधिक स्वरूपात झालेल्या या कार्याक्रमात भंडारा जिल्ह्यातील ५ लाभार्थ्यांना घरकुलांचे वितरण करण्यात आले. घरकुलाची चावी मिळताच लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद मावत नव्हता. हा आनंद व्यक्त करताना लाभार्थी चरण रावजी वंजारी म्हणाले, 'स्वत:च्या घराचा



आनंद अवर्णनीय आहे. हक्काचे स्वत:चे घर असावे, असे सतत वाटायचे. मात्र परिस्थितीपुढे काही एक चालत नव्हते. हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न पूर्ण झाले ते महाआवास योजनेमुळे. आणि मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत या घरकुलाची चावी मिळाली. स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण झाले हा आनंद अवर्णनीयच आहे. महाआवास योजना आमच्या आयुष्यात स्वप्नपूर्ती घेऊन आली. आता स्वत:च्या घरात राहायला मिळणार आहे.'

**जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा**

उत्पन्नासाठी शेळ्या चरायला जाऊन मिळेल त्या पैशात आपला उदरनिर्वाह चालवायचा हेच रोजचे जीवन. कुटुंबासाठी घर म्हणून छोटी झोपडी होती. त्यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर घर मंजूर झाले. त्यांना हक्काचे पक्के घर बांधता आले. 'मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत व नाशिक जिल्ह्याचे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांच्या हस्ते गौरव करून प्रातिनिधिक स्वरूपात ई-गृहप्रवेश करण्यासाठी घरकुलाच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या. हा आमच्या जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण असल्याचे' श्री. आंबेकर सांगतात.

– **अर्चना देशमुख,** माहिती अधिकारी, नाशिक

## घर मिळाले, भटकंती संपली

**भटक्या** विमुक्तांचं नेमकं गाव नसतं. सतत भटकत आज इथं, तर उद्या तिथं असा त्यांचा संचार असतो. अनेक गावात चार दिवस थांबण्यासही कुणी जागा देत नाही. राहण्यास घरं नसतात. त्यामुळे कापडाची पाल किंवा झोपडी हेच त्यांचे निवाऱ्याचे ठिकाण असते. तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथील डवरी गोसावी समाजाचीही हीच परिस्थिती होती. तुळजापूरपासून ४९ कि.मी.वर, तर जिल्हा मुख्यालय उस्मानाबादपासून ६७ कि.मी.वर असलेल्या या गावातील कुटुंबांची संख्या ३१०, तर लोकसंख्या १६६६ इतकी आहे.

गावात अडचण होती ती गरीब, बेघर आणि अतिक्रमण करून वसलेल्या डवरी-गोसावी समाजातील २६ कुटुंबांची. ही सर्व २६ कुटुंबे गावाबाहेर अतिक्रमण करून झोपड्यात राहत होती. गावाच्या



आजुबाजूच्या गावांमध्ये भिक्षा मागून आपला आणि आपल्या कुटुंबाचा कसाबसा उदरनिर्वाह करत होती.

या कुटुंबांच्या अन्न आणि निवाऱ्यासाठी गावकऱ्यांनी अनेकवेळा प्रयत्न केले. जगण्याची सोय कशी-बशी होत असे. पण राहण्याची चिंता होतीच. त्या वेळी आशेचा किरण म्हणून शासनाच्या घरकुल योजनेची माहिती समजली. शासनाने २०११ मध्ये केलेल्या एसईसीसीच्या सर्व्हेनुसार या सर्व डावरी-गोसावी कुटुंबांची नावे बेघर कुटुंबांच्या यादीत समाविष्ट झाली होती. गावात २०१६ मध्ये झालेल्या ग्रामसभेत या कुटुंबांची नावे बेघर म्हणून पीडब्लुएल (कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी) मध्ये पात्र कुटुंब म्हणून समाविष्ट केली होती.

घरकुलांच्या पात्र यादीत नावे आली. मात्र खरी अडचण पुढे होती, ती म्हणजे घर बांधायला स्वत:ची जागा नसणे. या योजनेत जागा नाही तर घरकुलाला मंजुरी नाही, अशी परिस्थिती होती. पण गावातीलच एक दानशूर महिला भारताबाई सुभाष पाटील या डवरी-गोसावी कुटुंबांच्या मदतीला देवदूत म्हणून धावून आल्या. त्यांनी आपली स्वत:ची जमीन या गरीब कुटुंबांना प्रत्येकाच्या नावे दानपत्र करून घरकूल बांधकामासाठी उपलब्ध करून दिली. यालाच जोड मिळाली ती महाआवास अभियान (ग्रामीण) ची. २०२०-२१ मध्ये अभियान कालावधीत या डवरी-गोसावी कुटुंबांची घरकुले मंजूर करण्यात आली.

गावात निर्माण होणारे गृहसंकूल हे जितके डवरी-गोसावी कुटुंबांसाठी महत्त्वाचे होते. तेवढेच यामागचे शिलेदार असलेले गावकरी व शासकीय यंत्रणेचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठीही होते. त्यामुळे हे गृहसंकूल निर्माण करताना घरकूलांच्या गुणवत्तेबाबत विशेष काळजी घेण्यात आली. सर्वांचे सहकार्य असल्यामुळे गृह संकुलाचे काम बघता-बघता अगदी दोन महिन्यात पूर्ण झाले. अन् या बेघर कुटुंबांना त्यांच्या हक्काचे दर्जेदार गृहसंकूल मिळाले. सर्व घरे एकसारखी झाल्यामुळे माळरान असलेली जमीन सुशोभित झाली. घरकुलासोबतच या कुटुंबांना मनरेगामधून रोजगार व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून शौचालय उपलब्ध करून देण्यात आली. त्याचप्रमाणे जलजीवन मिशनमधून पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमधून गॅस जोडणी आणि सौभाग्य योजनेमधून विद्युत जोडणीचे काम प्रगतीत आहे.

– **यशवंत भंडारे,**
जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद

## घरकुलामुळे अडचण संपली

चंद्रपूर जिल्ह्यातील वढोली या गावात राहणारे प्रमोद तुळशीराम देवगडे यांचे पूर्वीचे मातीचे कच्चे घर होते. त्यांचा छोटासा किराणा व्यवसाय असून त्या व्यवसायावरच त्यांच्या सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. जुने घर मातीचे तसेच घराचे छप्पर मोडके कौलारू असल्यामुळे पावसाळ्यात ते घर



प्रमोद देवगडे

गळत असे. हक्काचे व संरक्षित छप्पर हवे म्हणून त्यांनी शासनाच्या रमाई आवास योजनेसाठी वढोली ग्रामपंचायतमध्ये अर्ज केला आणि अल्पावधीतच घरकूल योजनेतून त्यांना घरकूल मंजूर झाले.

साधारणत: २६९ चौ. फुटाचे घर त्यांनी या योजनेतून बांधले. यासाठी लागणारे १ लाख ३० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य श्री. देवगडे यांना मंजूर झाले. तसेच स्वत:कडील काही रकमेची जमवाजमव करून श्री. देवगडे यांनी स्वत:चे घरकूल बांधले. श्री. देवगडे यांना पक्के घर मंजूर झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा निवासाचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला आहे आणि पक्के घर मिळाल्यामुळे त्यांचे कुटुंब समाधानी आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर

# ‘उद्योग’चा मदतीचा हात

**अर्चना शंभरकर**

**कोविड-१९ च्या संकटात जीव वाचवणे हीच प्राथमिकता बनल्याने राज्याने आरोग्य व्यवस्था बळकट केली. सोबतच आर्थिक चक्र सुरु ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना करून उद्योगाला चालना दिली. उद्योगांना संजीवनी मिळाल्याने उद्योग विभागाने एक पाऊल पुढे टाकत सामाजिक दायित्वाचे पालन केले. अनेक ठिकाणी अन्नछत्र चालवले, कोविड - १९ संबंधित औषध, ऑक्सिजन, पीपीई किट, रुग्णवाहिकादेखील विनाशुल्क पुरवण्यात आली. या माध्यमातून उद्योग विभागाचा मानवी चेहरा जनतेला बघायला मिळाला.**

कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर उद्योग विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या. त्यामध्ये उद्योगांना विविध सवलती देण्यात आल्या. उद्योजकांना भरावे लागणाऱ्या विविध शुल्कांवरील विलंब शुल्क न आकारता देय शुल्क भरण्याचा कालावधी वाढवण्यात आला. भूखंडाच्या विकासासाठी विकास कालावधी विनाशुल्क वाढवण्यात आला. सर्व संबंधित प्राधिकरण यांनी मंजुरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्ती, ना-हरकत प्रमाणपत्रे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवाटा प्रमाणपत्रे प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ.ची लॉकडाऊन कालावधीत समाप्त होणारी वैधानिक मुदत वाढवण्यात आली.

औद्योगिक क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील उद्योगघटकांना डिसेंबर २०२१ अखेरपर्यंत महामंडळाची पाणीपुरवठ्याची थकबाकी एकरकमी अथवा हप्त्याहप्त्याने संपूर्णपणे डिसेंबर २०२१ पर्यंत अदा करतील. त्यांना पाणी देयकाच्या विलंब शुल्कात ५० टक्के सूट देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. वैद्यकीय ऑक्सिजन उत्पादन व संलग्न पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना प्राधान्याने भूखंड वाटप करणे भूखंड वाटपाच्या दरात ५०/२५ टक्के सूट दिली.

## कोविड काळात भक्कम गुंतवणूक

जून २०२० ते जून २०२१ या एक वर्षाच्या कालावधीत, सर्वत्र कोविड १९ चा प्रादुर्भाव असतानाही राज्यातील गुंतवणुकीचा ओघ कमी झाला नाही. या कालावधीत नवीन ५६ सामंजस्य करार झाले. यातून सुमारे एक लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. विविध देशांतून केमिकल, ऑटो, ऑईल ॲण्ड गॅस, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, आयटी, टेक्स्टाईल आदी क्षेत्रात ही गुंतवणूक आली. त्यामुळे सुमारे तीन लाख रोजगार निर्मिती होणार आहे.

## एमआयडीसीची भरीव मदत

महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाने (एमआडीसी) अनेक प्रकारे मदत उपलब्ध करून दिली. यात स्वत:चा खारीचा वाटा



चिखलठाणा औद्योगिक परिसरात एमआयडीसीने उभारलेले सुसज्ज कोविड केअर सेंटर.



**सुभाष देसाई**
उद्योग मंत्री

## आरोग्य क्षेत्रात भरीव काम

कोरोना संकटकाळात राज्य शासनाच्या उद्योग विभागाची कामगिरी सरस राहिली. कोरोनावर मात करत असताना उद्योगाची घडी विस्कटू न देता अर्थचक्र कायम ठेवले. याच काळात औरंगाबाद जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून आरोग्य क्षेत्रात भरीव काम करता आले. एमआयडीसी परिसरातील मेल्ट्रॉन कंपनीमध्ये २५२ खाटांचे कोविड सेंटर सुरू केले. लसी, व्हेंटिलेटर्स, ऑक्सिजन सिलिंडरचा पुरवठा सुरळीत केला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालयांना सर्व तऱ्हेची वैद्यकीय उपकरणे तातडीने पुरवली. या काळात उद्योगांवर परिणाम होऊ नये म्हणून उद्योग विभाग व एमआयडीसीमार्फत आवश्यक उपाययोजना केल्या.



कु. आदिती तटकरे
उद्योग राज्यमंत्री

## मानवतेच्या भावनेतून मदतकार्य

महाराष्ट्र राज्य सातत्याने उद्योग विभागामार्फत उद्योजकांसाठी उद्योगस्नेही वातावरण तयार करत असते. कोविड-१९ च्या आपत्तीमध्येही उद्योगवाढीला चालना दिली गेली. तसेच मानवतेच्या भावनेतून उद्योग विभागाने पुढाकार घेत मोठे मदत कार्य केले. उद्योजकांसोबत असणारा सातत्यपूर्ण संवाद असल्यामुळे हे सहज शक्य झाले आहे. परस्पर सहकार्याच्या जाणिवेतून या आव्हानावर मात करण्यासाठी अनेक उद्योजकांनी मदतीचा ओघ उद्योग विभागाच्या माध्यमातून शासनाकडे वळवल्याने आरोग्य सुविधा, जीवनावश्यक वस्तू उपलब्ध झाल्या.

उचलत सुमारे १०७ कोटी रुपयांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीला रोखीने केली आहे. याशिवाय, संपूर्ण राज्यात विविध स्वरूपाची मदत पाठवण्यात एमआयडीसीने पुढाकार घेतला. यात २१ लाख ६९ हजार ६१८ मास्क वाटले गेले. ५ लाख ५७ हजार २३८ औषध आणि टेस्टिंग किट्स पुरवल्या. ३ कोटी २ लाख ८१ हजार ६०४ साबण आणि सॅनिटायझर दिले, २३८ व्हेंटिलेटर्स, १ कोटी ३१ लाख खाद्य पदार्थांची पाकिटे, ६ हजार बेड्स, ३.५ लाखांहून अधिक हॅन्डग्लोव्हज, ३.५ लाख पीपीई किट्स पुरवल्या, शिवाय १३ लाख रेशन किट्स वाटल्या आहेत. एमआयडीसीने हिंगणा इंडस्ट्रियल परिसरातील ऑक्सिजन सप्लाय सेंटर नागपूरच्या आयुक्तांच्या निर्देशानुसार इमामवाडी आयसोलेशन सेंटरमध्ये हलवले होते. याची ३० खाटांची क्षमता होती. हे कार्यदेखील मदत कार्य म्हणून केले गेले. केवळ एमआयडीसीच्या माध्यमातून एकूण २० कोटी ८२ लाख ६० हजार मुल्य असलेले कार्य झाले आहे. उद्योग विभागाच्या मदतीने राज्याला कोविड-१९ च्या संकटातून सावरायला मदत झाली आहे.

### उद्योजकांचा मदतीसाठी पुढाकार

एमआयडीसीच्या माध्यमातून अनेक मोठ्या उद्योगांनी राज्याला मदतीचा हात पुढे केला आहे. यात इन्फोसिस, लोढीया, सीआयआय कॅपिटल लॅण्ड यांनी ५५८ ऑक्सिजन कॉन्सट्रेटर दिले, ज्याचे अंदाजे मुल्य ३.९ कोटी एवढे आहे. बजाज ऑटो, सीआयआय, फ्लिप कार्ट या कंपन्यांनी ६१ व्हेंटिलेटर्स दिले. पीएसए ऑक्सिजन जनरेटर प्लॅन्टससाठी स्कोडा व्हॉक्सवॅगन, मेर्क लाइफ सायन्सेस, स्वरूप वर्धीनी एनजीओ, सिटेक्स फाऊंडेशन, आय.सी.आय.सी.आय. बँक, औरंगाबाद इंजिनियरिंग सीएसआर, डिआगो, थॉमस कुक यांच्यामार्फत १३ कोटी ५० लाख रुपये अंदाजित किंमत असलेले दोन ऑक्सिजन टॅर्क्स सिंगापूरवरून आयात करण्यात आले. महिंद्रा ग्रुपने नाशिक सिव्हिल हॉस्पिटल येथे ५०० एलपीएमचा ऑक्सिजन प्लान्ट बसवण्यास मदत केली. त्याशिवाय बारामती येथे १००० एलपीएमचा ऑक्सिजन प्लान्ट लावण्यास ते मदत करणार आहेत. त्याचबरोबर कामगारांना भोजनदान, पीपीई किट, एन-९५ मास्कचे वाटप, सॅनिटायझर, फेसशिल्ड, सर्जिकल ग्लोव्हज, सॅनिटायझेशन मशिन्स आणि म्हाडा कोविड केअर सेंटरला १७५ बेड्सची त्यांनी मदत केली आहे. सिमेन्स प्रा.ली.या कंपनीने औरंगाबाद मेडिकल महाविद्यालयास सुमारे २ कोटी ३० लाख रुपयांचे साहित्य या काळात देणगी स्वरूपात दिले आहे.

### दात्यांच्या सुविधेसाठी नोडल अधिकारी

कोविड-१९चा प्रादुर्भाव वाढला त्याचबरोबर देशात येणाऱ्या मदतीचा ओघ पण वाढला. राज्य शासन त्याच्या संलग्न संस्था तसेच शासनाच्या अधिकृत संस्था किंवा वैधानिक संस्था यासाठी मदत पुरवण्याचे कार्य करत होते. यासाठी बाहेरील देशातील देणगीदार मदत पाठवत होते. विनामूल्य आयात केलेल्या मदत कार्याचा अखंड प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासनाने उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केली. परदेशातून आयात केलेल्या विशिष्ट कोविड-१९ मदत साहित्याच्या आयातीवर केंद्राने आयजीएसटीची सवलत जाहीर केली.

### उद्योग संचालनालयाकडून मदत

राज्याच्या उद्योग संचालनालयाच्या माध्यमातून देणगी स्वरूपात आलेल्या मदतीचा तपशीलही निश्चितच उल्लेखनीय आहे. ३३ हजार ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, ६० ऑक्सिजन रेगुलेटर, ४६४ व्हेंटिलेटर्स, ३ हजार पॉवर कन्व्हर्टर, २ लाख ९४ हजार रेमडेसिवीर इंजेक्शन्स, ४०० इन्फ्लेमेटरी डायगोंस्टिक किट, एक ऑक्सिजन जनरेटर, ओरोनेजल मास्क फॉर व्हेंटिलेटर ८ हजार १४७ एवढे देणगी स्वरूपात मिळाले.

### पालकमंत्र्यांचा पुढाकार

औरंगाबादच्या आजूबाजूच्या आठ ते दहा जिल्ह्यातील कोविड रुग्ण संभाजीनगरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा इतर खासगी रुग्णालयात उपचार घेतात. कोरोनाचा प्रादुर्भाव जसा जसा वाढत गेला, तशी आरोग्य यंत्रणा अपुरी पडत गेली. परंतु योग्य नियोजन करून या समस्येवर मात करता आली.

कोविड रुग्णांना तत्काळ तपासणी अहवाल देण्यासाठी या ठिकाणी प्रयोगशाळा कार्यान्वित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्हायरॉलॉजी विभागाला तपासणी यंत्रणा उपलब्ध करून दिली. कोरोना काळात गरजू जनतेला अन्नधान्य, रेशन व जीवनावश्यक वस्तूंचे वितरण केले. आरोग्य यंत्रणा, महापालिका तसेच जिल्हा प्रशासनासोबत सतत बैठका, चर्चा व नियोजन करून कोरोनावर मात करणे शक्य झाले. आज औरंगाबादमध्ये कोविड परिस्थिती नियंत्रणात असून यासाठी तेथील प्रशासन डॉक्टर्स व अन्य अधिकारी, कर्मचारी यांनी केलेली प्रचंड मेहनत कामी आली

## ऑक्सिजन पूर्ततेसाठी सज्ज

उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योग विभागाने 'मिशन ऑक्सिजन स्वावलंबन योजना' अल्पावधीत तयार केली. या धोरणाला १२ मे २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. राज्यात ऑक्सिजन निर्मितिचे नवे घटक आकर्षित करण्यासाठी उद्योग विभागाने प्रस्तावित केलेल्या विशेष प्रोत्साहन योजनेला उत्तम प्रतिसाद प्राप्त होत असून आतापर्यंत जवळपास ८९८ मेट्रिक टन ऑक्सिजन निर्मिती होईल, असे नवे प्रस्ताव शासनाकडे आले आहेत.

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेसाठी ऑक्सिजनची उपलब्धता व नियोजन व्हावे, यासाठी हे मिशन राबवण्यात येत आहे. या मिशनची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. कोरोना साथीच्या नियंत्रणाकरिता करण्यात येत असलेल्या प्रभावी उपाययोजनांतर्गत ऑक्सिजनची उपलब्धता व व्यवस्थापन याकरिता उद्योग विभागामार्फत नियोजन करण्यात येत आहे. या संदर्भाने राज्यामध्ये मेडिकल ऑक्सिजनची उत्पादनक्षमता आणि गरज यामध्ये जवळपास ६०० मेट्रिक टनाची कमतरता दिसून आली आहे.

राज्यातील जिल्ह्यांमध्ये ऑक्सिजन उत्पादन करणाऱ्या प्रस्तावित नवीन तसेच विस्तारीकरण अंतर्गत उद्योग उभारणीकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे आतापर्यंत ५७ औद्योगिक प्रकल्प घटकांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्याद्वारे एकूण ऑक्सिजन उत्पादन क्षमता दिवसाला ८९८ मेट्रिक टन इतकी प्रस्तावित आहे.

राज्यात २३०० मेट्रिक टन प्रतिदिन ऑक्सिजन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या राज्यात १३०० मेट्रिक टन प्रतिदिन एवढी ऑक्सिजन निर्मिती होत असून १८०० मेट्रिक टन प्रतिदिन ऑक्सिजनची मागणी आहे. उद्योग विभागातर्फे ऑक्सिजन उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आश्वासक पावले उचलली असून वैद्यकीय क्षेत्रासाठी लागणाऱ्या ऑक्सिजन क्षेत्रात राज्याची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल होत असल्याचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंह यांनी सांगितले.

असल्याचेही पालकमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

## थायलंडकडून ३१ रुग्णवाहिका

कोरोना विषाणूचा देशात झालेला प्रादुर्भाव पाहता थायलंडच्या बौद्ध उपासकांनी पुढे येऊन देशाला मदतीचा हात दिला आहे. या उपासकांच्या दानभावनेमुळे 'मैत्री थाई' प्रकल्पातून ३१ रुग्णवाहिका मिळाल्या. पुण्यात आयोजित कार्यक्रमात थायलंडचे कौन्सुलेट जनरल थानावत सिरिकुल, उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, दिल्लीचे अनिश गोयल आणि भिक्कू संघाच्या उपस्थितीत या रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले.

थायलंडच्या थेरवादा फॉरेस्ट ट्रॅडिशनचे भन्ते अजान जयासारो यांनी थायलंडमधील बौद्ध उपासकांना सहकार्याचे आवाहन केले होते. तथागत भगवान बुद्धांनी दानभावनेचे सांगितलेले महत्त्व पाहता या आवाहनाला उपासकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दानभावनेतूनच ३१ रुग्णवाहिका प्राप्त झाल्या. 'मैत्री थाई' प्रकल्पाच्या माध्यमातून ही मदत प्राप्त झाली. यापूर्वीही थायलंडकडून ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर आणि व्हेंटिलेटर्स भारताला मिळाले आहेत.



## नव्या उद्योगांना सहकार्य

कोरोना काळात टाळेबंदीच्या कालावधीत अनेक नव्या उद्योजकांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला. शासनातर्फे अशा उद्योजकांसाठी नेहमीच सहकार्याचे धोरण असते. तरुणांना रोजगार आणि स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार योजनेस उत्तम प्रतिसाद मिळत आहे. याअंतर्गत आतापर्यंत ७ हजार ७६१ घटक मंजूर झाले, तर २० ते २३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. नवीन औद्योगिक धोरणानुसार पुढील पाच वर्षात १ लाख घटक आणि सुमारे १० लाख रोजगाराचे लक्ष्य आहे, तर उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मार्च २०२० पासून ३४०० कोटी रुपयांचे प्रोत्साहन देण्यात आले.

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी राज्याने स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया म्हणजेच सीडबीसोबत करार केला आहे. कोरोना काळातही तरुणांना सातत्याने प्रोत्साहित करण्याचे कार्य उद्योग विभागाच्या माध्यमातून होत असल्याचे उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सांगितले.

## पूरग्रस्तांना मदत

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पुढाकाराने राज्यातील कंपन्यांच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून ४०० मेट्रिक टन अन्नधान्य, गृहोपयोगी वस्तुसंच, १२ हजार ५०० बेडशिट, २३ हजार ब्लँकेट/चादर, १६ हजार टॉवेल, दहा हजार मास्क, १ लाख ५ हजार पाणी बॉटल ६५ हजार इतर फूड पॅकेट्स गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवण्यात आले.

**विभागीय संपर्क अधिकारी**

## नवा मार्गदर्शक

# इनक्युबेशन सेंटर

**महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत स्टार्टअप्स व नवउद्योजकांसाठी महत्त्वपूर्ण कार्यक्रम उद्योग विभागाने जाहीर केला आहे. या धोरणात देशात प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाचे इनक्युबेशन सेंटर उभारण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. उद्योग संचालनालयाच्या समन्वयातून राज्यात नवउद्योजकांना विशेष प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने नवी मुंबई येथे जागतिक दर्जाचे 'कॉर्नेल महा ६०' या नावाने इनक्युबेशन सेंटर लवकरच कार्यान्वित होत आहे. कॉर्नेल विद्यापीठ प्रथमच अमेरिकेबाहेर अशा प्रकारचे इन्क्युबेशन बिझिनेस ॲक्सिलेटर सुरु करत असून, याद्वारे महाराष्ट्रातील नवउद्योजकांच्या प्रारंभिक उद्योगाला चालना देण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.**

**डॉ. हर्षदीप कांबळे**

सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांची (एमएसएमई) संख्या राज्यात ६ लाखांहून अधिक आहे. या क्षेत्रात सर्वाधिक रोजगार निर्मिती होत असते. राज्यात सुमारे १४,००० हून अधिक नवसंकल्पनेवर आधारित स्टार्टअप्स नोंदवले असून, त्यांच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना व सोयीसुविधा उपलब्ध करत आहे.

महाराष्ट्राच्या नव्या औद्योगिक धोरणानुसार राज्यात विविध उपक्रम राबवले जात असून उद्योजकांना विविध सुविधा प्रदान करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून उद्योग संचालनालयाच्या समन्वयातून राज्यात नवी मुंबई येथे जागतिक दर्जाचे कॉर्नेल महा ६० हे इनक्युबेशन सेंटर लवकरच कार्यान्वित होत आहे. जागतिक स्तरावर अग्रणी असलेल्या कॉर्नेल विद्यापीठासमवेत राज्य शासनाने यासंबंधी सामंजस्य करार १० डिसेंबर २०२० ला केला असून केंद्राचे कामकाज ऑक्टोबर २०२१ पासून प्रत्यक्षात सुरू होत आहे.

### कॉर्नेल महा ६० उपक्रमांची वैशिष्ट्ये

कॉर्नेल विद्यापीठ प्रथमच अमेरिकेबाहेर अशा प्रकारचे इन्क्युबेशन बिझिनेस ॲक्सिलेटर सुरू करत असून महाराष्ट्रातील नवउद्योजकांच्या प्रारंभिक उद्योगाला चालना देण्यासाठी वर्षभरात ६० उद्योजकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. यामध्ये महिलांसाठी विशेष राखीव जागा असणार आहेत. प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्ष असून त्याद्वारे कॉर्नेल विद्यापीठातील तज्ज्ञ तसेच राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध होईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कॉर्नेल विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळेल.

नवउद्योजक आणि स्टार्टअप्स क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या बऱ्याच तरुणांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. ही अडचण दूर करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपसून प्रयत्न केले गेले. याची परिणती म्हणून १० डिसेंबर २०२० ला राज्य शासन आणि अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

उद्योजक स्टार्ट-अप्ससाठी जागतिक दर्जाची सुविधा असलेले बिझिनेस इनक्युबेशन सेंटर नवी मुंबईमध्ये स्थापित करणे हे महाराष्ट्र सरकारचे खूप मोठे आणि नावीन्यपूर्ण पाऊल आहे. राज्यात नवीन तांत्रिक, उच्च कुशल मनुष्यबळ आणि नावीन्यपूर्ण कल्पना असलेले तरुण उद्योजक यांचा या सुविधेमुळे आत्मविश्वास वाढेल व त्यांची स्वप्नपूर्ती होण्यास मदत होईल.

दरवर्षी ६० नवउद्योजकांना आपल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांना व्यावसायिकदृष्ट्या पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले जातील. कॉर्नेल विद्यापीठाच्या सहयोगातून जागतिक दर्जाचे इनक्युबेशन सेंटर सुरू करणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य ठरले आहे.

कॉर्नेल विद्यापीठातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे राज्यातील तरुणांना योग्य दिशा मिळेल. त्यांच्या कल्पनेला उभारी येईल. हे सेंटर मूर्तरूपात आणण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, आदिवासी विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

प्रशिक्षणार्थी/उद्योजक संपूर्ण महाराष्ट्रातून निवडले जातील आणि विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनाखाली कॉर्नेल टीमद्वारे त्यांची निवड केली जाईल. उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नॅसकॉम, कौशल्य विकास, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य आदी विभागही या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात सहभागी होतील. एम.आय.डी.सी.द्वारे या इनक्युबेशन केंद्राचा सर्व खर्च उचलण्यात येणार असल्याने प्रक्षिणार्थींना या सुविधेचा लाभ विनामूल्य उपलब्ध होणार आहे.

**उद्योगविकास आयुक्त**

Cornell maha60
ACCELERATOR PROGRAM

# लसीकरणात अव्वल

**कोरोनाची दुसरी लाट राज्यात काहीशी कमी होताना दिसून येत आहे. लसीकरणामध्ये महाराष्ट्राने देशात अग्रसेर स्थान कायम राखत दीड कोटींच्या आसपास अधिक नागरिकांना लसीच्या दोन्ही मात्रा (लसीचे डोस) देऊन त्यांना संपूर्ण संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाधानाची बाब अशी की, राज्यातील कोरोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्यादेखील ५० हजारांपर्यंत आली आहे.**

**अजय जाधव**

राज्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाला वेग येत आहे. नुकताच महाराष्ट्राने ५ कोटींहून अधिक लस मात्रांचा टप्पा ओलांडला आहे. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत १ कोटी ४० लाख नागरिकांना दोन्ही डोस देऊन महाराष्ट्राने देशात लसीकरणामध्ये नवीन विक्रम केला आहे.

राज्याने ऑगस्ट मध्ये लसीकरणात स्वत:चेच विक्रम मोडीत काढत नवनवीन विक्रमी कामगिरी केली आहे. २१ ऑगस्ट २०२१ रोजी राज्यात एकाच दिवशी ११ लाखांहून अधिक नागरिकांना लस देऊन आरोग्य विभागाने महाविक्रम नोदविला.

## रुग्णांची संख्या कमी

राज्यात या वर्षीच्या मार्चपासून कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव होण्यास सुरुवात झाली. एके काळी दिवसाला ६० हजार नवीन रुग्णांचे निदान होत होते. दरम्यानच्या काळाता राज्य शासनाने उभारलेल्या उपचाराच्या सुविधा, ऑक्सिजनची उपलब्धता, संसर्ग टाळण्यासाठी केलेले कठोर निर्बंध यामुळे जुनपासून दैनंदिन रुग्णसंख्येत घट होताना दिसून येत आहे. आता ही रुग्णसंख्या ४ हजारांच्या घरात आली आहे. त्यामुळे सक्रिय रुग्णांची संख्या कमी होत आहे.




ऑगस्ट अखेरपर्यंत राज्याचा रुग्ण बरे होण्याचे प्रमाण जवळपास ९७ टक्के एवढे झाले आहे. मार्च आणि एप्रिलमध्ये रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८५ टक्क्यांपर्यंत होते. मे मध्ये ते ९४ टक्के, तर जूनमध्ये ९६ टक्के झाले. राज्यात रुग्णदुपटीचा काळ हा ६५२ दिवस इतका झाला आहे. राज्याचा साप्ताहिक पॉझिटिव्हिटी दर २.४४ टक्के (१८ ऑगस्टपर्यंत) असून राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त पॉझिटिव्हिटी दर असलेल्या जिल्ह्यांमध्ये सातारा (५.४३), पुणे (४.३७), सांगली (४.८३), सिंधुदुर्ग (३.१६), सोलापूर (३.२१), अहमदनगर (४.४२) यांचा समावेश आहे. कोरोना रुग्णसंख्या काहीशी कमी होत असली, तरी तिसऱ्या लाटेचा इशारा पाहता आरोग्य सुविधांमध्ये वाढ केली जात आहे. राज्यात कोरोना उपचाराच्या ६८७५ सुविधा असून ४ लाख ५९ हजार आयसोलेशन खाटा आहेत. त्यामध्ये १ लाख १२ हजार ऑक्सिजन खाटा आहेत. राज्यात ३५ हजारांहून अधिक आयसीयू खाटा असून १३ हजार ६०० व्हेंटिलेटर्स आहेत.

**विभागीय संपर्क अधिकारी**



**राजेश टोपे**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

### लसीकरणाचा विक्रम

राज्याला केंद्र शासनाकडून लसींचा पुरवठा होतो. त्यानुसार साधारणत: राज्यात दररोज सुमारे ३ ते ४ लाख नागरिकांचे लसीकरण केले जाते. लसी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यास एका दिवसाला ११ लाखांहून अधिक नागरिकांचे लसीकरण करण्याचा विक्रम महाराष्ट्राच्या नावावर नोंदवला गेला आहे.

# कौशल्यातून रोजगाराकडे...

**कोरोना संकटामुळे रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने मंत्री नवाब मलिक आणि राज्यमंत्री शंभुराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करत पुढाकार घेतला आहे. कौशल्य प्रशिक्षणाबरोबरच रोजगार उपलब्धतेसाठी विविध कार्यक्रम, योजना सुरू केल्या आहेत. राज्यात यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामुळे राज्यातील युवकांना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होत आहेत.**

**इर्शाद बागवान**

कौशल्य विकास विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या महास्वयंम संकेतस्थळ, ऑनलाईन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात जुलै २०२१ मध्ये १५ हजार ३२० बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला. नोकरीइच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. अशा विविध उपक्रमांमधून मागील वर्षी २०२० मध्ये राज्यात १ लाख ९९ हजार ४८६ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात यश आले, तर चालू वर्षात जानेवारी ते जुलैअखेर ९३ हजार ७११ बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे.

## नोकरीच्या संधीसाठी नोंदणी

रोजगार मिळवण्यासाठी नोकरीइच्छूक तरुणांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि आधार क्रमांकासह नोंदणी करावी. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांनी आपली माहिती अद्ययावत करावी, तसेच कुशल उमेदवारांच्या शोधात असलेले खासगी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजक, कॉर्पोरेट्स यांनीही या संकेतस्थळावर नोंदणी करावी.

## महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रम

कोरोना परिस्थितीत आवश्यक असलेल्या हेल्थकेअर, नर्सिंग, पॅरामेडिकल यांसारख्या क्षेत्रामध्ये विविध ३६ अभ्यासक्रमांमधून येत्या तीन महिन्यात २० हजार इतके प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रमाचा नुकताच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमातून आरोग्य क्षेत्राला विपुल प्रमाणात कुशल मनुष्यबळ उपलब्ध



कौशल्य विकासविषयक योजनांची माहिती देणाऱ्या जनजागृती रथाचा शुभारंभ करताना कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक.



**नवाब मलिक**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग मंत्री

## शाश्वत रोजगार मिळवून देणार

कौशल्य विकास विभागाने पुढाकार घेत तरुणांना रोजगार मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेचा निर्णय, मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रम, स्टार्टअपसाठी विविध प्रोत्साहने, रोजगार मेळावे, विविध सामंजस्य करार, महिला उद्योजकतेला चालना यामधून युवक-युवतींना दर्जेदार कौशल्य विकास प्रशिक्षण आणि त्यानंतर शाश्वत रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी विभागाने पुढाकार घेतला आहे. यापुढील काळातही सर्व योजना प्रभावीपणे राबवण्यात येतील.



**शंभुराज देसाई**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग राज्यमंत्री

## कल्पक उपक्रमांतून रोजगाराच्या संधी

कोरोनामुळे निर्माण झालेल्या अर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास विभागाच्या विविध योजना सध्या फार महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. उद्योग आणि तंत्रज्ञानामध्ये झालेल्या नवनवीन बदलास अनुसरून विभागानेही सर्व योजना, अभ्यासक्रमांमध्ये अनुरूप बदल केले. युवक-युवतींमधील नवसंकल्पनांना चालना देण्यात येत आहे. स्टार्टअप सप्ताहासारख्या उपक्रमातून युवक-युवती अनेक कल्पक उपक्रमांवर काम करत आहेत. यापुढील काळातही विभागाच्या योजना आणि उपक्रमांना अधिक गती देऊन तरुणांमधील कौशल्याला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येईल.

होण्याबरोबरच बेरोजगार उमेदवारांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

### स्टार्टअप्सना प्रोत्साहन

महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटीमार्फत दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताहाला चांगला प्रतिसाद मिळाला असून देशभरातील १ हजार ८४६ स्टार्टअप्सनी या सप्ताहासाठी नोंदणी केली आहे. आरोग्यविषयक ३२०, शेतीविषयक २५२, शिक्षणविषयक २३८ अशा विविध क्षेत्रातील नवसंकल्पना सादर झाल्या आहेत. तरुणांमधील नवसंकल्पनांना प्रोत्साहन देणे, देशातील उद्योजकीय परिसंस्थेला चालना देणे हा या सप्ताह आयोजनामागील उद्देश आहे. सप्ताहातील उत्कृष्ट स्टार्टअप्सना विविध शासकीय विभागांमध्ये त्यांच्या नवसंकल्पनांचा लाभ देण्यासाठी १५ लाख रुपयांच्या कामांचे कार्यादेश देण्यात येतील. नावीन्यता सोसायटीच्या योजनांची माहिती https://www.msins.in या संकेतस्थळावर आहे.

### स्टार्टअप्सना पेटंटसाठी अर्थसाहाय्य

राज्यातील होतकरू तरुणांच्या नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्सना पेटंट मिळवण्यासाठी राज्य शासनामार्फत १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. तसेच स्टार्टअप्सना गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणपत्राकरिताही २ लाख रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य मिळत असून या योजनांचा शुभारंभ करण्यात आला.

नावीन्यता सोसायटी आणि मत्स्यव्यवसाय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र ग्रँड चॅलेंज' उपक्रम राबवण्यात येत आहे. या विभागातील समस्या जाणून घेणे आणि त्यावर नावीन्यपूर्ण उपाय शोधणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### शाळा अर्धवट सोडलेल्यांसाठी अभ्यासक्रम

नियमित विद्यार्थी तसेच शाळा अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी वरदान असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाच्या विविध ३०१ अंशकालीन व पूर्णवेळ अभ्यासक्रमांची माहिती आता नवीन संकेतस्थळावर मिळणार आहे. www.msbsd.edu.in या नव्या संकेतस्थळाचे तसेच मंडळाच्या बोधचिन्हाचे नुकतेच मंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. मंडळामार्फत कमी कालावधीचे विविध ३०१ व्यवसाय अभ्यासक्रम (अॅड ऑन कोर्सेस) चालवण्यात येतात. हे अभ्यासक्रम जिल्हा, तालुकास्तरावर तसेच ग्रामीण भागात मंडळाने मान्यता दिलेल्या १ हजार २६९ संस्थांमध्ये राबवण्यात येत आहेत. विशेषतः खेड्यापाड्यातील, गोरगरीब विद्यार्थी मंडळाच्या मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश घेऊन प्रशिक्षण पूर्ण करतात.

### बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे रोखली

बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाने पुढाकार घेतला असून यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या आधारे मंडळाकडील एकूण ८ शैक्षणिक वर्षातील सुमारे १० लाख डिजिटल डिप्लोमा प्रमाणपत्रे जारी करण्यात येत आहेत. यासाठी क्रॉसफोर्स सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे विकसित लेजीटडॉक हे इथरियम ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरण्यात येणार असून या प्रणालीच्या मदतीने बनावटरहित डिजिटल कागदपत्रे १० सेकंदात जगभरातून कोठूनही ऑनलाईन पडताळणी करता येऊ शकतील. बनावटमुक्त शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठी जगातील सर्वात मोठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य झाले आहे.

### प्रशिक्षणार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग

राज्यातील दहा जिल्ह्यांमधील १२६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शिकणाऱ्या साधारणतः १० हजार प्रशिक्षणार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग उपलब्ध होणार आहे. यासाठी जर्मन ड्युएल सिस्टिम ऑफ ट्रेनिंग या मॉडेलअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार असून याकरिता मंत्री नवाब मलिक यांच्या उपस्थितीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय आणि सिमेन्स लिमिटेड व टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हज ट्रस्ट यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

औरंगाबाद, कोल्हापूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पालघर, पुणे, रायगड व ठाणे जिल्ह्यातील १२६ शासकीय आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या आयटीआयना नजीकच्या उद्योगांशी जोडून त्याद्वारे त्या उद्योगांमध्ये उमेदवारांना ऑन जॉब ट्रेनिंग उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## आयटीआयचा कायापालट

बांधकाम यंत्रसामग्री आणि उद्वाहन (इलेव्हेटर्स) निर्मिती क्षेत्रातील नामांकित कंपनी थायसेनकृप इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासमवेत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचा सामंजस्य करार करण्यात आला. या कंपनीद्वारे त्यांच्याकडील सीएसआर फंडामधून १ कोटी ८० लाख रुपये निधीतून औंध (जि. पुणे) येथील आयटीआयमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित वेल्डिंग वर्कशॉप उभारण्यात येत आहे. टाटा टेक्नॉलॉजी आणि इतर कॉर्पोरेट संस्थांच्या सहयोगातून राज्यातील शासकीय आयटीआयचे आधुनिकीकरण करून त्यांचा कायापालट करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. आयटीआयमधील पायाभूत सुविधा व प्रशिक्षणाचा विकास करण्यासाठी विविध उद्योग स्वत:हून पुढाकार घेत आहेत. आतापर्यंत ५० हून अधिक नामांकित औद्योगिक आस्थापनांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

## आयटीआयमध्ये १.३६ लाख जागा

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत आयटीआय प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्याकरिता 'महाआयटीआय' हे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. संचालनालयामार्फत ग्रीन आयटीआय संकल्पना राबवण्यात येत आहे. प्रवेश सत्र २०२१ साठी राज्यातील ४१७ शासकीय आणि ५४९ खासगी आयटीआयकरिता नुकतीच प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. यंदा शासकीय आयटीआयमध्ये ९२ हजार, तर खासगी आयटीआयमध्ये ४४ हजार अशा एकूण १ लाख ३६ हजार जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत.

## ५ लाख युवकांना ॲप्रेंटिसशिप

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली वाढती बेरोजगारी कमी करण्यासाठी राज्यातील युवकांना रोजगार आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (महाराष्ट्र ॲप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम) राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत चालू वर्षात राज्यातील विविध उद्योग, आस्थापना यामध्ये १ लाख युवकांना ॲप्रेंटीसशीपची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षात ५ लाख सुशिक्षित बेरोजगार तरुणांना या योजनेतून रोजगार आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५ हजार रुपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

सोच मल्टिपर्पज सोसायटीमार्फत आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या सहयोगातून कौशल्य विकास रथाचा उपक्रम राबवण्यात येत आहे. या रथाद्वारे जनजागृती केली जात आहे. कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुणांचे समुपदेशनही केले जात आहे.

## कौशल्य विद्यापीठ



राज्यातील युवक-युवतींना एकात्मिक आणि समग्र स्वरूपाचे कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, तसेच त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्याधारित उच्च शिक्षणाद्वारे रोजगारक्षम करून रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, या हेतूने राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सार्वजनिक-अर्थसाहाय्यित) स्थापन करण्यात आले आहे. यासाठी विधानमंडळाने व राज्यपालांनी संमत केलेला महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी १४ एप्रिल २०२१ पासून अमलात आणण्यात आला आहे. तसेच कायम स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर खासगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यासदेखील मान्यता देण्यात आली आहे.

## कारागीर, कामगारांचे प्रमाणीकरण

राज्यातील विविध कौशल्य धारण करणारे कारागीर, कामगार आदी घटकांना आता कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत प्रमाणित केले जाणार आहे. विशेषत: असंघटित क्षेत्रातील कारागीर, कामगार आदी कुशल घटकांना याचा लाभ होणार आहे. यासाठी राज्य शासनामार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत पूर्व कौशल्यज्ञान मान्यता योजना (रिकग्निशन ऑफ प्रायर लर्निंग-आरपीएल) राबवण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

## 'इंडिया इनोव्हेशन इंडेक्स'मध्ये यश

कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम, स्टार्टअप्सला चालना, वेगवेगळ्या प्रकारचे इनोव्हेशन तथा संकल्पनांचा विकास आदींमधील नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी नीती आयोगामार्फत दिल्या जाणाऱ्या 'इंडिया इनोव्हेशन इंडेक्स'मध्ये महाराष्ट्राने यश मिळवले आहे. नीती आयोगाने 'इंडिया इनोव्हेशन इंडेक्स २०२०' हा आपला दुसऱ्या प्रकाशनाचा निकाल जाहीर केला. यामध्ये महाराष्ट्र राज्य दुसऱ्या स्थानी आले आहे. राज्याने २०१९ मध्ये असलेल्या तिसऱ्या क्रमांकावरून २०२० मध्ये दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

## महिला उद्योजकतेला चालना

राज्यातील महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाला (एसएनडीटी विद्यापीठ) महिलांकरिता एक स्वतंत्र इन्क्युबेशन सेंटर म्हणून मान्यता दिली आहे. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमध्ये स्वतंत्र 'महिला उद्योजकता कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. याशिवाय सोसायटीमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमधील ३० टक्के निधी महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी वापरणे, विद्यार्थिदशेतच महिलांना उद्योजकतेचे प्रशिक्षण देण्यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये 'विद्यार्थिनी उद्योजकता क्लब' स्थापन करणे असे विविध उपक्रमही राबवण्यात येणार आहेत.

विभागीय संपर्क अधिकारी

# भूजल संवर्धनाचा निर्धार

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला १६ जुलै २०२१ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या संभाव्य टंचाईचा अंदाज वर्तवणे, स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबवणे आदी कामे करण्यात येतात. राज्याच्या ग्रामीण भागातील ८५ टक्के भाग पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. तसेच जवळपास ७० टक्के शेती भूजलावर अवलंबून आहे. या यंत्रणेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीचा लेखाजोखा.**

**देवेंद्र पाटील**

राज्यातील जवळपास ८२ टक्के भूभाग बेसाल्ट नावाने ओळखल्या जाणाऱ्या काळ्या पाषाणाने व्यापलेला आहे. तसेच जवळपास ११ टक्के भूभाग रूपांतरित खडकाने (जो पूर्वेकडील महाराष्ट्रात आढळतो) व्यापलेला आहे. अशा प्रकारे राज्यातील ९३ टक्के भूभाग कठीण खडकाने म्हणजे भूजलासाठी अनुकूल नसलेल्या भूस्तराने व्यापलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील उंच सखल भूपृष्ठीय रचना आणि पर्जन्यमानाची विविधता या बाबीसुद्धा भूजलाच्या निर्मितीसाठी अनुकूल नाहीत. यामुळे दरवर्षी पडणाऱ्या पावसामुळे मर्यादित भूजलसाठा निर्माण होतो. परंतु राज्याची भूजलावरची अवलंबिता त्यामानाने फार जास्त आहे. राज्याच्या ग्रामीण भागातील ८५ टक्के भाग पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. तसेच जवळपास ७० टक्के शेती भूजलावर अवलंबून आहे. सुरुवातीला भूवैज्ञानिक कामे कृषी विभागामार्फत, भूजलाशी निगडित कामे उद्योग विभागातील भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत आणि रिग मशीनसंबंधी कामे पाटबंधारे विभागामार्फत केली जात होती. ही सर्व कामे एकत्रित करून तत्कालीन शासनाने १६ जुलै १९७१ रोजी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची स्थापना केली.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे सुरुवातीला प्रामुख्याने सिंचनासाठी साध्या विहिरी, अस्तित्वातील साध्या विहिरींचे पुनरुज्जीवन, भूजलावर आधारित उपसा जलसिंचन योजना इत्यादींसाठी प्रमाणपत्र देण्याचे काम केले जात होते. त्यामध्ये ग्रामीण भागात नळ पाणीपुरवठा योजनांसाठी स्रोत निश्चितीकरणाच्या (विहिरीचे स्थळ निवडणे) तसेच हातपंपासाठी स्थळ निश्चितीकरणाच्या (विंधण विहीर/कूपनलिकाचे स्थळ निवडणे) कामाची भर पडली.

## पाणी टंचाई अहवाल

महाराष्ट्र राज्यातील भूजल पातळीच्या





**उद्धव ठाकरे**
मुख्यमंत्री

## संवर्धन आणि जतन

भूजल संपत्ती ही अतिशय महत्त्वाची असून या संपत्तीचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने गेल्या ५० वर्षात अतिशय महत्त्वाचे काम केलेले आहे. जमिनीवरचे पाणी हे दृश्य स्वरूपात दिसते. त्यामुळे त्याचे नियोजन करणे त्यामानाने सोपे जाते. परंतु भूगर्भात असलेल्या भूजलाचे संशोधन करून नियोजन करण्याचे काम ही यंत्रणा करत आहे. म्हणून या संपत्तीचे संवर्धन आणि जतन करणे अतिशय महत्त्वाचे आहे.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

## लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन

भूजल संपत्ती वाढवण्यासाठी भूजलाचे पुनर्भरण करणे आवश्यक आहे आणि या पुनर्भरणाचे विविध तंत्रज्ञान आणि उपाययोजना या यंत्रणेमार्फत राबवण्यात येत आहेत व विकसित केल्या जात आहेत. त्यामध्ये लोकसहभाग वाढवण्याची गरज आहे. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत शाश्वतता आणावयाच्या दृष्टीने भूजलाचा समग्र विचार करून लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

संनियंत्रणाचे महत्त्वाचे काम भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सन १९७२ पासून करत आहे. याकरिता राज्यात ३६०० पेक्षा जास्त निरीक्षण विहिरी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. दरवर्षी चार वेळा भूजल पातळीचे मोजमाप करण्यात येते. चालू वर्षातील निरीक्षण विहिरींची पाणी पातळी मागील ५ वर्षातील सरासरी भूजल पातळीशी तुलना करून तसेच चालू वर्षातील पर्जन्यमानाचा तालुकानिहाय सरासरी पर्जन्यमानासोबत तुलनात्मक अभ्यास करून संभाव्य पाणी टंचाई अहवाल तयार करण्यात येतो. या भूजल पातळीच्या अभ्यासावरून पेयजल टंचाई अंदाज घेणे सोयीस्कर होते. संभाव्य पाणीटंचाई अहवालामुळे टंचाई भासण्याची शक्यता असणाऱ्या क्षेत्रांमध्ये टंचाई निर्मूलन उपाययोजनांचे नियोजन करणे व राबवणे सोपे होते.

संभाव्य टंचाईचा अंदाज काढण्यामध्ये आणखी अचूकता येण्यासाठी राज्यातील निरीक्षण विहिरींची संख्या ३२,५०० पेक्षा जास्त वाढवण्यात आली आहे. तसेच या निरीक्षण विहिरींची भूजल पातळी नोंदवण्यासाठी व त्यावरून अनुमान काढण्यासाठी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे.

### भूजल मूल्यांकन

महाराष्ट्राची भूपृष्ठीय रचना उंच सखल असल्यामुळे भूजलासंबधी कोणतेही नियोजन करताना पाणलोट हे एकक उपयोगी ठरते. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने राज्याच्या भूभागाचे १,५३५ पाणलोट क्षेत्रांमध्ये विभाजन केले आहे. केंद्र शासनाचे निकष व मार्गदर्शक तत्त्वांनुसार पाणलोट क्षेत्र आधारित भूजल मूल्यांकन करण्यात येते. महाराष्ट्र राज्याचा भूजल अंदाज बांधण्याचे काम १९८४ पासून करण्यात येत आहे. या भूजल अंदाज अहवालामुळे राज्याच्या भूजल विकासाची व व्यवस्थापनाची दिशा ठरवणे तसेच धोरण निश्चित करणे सोयीस्कर होते.

नुकतेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सन २०२० चे पाणलोट क्षेत्रनिहाय भूजल मूल्यांकन पूर्ण केलेले आहे. या भूजल मूल्यांकनाला केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाची मंजुरी प्राप्त झालेली आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांतील १,५३५ पाणलोटांपैकी ६३ पाणलोट अतिशोषित, २८ शोषित, २८७ अंशतः शोषित व १,१५८ सुरक्षित वर्गवारीत व ४ पाणलोट क्षेत्र बाधित वर्गवारीत समाविष्ट आहेत. तसेच ३५३ तालुक्यांपैकी १० तालुके अतिशोषित, ८ तालुके शोषित, ६३ तालुके अंशतः शोषित व २७१ तालुके सुरक्षित वर्गवारीत समाविष्ट असून १ तालुका गुणवत्ताबाधित वर्गवारीत समाविष्ट आहेत.

### स्त्रोतांचे बळकटीकरण

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची शाश्वतता राखण्यासाठी २००२ पासून शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच २००९ पासून राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राबवण्यात आल्या. या दोन्ही योजनांमध्ये विविध पारंपरिक, अपारंपरिक भूजल पुनर्भरणाच्या व जलसंधारणाच्या उपाययोजना राबवण्यात आल्या. छतावरील पावसाचे पाणी टाकीत साठवून/संकलित करून ते उन्हाळ्यात वापरणे किंवा पावसाच्या पाण्याने थेट भूजल पुनर्भरण करणे, इत्यादी उपाययोजना राबवण्यात आल्या. तसेच स्थानिक भौगोलिक व भूस्तरीय रचनेनुसार अनुकूल असणाऱ्या उपाययोजना जसे सिमेंट बंधारा, भूमिगत बंधारा, रिचार्ज शाफ्ट, साधी विहीर/विंधण विहीर पुनर्भरण, साठवण तलाव, छतावरील पाऊस पाणी संकलन, विहीर खोलीकरण, विहिरीतील/ तलावातील गाळ काढणे, जलभंजन, बोअर ब्लास्ट टेकनिक, जॅकेट वेल, फ्रॅक्चर सील सिमेंटेशन, स्ट्रिम ब्लास्टिंग इत्यादी उपाययोजना राबवण्यात आल्या. २००२ पासून आतापर्यंत राज्यात १२,१२४ गावे/वाड्यांमध्ये ६२,८०२ स्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत.

### गुणवत्ता तपासणी कार्यक्रम

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल गुणवत्तेबाबत जागरूक आहे. सुरुवातीला ६ विभागीय प्रयोगशाळा कार्यरत होत्या. एप्रिल २०१५ पासून आरोग्य विभागाकडील १३८ उपविभागीय प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे हस्तांतरित झाल्या आहेत. सध्या एकूण १८३ प्रयोगशाळा मंजूर असून १७७ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. राज्यातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची वर्षातून दोनदा रासायनिक व जैविक तपासणी या प्रयोगशाळांमध्ये करण्यात येते. प्रयोगशाळेत पाण्याचे नमुने



देण्याचे काम जलसुरक्षकांमार्फत करण्यात येते. या सर्व प्रयोगशाळांमध्ये एकूण १७ रासायनिक व २ जैविक घटकांची तपासणी करण्यात येते. पाणी तपासणीचे अहवाल ऑनलाईन केंद्रशासनाने विहित केलेल्या संकेतस्थळावर भरण्यात येतात. भूजल सर्वे क्षण आणि विकास यंत्रणेमधील सहा विभागीय तसेच ९ जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांना राष्ट्रीय अधिस्वीकृती प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

## दुहेरी पंप योजना

हातपंपावर अवलंबून असणाऱ्या वाड्या/वस्त्यांसाठी नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे घरोघरी किंवा घराजवळ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे शासनाचे ध्येय आहे. अशा वाड्या/वस्त्यांसाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत प्रथम दुहेरी पंप लघू नळ पाणीपुरवठा योजना विकसित करण्यात आली. अशा हातपंपावर अवलंबून असणाऱ्या वाड्या/वस्त्यांसाठी तेथील अस्तित्वातील विंधण विहिरींवर हातपंपासोबतच सिंगल फेजचा, कमीत कमी अश्वशक्तीचा विद्युत पाणबुडी पंप बसवून दुहेरीपंप योजना विकसित करण्यात आली आहे.




दुहेरीपंप योजनेच्या यशस्वितेनंतर अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या वापरावर अधिक भर देण्याच्या दृष्टीने राज्यात वीज पुरवठा नसलेल्या गाव/वाड्या/वस्त्यांमध्ये सौर ऊर्जेवर आधारित दुहेरीपंप लघू नळ पाणीपुरवठा योजना विकसित करण्यात आली. आजपावेतो एकूण २,९१५ विद्युत ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप लघू नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात आल्या. तसेच एकूण ५,२६१ सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप लघू नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात आल्या.

## जलस्वराज्य प्रकल्प

जलस्वराज्य टप्पा-१ च्या यशस्वी अंमलबजावणीनंतर जलस्वराज्य टप्पा-२ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत सन २०१४ पासून राबवण्यात आला. जलस्वराज्य टप्पा-२ मधील भूजल घटकांतर्गत वेधशाळा बळकटीकरण या उपप्रकल्पांतर्गत राज्यातील वेगवेगळ्या कृषी हवामान क्षेत्रात कृषी खात्यामार्फत बसवण्यात आलेल्या २,०६२ स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे उपलब्ध होणारी माहिती, जून २०१९ पासून विनामूल्य उपभोक्त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये अस्तित्वातील पुणे व रायगड येथील जलवेधशाळेंचे बळकटीकरण करण्यात आलेले आहे.

## महाराष्ट्र भूजल अधिनियम

महाराष्ट्र शासनाने यापूर्वी महाराष्ट्र



**गुलाबराव पाटील**
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

## देशपातळीवर दखल

भूजल यंत्रणेतील भूवैज्ञानिक, अभियंते, भूभौतिक तज्ज्ञ, रसायनी यांनी गेल्या ५० वर्षांमध्ये आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा कस लावून राज्यातील गोरगरीब व दुर्गम भागातील जनतेला पिण्याच्या पाण्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यातच या यंत्रणेचे यश आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने राबवलेल्या भूजल पुनर्भरणाच्या योजना असो वा भूजल व्यवस्थापनातील पथदर्शी प्रकल्प असो त्याच्या यशस्वितेची दखल देशपातळीवर घेण्यात आली आहे.



**संजय बनसोडे**
पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री

## सक्षम व शाश्वत व्यवस्था

दुर्गम व ग्रामीण भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची एक सक्षम व शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यात भूजल सर्वेक्षण अणि विकास यंत्रणेचा मोलाचा वाटा आहे. राज्याच्या भूजलाच्या दृष्टीने अनेक आव्हाने आहेत. त्यास समर्थपणे तोंड देण्याकरिता या क्षेत्रात यंत्रणेस सबळ करून दूरगामी धोरण आखणे व त्यावर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ लागू केला होता. परंतु सदर कायदा केवळ पिण्याच्या पाण्याशीच मर्यादित होता. त्यामुळे महाराष्ट्र राज्याने महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ तयार केला. हा कायदा राज्यात १ जून २०१४ पासून लागू झालेला आहे.

## नावीन्यपूर्ण प्रकल्प

भूजल पुनर्भरणास उपयुक्त क्षेत्र दर्शक नकाशे तयार करण्याचे काम भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण ४३,२६४ गावांचे भूजल पुनर्भरणास उपयुक्त क्षेत्र दर्शक नकाशे तयार करण्यात आले आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या मूळ कामांव्यतिरिक्त अटल भूजल योजना व केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प या दोन नवीन योजना सुरू आहेत.

## अटल भूजल योजना

भूजलाच्या अनियंत्रित उपशामुळे होत असलेली भूजल पातळीतील घसरण थांबवण्याकरिता केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील सात राज्यात केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना राबवण्याचा निर्णय घेतला असून यात महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे.

राज्य शासनाने ही योजना राबवण्याकरिता २६ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. राज्यातील भूजल उपशाच्या दृष्टीने अतिशोषित, शोषित, आणि अंशतः शोषित क्षेत्र असलेल्या पाणलोट क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले आहे. १३ जिल्ह्यातील ७३ पाणलोट क्षेत्रातील १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४३ गावांची निवड केलेली आहे. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, जळगाव, जालना, लातूर, उस्मानाबाद, अमरावती, बुलडाणा व नागपूर जिल्ह्यांचा समावेश होतो.

## राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने जलविज्ञान प्रकल्प टप्पा-१ व जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ यशस्वीरीत्या राबवला आहे. जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ चा पुढील टप्पा म्हणजेच राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प आहे. जलसंपत्तीच्या माहितीची गुणवत्ता, व्यापकता व उपलब्धतता वाढवणे तसेच जलसंपत्ती व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांची क्षमता वाढवणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प हा जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने राबवण्यात येणार आहे.

## सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम

या वर्षी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला १६ जुलै २०२१ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. यामध्ये संपूर्ण राज्यातील पदवी व पदव्युत्तरमधील भूशास्त्र, भूगोल, कृषी विषयांच्या विद्यार्थ्यांना त्याचप्रमाणे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, जलसुरक्षक, राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र यांचे स्वयंसेवक तसेच महिला बचतगट अशा जवळपास एक लक्ष भूजल वापरकर्त्यांना राज्यातील भूजलाची परिस्थिती, भूजल उपलब्धतता, भूजलाचे पुनर्भरण, भूजलाची गुणवत्ता व भूजलाचे व्यवस्थापन इत्यादी विषयांवर ऑनलाईन उद्बोधन करण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये यंत्रणेतील सेवानिवृत्त भूवैज्ञानिकांचा सहभाग घेतला जाणार आहे. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांसाठी पाणी या विषयावर चित्रकला, निबंधस्पर्धा इत्यादी घेण्याचे योजिले आहे.

राज्यातील विविध भागातील भूजल पातळी शाश्वत ठेवण्याकरिता पाऊस पाणी संकलन करून ५०,००० विहिरींचे व विंधन विहिरींचे पुनर्भरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, १५ वा वित्त आयोग, सामाजिक दायत्व निधी (सीएसआर फंड) इत्यादीमधून करण्याचे नियोजित केलेले आहे. विविध संवर्गातील भूजल वापरकर्त्यांमध्ये भूजलाबद्दल जाणीव जागृती होण्याच्या दृष्टीने 'आओ भूजल जाने' या शृंखलेमध्ये आतापर्यंत २५ वेबिनार घेण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे दरमहा करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत माहिती देण्याकरिता दर महिन्याला 'भूजल वार्ता' प्रसिद्ध करण्यात येत आहे.

## पाणी साठवण योजना

पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत पिण्याच्या पाणी उपलब्ध करून देण्याकरिता राज्यभरात स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना राबवण्याबाबत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने दिलेल्या अहवालाच्या आधारे शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या ग्रामीण भागातील भूजलावर आधारित पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची शाश्वतता टिकवण्यासाठी शिवकालीन पाणी साठवण योजनेचे पुनरुज्जीवन करण्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात आलेला आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

# कामगारांच्या हिताला प्राधान्य

**१९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या स्थापनेनंतर केवळ दोन वर्षातच १९२१ मध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारने मुंबई कामगार कार्यालयाची स्थापना केली. ज्याचे पुढे 'कामगार आयुक्तालय' असे नामांतर झाले. कामगारांसाठी स्थापन झालेले असे आपल्या देशातील पहिलेच कार्यालय होय. या आयुक्तालयाला १०० वर्षे पूर्ण झाली. तब्बल दहा दशकांपासून हे कार्यालय कामगारांची काळजी वाहत आहे. त्यांचे हित जोपासत आहे. या कार्यालयाच्या शतकोत्सवी प्रवासाचा आढावा..**

**डॉ. महेंद्र कल्याणकर**

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने निर्धारित केलेल्या विविध कामगार कायद्यांचे मालकांकडून पालनाबाबतची वस्तुस्थिती, औद्योगिक संबंधांविषयी कार्ये व कर्तव्ये, कामगार कल्याणाच्या विविध योजना, सामाजिक सुरक्षिततेविषयी विविध योजनांची सुयोग्य अंमलबजावणी, इत्यादी कार्यांची जबाबदारी कामगार आयुक्तालयावर आहे.

कामगार आयुक्तालयास प्रत्येक उद्योगामध्ये शांतता आणि सुव्यवस्था स्थापन करणे, अस्तित्वात असणारे विवाद / तंटे यांच्यामध्ये परिणामकारक व योग्यवेळी हस्तक्षेप करून सामंजस्य निर्माण करते. औद्योगिक शांतता कायम राखून, राज्य आर्थिकदृष्ट्या अधिक सबळ आणि उत्पादक होण्यासाठी हातभार लावणे, कामगारांच्या जीवनशैलीत सुधारणा होईल आणि वेतन व सामाजिक सुरक्षितता मिळेल, यासारख्या बाबींचा समतोल राखण्याचे कार्य करते. यामुळे उद्योग व कर्मचारी आणि कामगार यांचे सौहार्दपूर्ण संबंध कायम राखण्यासाठी वातावरण निर्मिती होते. कामगारांसंबंधी शासनाने पारित केलेल्या नियमांची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आयुक्तालयामार्फत केले जात आहे.



कामगार आयुक्तालयामार्फत तयार करण्यात आलेल्या बोधचिन्हाचे अनावरण करताना कामगार मंत्री हसन मुश्रीफ, सोबत प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल व कामगार आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर.

## श्रमिक संघटनेच्या संकेतांचे पालन

१८व्या शतकात इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर यंत्र विरुद्ध मानव असा संघर्ष सुरू झाला. यंत्राच्या अफाट उत्पादन शक्तीमुळे श्रमिकांचे शोषण सुरू झाले.

त्यामुळे आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेंतर्गत (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन-आयएओ) हे शोषण थांबवण्यासाठी आठ मुख्य संकेत (कोअर कनव्हेंशन्स) आहेत. त्यापैकी सहा संकेत भारताने मान्य केलेले आहेत. आयएओच्या कनव्हेंशन्सचा स्वीकार करून भारताने किमान वेतन अधिनियम, समान वेतन अधिनियम, बालकामगार प्रतिबंध अधिनियम, वेठबिगार पद्धत प्रतिबंध अधिनियम इत्यादी स्वतंत्र अधिनियम पारित केले आहेत. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने निर्धारित केलेल्या विविध कामगार कायद्यांची मालकांकडून होणारी अंमलबजावणी, औद्योगिक संबंधांविषयीची कार्ये व कर्तव्ये, कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षिततेविषयी विविध योजना इत्यादींचे सुयोग्य अंमलबजावणी, या बाबींवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी कामगार आयुक्तालयावर असून ती यशस्वीपणे पार पाडली जात आहे.

## भारतीय कामगार चळवळ

भारतामध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारने व्यावसायिक लाभ व अधिक नफा मिळवण्यासाठी कापड, गिरण्या, कोळसा व खाण उद्योगास चालना दिली. कामगारांनी संप केल्यास त्यांची रवानगी तुरुंगात केली जाई. त्यांच्याकडून नुकसानभरपाई घेण्याचा अधिकार मालकांना होता. अशा विपरीत परिस्थितीत १८८४ मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल ॲण्ड असोसिएशन' स्थापन करून मुंबईतील कापड गिरण्यांमधील कामगारांना संघटित केले. त्यांनी कामगार चळवळीला दिशा दिली. त्यामुळे त्यांना



कामगार चळवळीचे प्रणेते आणि प्रवर्तक समजले जाते पुढे १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (एआयटीयू)' ची स्थापना झाली. अहमदाबाद येथे महात्मा गांधी यांनी 'मजूर महाजन संघ' नावाची कामगार संघटनेची स्थापना केली.

महाराष्ट्राला नारायण मेघाजी लोखंडे यांचा वारसा मिळाल्यामुळे राज्यातील कामगार चळवळ सशक्त व सुदृढ झाली. आज महाराष्ट्रात १७,१७६ इतक्या कामगार संघटना श्रमिक संघ अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असून त्यांची सभासद संख्या ७८,९०,८०२ आहे.

## सामाजिक व आर्थिक पाहणी

कामगार आयुक्तालयातील सामाजिक व आर्थिक पाहणीची सुरुवात कामगारांचे वेतन व सेवाशर्ती, तसेच कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून झाली. तेव्हापासून विविध प्रकार आणि विषयांच्या पाहण्या केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयातर्फे तसेच राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातर्फे प्रस्तावित केल्या जातात. काही पाहण्या राज्यस्तरीय स्वरूपाच्या असतात. काहींचे स्वरूप विशिष्ट केंद्रापुरते मर्यादित असते. यामध्ये कुटुंब राहणीमान, औद्योगिक कामगारांची घरभाडे पाहणी, किमान वेतन, माथाडी कामगार / सुरक्षा रक्षक पाहणी, बालकामगार पाहणी यांचा समावेश होतो. पाहणीत आढळलेल्या सद्य:स्थितीवरून अनुमान / निष्कर्ष काढला जातो. संबंधित उद्योगातील कामगारांबाबत शासनास काम करता येईल, याबाबत शिफारसी केल्या जातात.

## स्वातंत्र्यानंतरचे कामगार कायदे

स्वातंत्र्यानंतर देशाने औद्योगिक विवाद अधिनियम १९४७, कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८, किमान वेतन अधिनियम १९४८, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२, प्रसूती लाभ अधिनियम १९६१, बोनस प्रदान अधिनियम १९६५, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ व इत्यादी असे एकूण १९ कामगार कायदे पारित केले.

## राज्याने पारित केलेले कायदे

- महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६
- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७
- महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे अधिनियम, १९८३
- महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९
- महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१
- महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा अधिनियम, १९७१
- महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३

## किमान वेतन अधिनियम १९४८

हा केंद्र शासनाचा कायदा असून कामगारांची पिळवणूक थांबवणे, त्यांचे वेतन व सेवाशर्ती सुधारून त्यांच्या कामाच्या अनुषंगाने किमान वेतन दर निश्चित करणे, या उद्देशाने हा कायदा अस्तित्वात आला आहे. किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळत असल्यास वेतनातील फरकाची रक्कम मिळण्यासाठी वसुली दावे दाखल करण्याची तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे. कामगार आयुक्तालयाकडून किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत ६७ अनुसूचित उद्योगातील कामगारांसाठी वर्षातून २ वेळा (जानेवारी ते जून आणि जुलै ते डिसेंबर) विशेष भत्ता जाहीर करण्यात येतो.

## बालकामगार प्रतिबंध

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ हा २३ डिसेंबर १९८६ रोजी अस्तित्वात आला. ३० जून २०१६ रोजी बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अशी सुधारणा करण्यात आली. यामध्ये वयाची १४ वर्षे पूर्ण न करणाऱ्या व्यक्तीचा समावेश बालक या संज्ञेत करण्यात आला. त्यासोबतच बालकामगारांना प्रतिबंध करण्यासाठी विविध नियम करण्यात आले. १४ वर्षांखालील बालकास कोणत्याही उद्योग / व्यवसायात कामावर ठेवू नये, याबाबत तसेच कायद्याच्या इतर तरतुदींबाबत प्रबोधन करण्यात येते. कृतिदलामार्फत ऑक्टोबर २०१९ पर्यंत ३१५१ धाडसत्रांचे आयोजन करून ६७५२ बाल कामगारांची धोकादायक उद्योगांमधून मुक्तता करण्यात आली.

## असंघटित कामगार

सर्व असंघटित कामगारांसाठी समावेशक असा अधिनियम म्हणजे असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात ४,९४,२७,८७८ इतके कामगार आहेत. त्यापैकी ९२ टक्के कामगार असंघटित आहेत. सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल म्हणून विकास आयुक्त (असंघटित कामगार) कार्यालयाची स्थापना २००४ मध्ये झाली. या कार्यालयामार्फत असंघटित क्षेत्रातील कामगारांची निश्चिती करून त्यांच्यासाठीच्या विविध कल्याणकारी कायद्यांच्या अंमलबजावणी केली जात आहे.

## घरेलू कामगार कल्याण मंडळ

महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम २००८ नुसार १२ ऑगस्ट २०११ रोजी राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले. असा अधिनियम लागू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले

राज्य ठरले. या अधिनियमानुसार वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या; परंतु ६० वर्ष पूर्ण न झालेल्या घरेलू कामगारांची लाभार्थी म्हणून २०११ पासून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नोंदणी करण्यात येत आहे.

या अधिनियमांतर्गत घरेलू कामगारांसाठी अपघात घडल्यास आपद्ग्रस्तास तत्काळ साहाय्य, लाभार्थींच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य, लाभार्थींच्या अथवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या आजारावर उपचार करण्यासाठी वैद्यकीय खर्चाची तरतूद, महिलांसाठी प्रसूती लाभाची तरतूद आदी बाबींचा लाभ दिला जातो.

## बांधकाम कामगार कल्याण मंडळ

विविध बांधकाम कामगाराच्या (बांधकाम कामगार, नाका कामगार, राष्ट्रीय व राज्य महामार्ग कामगार इ.) कल्याणासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यरत आहे. नोंदणी व नवीन कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी याद्वारे होते. अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत राबवण्यात येणाऱ्या नोंदणी अभियानात ७.४२ लाख बांधकाम कामगार नोंदणी करण्यात आली. बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अटल बांधकाम आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदणीकृत इमारत व इतर बांधकाम कामगारांना शहरीसाठी २ लाख रुपये अर्थसाहाय्य (प्रधानमंत्री आवास योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या २.५० लाख रुपयेव्यतिरिक्त), तर ग्रामीण १.५० लाख रुपये अर्थसाहाय्य दिले जाते. त्याचबरोबर ग्रामीणसाठी जमीन खरेदी व आवश्यक बांधकाम साहित्यासाठी अधिकचे ५० हजार रुपये एवढे अर्थसाहाय्य केले जाते. आरोग्य तपासणी शिबिरे व महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभही दिला जातो. शिवाय बांधकामाची जागा आणि कामगार नाका येथे मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना नाममात्र ५ रुपयांमध्ये मध्यान्ह भोजन पुरवले जाते.

## माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळे

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम १९६९ पारित केल्यानंतर स्वतंत्र माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे या कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे. राज्यात ३६ माथाडी मंडळे असून त्यात सुमारे २ लाख नोंदणीकृत कामगार लाभ घेतात.

सुरक्षा रक्षकांसाठी कायदा करून मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळावर कामगार उपआयुक्त व सहायक कामगार आयुक्त या दर्जाचे कामगार आयुक्तालयाचे अधिकारी अध्यक्ष म्हणून कार्यरत असतात. त्यामुळे भविष्यनिर्वाह निधी योजना, बोनस, पगारी रजा, अपघात नुकसानभरपाई इत्यादी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी कामगार आयुक्तालयाच्या नियंत्रणाखाली करणे शक्य झाले. राज्यात १५ सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत आहेत. त्यात १९२७ मुख्य मालक व ३७,७५६ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.

## ईज ऑफ डुईंग बिझनेस

ईज ऑफ डुईंग बिझनेस धोरणअंतर्गत कामगार आयुक्तालयाच्या एकूण १३ सेवा १०० % ऑनलाईन. ऑनलाईन अर्ज विहित वेळेत निकाली काढणे बंधनकारक. शुल्क ऑनलाईन अदा करता येणे आणि कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करता येणे शक्य. मंजूर झालेले प्रमाणपत्र अर्जदारास डाऊनलोड करणे शक्य. नोंदणीपूर्वी आस्थापनेच्या निरीक्षणाची आवश्यकता नाही.

## लोकसेवा हक्क अधिनियम

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत विविध अधिसूचित सेवा, ऑनलाईन सेवा व कालमर्यादा पुढीलप्रमाणे** : दुकाने व आस्थापनांची नोंदणी - १ दिवस, मुख्य मालक नोंदणी, कंत्राटदारांनी घ्यावयाचा परवाना, परवान्याचे नूतनीकरण (कंत्राटी कामगार अधिनियम) - ७ दिवस, आस्थापनेची / कंत्राटदारांची नोंदणी (इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम) - ७ दिवस, औद्योगिक आस्थापनांची नोंदणी (बिडी आणि सिगार कामगार अधिनियम) - १५ दिवस, आस्थापना नोंदणी (मोटर परिवहन कामगार अधिनियम) - १५ दिवस, आस्थापना नोंदणी, आस्थापनेतील बदलाची नोंद आणि इतर ४ सेवा (आंतरराज्य स्थलांतरीत कामगार अधिनियम) - २१ दिवस.

## सपोर्ट डेस्क स्थापना

केंद्र शासनाच्या, स्टेट कोलॅबोरेशन इंनिशिएटिव्ह स्कीम योजनेंतर्गत ‘पंतप्रधान पारितोषिक योजना’ व ‘नॅशनल ई -गव्हर्नन्स पारितोषिक योजने’द्वारे नागरिकांना ऑनलाईन सेवा अधिक सोयीस्कर, सुलभ होण्यासाठी कामगार आयुक्तालय, मुंबई येथे १ जुलै २०२० पासून सपोर्ट डेस्क कार्यान्वित करण्यात आला.

कामगार आयुक्तालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व बाष्पके संचालनालय या विभागातील ऑनलाईन कामकाज सपोर्ट डेस्कद्वारे केले जाते. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन व आंतरिक व्यापार विभाग (डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री ॲण्ड इंटरनल ट्रेड) अंतर्गत येणाऱ्या बिझनेस रिफॉर्म ॲक्शन प्लॅन (बीआरएपी) अन्वये सुचवलेल्या सुधारणा परिपूर्ण करण्यासाठी सपोर्ट डेस्क कार्यरत आहे.

## महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था

कै. नारायण मेघाजी लोखंडे, महाराष्ट्र

श्रम विज्ञान संस्था ही तत्कालीन बॉम्बे सरकारने जुलै १९४७ मध्ये तत्कालीन कामगार मंत्री गुलजारीलाल नंदा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केली. गेल्या ७३ वर्षात कामगार कल्याण, औद्योगिक संबंध (इंडस्ट्रियल रिलेशन), कार्मिक व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांमधून अनेक व्यावसायिक या संस्थेने घडवले आहेत.

१९७१ मध्ये नागूपर येथे या संस्थेची शाखा 'रीजनल लेबर इन्स्टिट्यूट' या नावाने सुरू करण्यात आली. मुख्य संस्थेच्या बरोबरीनेच प्रादेशिक पातळीवर कामगार आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ घडवण्याच्या उद्देशाने ही संस्था नागपूर येथे स्थापन करण्यात आली.

## कोविड-१९ काळातील मदतकार्य

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी केलेल्या सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांना कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत २ हजार रुपयाच्या अर्थसाहाय्याचा पहिला हप्ता एप्रिल, २०२० मध्ये मंजूर करण्यात आला. या निर्णयानुसार जुलै २०२० पर्यंत राज्यातील ९,१४,७४८ बांधकाम कामगारांच्या बँक खात्यात मंडळाने १८३ कोटी अर्थसाहाय्याची रक्कम जमा केली. दुसऱ्या हप्त्यामध्ये आणखी ३ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात आले. या निर्णयाचा फायदा १० लाख बांधकाम कामगारांना मिळाला असून यासाठी मंडळाने ३०० कोटी रुपये खर्च केले आहेत.

## कामगारांसाठी हेल्पलाईन व मदत

महाराष्ट्र व केंद्र शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोविड संकटात कामगारांना कामावरून कमी करू नये आणि त्यांचे वेतन सुरू ठेवावे, असे सूचित करण्यात आले. या अनुषंगाने कामगार मंत्री महोदयांच्या सूचनेनुसार तत्काळ हेल्पलाईन सुरू करण्यात आल्या. अनेक कामगारांना कामावरून काढून टाकण्याच्या, पगार न देण्याच्या तक्रारी येऊ लागल्या. त्यांच्या निराकरणास प्राधान्य देण्यात आले.

कामगारांना मूळ राज्यात जाण्याची व्यवस्था करण्याकरिता ऑनलाईन नोंदणीची सोय करण्यात आली. http://migrant.mahabocw.in/migrant/labour या संकेतस्थळावर हजारो कामगारांची नोंदणी झाली. पोलीस विभागातील नोडल अधिकाऱ्यांच्या मदतीने सुमारे ८ ते १० लाख परप्रांतीय कामगारांना विशेष प्रवासी ट्रेन आणि बसेसच्या साहाय्याने पाठवण्याची व्यवस्था झाली.

## मध्यान्ह भोजन योजना

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह व रात्रीचे भोजन योजना राबवली जात आहे. बांधकामाच्या ठिकाणी कामगारांची निवासाची पुरेशी व्यवस्था नसल्याने स्वयंपाक करणे जिकिरीचे ठरते. परिणामी आरोग्य व कुपोषणाचे प्रमाण अधिक दिसून



येते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून, मंडळाने नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना कार्यान्वित केली. ही योजना प्रथम टप्प्यात मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे या चार ठिकाणी ५ मार्च २०१९ पासून प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे.

टाळेबंदी कालावधी चालू असल्याने मुंबई / नवी मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर या ४ जिल्ह्यातील बांधकाम विकासक / ठेकेदारांनी नोंदवलेल्या मागणीच्या बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनशिवाय रात्रीचे भोजनदेखील वितरित करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, पालघर, रायगड, कोल्हापूर, इचलकरंजी, वर्धा या ठिकाणी ६२३ बांधकामांवर ८६६५२ कामगारांना मध्यान्ह भोजन तसेच ४५८ बांधकामाच्या ठिकाणी ६४,३१४ कामगारांना रात्रीचे भोजन देण्यात येत आहे.

## कामगारांची संख्या

राज्यात सुमारे ३८ लाख संघटित क्षेत्रातील कामगार असून, सुमारे ३.७५ कोटी असंघटित क्षेत्रातील कामगार असे एकूण ४.१३ कोटी कामगार आहेत. राज्यात २५,७६,८२६ कारखाने असून सुमारे ७४ लाख दुकाने आणि आस्थापना, १३.८४ लाख बांधकाम कामगार (सक्रिय), ३७,१५८ सुरक्षा रक्षक (सक्रिय), १,०१,६९९ माथाडी कामगार (सक्रिय) आणि सुमारे ५,३८,५८९ घरेलू कामगार आहेत.

कामगार आयुक्तालयाच्या स्थापनेस २०२१ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होण्याच्या गौरवास्पद काळामध्ये या आयुक्तालयाचा कार्यभार सांभाळणे ही माझ्यासाठी निश्चितच अतिशय अभिमानाची बाब आहे.

**(लेखक हे सध्या जिल्हाधिकारी रायगड तथा तत्कालीन कामगार आयुक्त आहेत.)**

# सुखनिद्रागार

**गडकोट-किल्ल्यांचे जतन-संवर्धन व्हावे, यासाठी अनेक इतिहासप्रेमी तरुण पुढे आले आहेत. गिरिभ्रमण मंडळे, संस्था, संघटना काम करू लागल्या आहेत. गडकोट-किल्ल्यांच्या संरक्षणाचा जागरच सुरू झाला आहे. स्थानिकांबरोबरच, ऐतिहासिक वास्तुप्रेमी सरसावले आहेत. त्या स्थळांचे महत्त्व पटवून देणारे, स्वच्छता मोहिमा असे स्वयंउत्स्फूर्त उपक्रमही सुरू झाले आहेत. अशा दिलासादायक आणि आश्वासक परिस्थितीत प्रतिसाद म्हणूनच की काय राज्यातील गडकोट-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन, संनियंत्रणासाठी सुकाणू समिती अस्तित्वात आली आहे.**

**निशिकांत तोडकर**

छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराष्ट्र हे एक अद्वैत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले. ते भारतवर्षात विस्तारले. या सगळ्यात त्यांनी गडकोट-किल्ल्यांचे उत्कृष्ट जाळे निर्माण केले. शिवरायांची दुर्ग बांधणीतील, त्यांच्या व्यवस्थापनातील दृष्टी आजही जगभरातल्या तज्ज्ञांसाठी अभ्यासाचा विषय आहे. शिवरायांच्या या दृष्टिकोनाविषयी आपल्याला अधिक जाणून घेता येते ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अष्टप्रधान मंडळातील रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्र' या ग्रंथातून. त्यातील एक उताऱ्यात उल्लेख आहे.. तो थोडक्यात असा.. ...'ज्यास राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण असे पूर्ण चित्तात आणून कोणाचे भरवशावर न राहता त्यांचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा. कोणाचा विश्वास मानू नये.'



गडकोट-किल्ल्यांविषयीची माहिती आपल्या समोर आणण्यासाठी अनेक महान इतिहासकार, अभ्यासकांनी कष्ट घेतले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा दुर्ग बांधणीचा, गडकोट-किल्ल्यांवर प्रेम करण्याची दृष्टी हासुद्धा एक आगळा पराक्रमच आहे. महाराजांच्या दुर्ग बांधणीतील कौशल्यांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासकांनी, इतिहासप्रेमींनी गडकोट-किल्ले पालथे घातले आहेत. त्यांचा इतिहास अनेकविध संदर्भातून ताडून पाहिला आहे. हे संशोधन, पुराव्यांसह प्रबंधातून जगासमोर मांडले आहे. त्यासाठी साहित्य निर्मिती केली आहे. अनेक ग्रंथ, पुस्तके अशा संदर्भ साधनांचा तगडा दस्तावेज तयार करून ठेवला आहे. व्याख्याने, भाषणांतून या गडकोट-किल्ल्यांचे आत्मकथनच आपल्यासमोर ठेवले आहे.

या गडकोट-किल्ल्यांच्या भेटीतून, त्यांच्या आसमंतात काही क्षण घालवण्यानेही आपल्याला त्या ऐतिहासिक घटना-घडामोडीशी जोडून घेता येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसह, मावळ्यांच्या पराक्रमासमोर नतमस्तक होता येणार आहे. याचसाठी गडकिल्ल्यांचे जतन-संवर्धन गरजेचे ठरू लागले आहे. केवळ ऐतिहासिक वारसास्थळांचे पर्यटन या पलीकडेही जाऊन विचार, अभ्यास-संशोधन होतकरू तरुणांमध्येही विकसित झाला आहे. जगभर आता गडकोट-किल्ल्यांचा अभ्यास करणारी पिढी तयार होऊ लागली आहे. तसे अभ्यासक्रम घेऊन प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, संघटना उभ्या राहिल्या आहेत.

## मुख्यमंत्र्यांची ठाम भूमिका

'जगभरात शिवरायांच्या गडकिल्ल्यांची महती पोहोचेल, यासाठी उत्तमोत्तम आणि दर्जेदार छायाचित्रे, ड्रोनसारख्या अत्याधुनिक साधनांद्वारे चित्रीकरण करून ते जगभर पोहोचवा. गडकिल्ले महाराष्ट्राचे वैभव असून त्यांचे जतन आणि संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. दुर्ग संवर्धनातील अडचणींवर मार्ग काढून पुढे कसे जायचे, ते या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी ठरवतील. किल्ल्यांच्या संवर्धनाचा सर्वंकष आराखडा तयार केला जाईल. हे काम करताना गडकिल्ल्यांचे पावित्र्य जपत,

## एकात्मिक प्रारूप

गडकोट-किल्ल्याच्या विकास-संवर्धनाबाबत महाराष्ट्राचे हे मॉडेल सर्वोत्कृष्ट आणि इतरांसाठी आदर्श ठरेल. आपण पहिल्या टप्प्यात या सहा किल्ल्यांचा प्रारूप विकास करणार आहोत. यातील तीन किल्ले हे भारतीय पुरातत्त्व (एएसआय) खात्याकडे आहेत, तर तीन किल्ले राज्य पुरातत्त्व विभागाकडे आहेत. या किल्ल्यांच्या विकासाबाबत एकात्मिक अशा पद्धतीने विचार केला जाईल.

एकंदर हे किल्ल्याच्या विकासाबाबतचे एकात्मिक प्रारूप असेल. याला पथदर्शी प्रकल्पही म्हणू शकतो, असे प्रयत्न राजस्थानमध्ये करण्यात आले आहेत. हा प्रयत्न यशस्वी झाल्याचेही दिसते.

**-डॉ. तेजस गर्गे,**
संचालक, पुरातत्त्व आणि
वस्तुसंग्रहालय संचालनालय.

त्याच्या ऐतिहासिक आणि पुरातत्त्व वारशाला कोणताही धक्का न लावता या किल्ल्यांखालच्या परिसरात सुविधा निर्माण कराव्यात. तिथे पर्यटन केंद्र उभारून पर्यटकांना त्या वैभवशाली वारशाची माहिती द्यावी. गावात पर्यटन केंद्र उभारावे. ऐतिहासिक संदर्भ जपले जावेत. डागडुजी पुरातत्व खात्याच्या निकषाप्रमाणे व्हावी. गडकिल्ल्यांच्या परिसरात नैसर्गिकरीत्या वनराई विकसित करावी. किल्ल्यांच्या परिसरातील जैवविविधता, निसर्ग, पशु-पक्षी यांची देखील जपणूक करा. त्याविषयी पर्यटक आणि संशोधक यांना माहिती द्या. स्थानिकांना विश्वासात घेऊन काम करा. स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल, असे नियोजन करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी केल्या आहेत.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दुर्गप्रेमी प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. मुख्यमंत्र्यांनी किल्ल्यांचे जतन-संवर्धनाची संकल्पना सुस्पष्टपणे मांडली. या बैठकीतच त्यांनी सुकाणू समिती स्थापन करण्याची संकल्पना मांडली आणि तसे निर्देश दिले होते. त्यानुसारच सुकाणू समितीची स्थापना आणि तिची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली. त्यानुसार १ जुलै २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे ही सुकाणू समिती स्थापनही झाली आहे.

## सहा किल्ल्यांचे संवर्धन

पुणे जिल्हा - शिवनेरी (ता. जुन्नर), राजगड आणि तोरणा किल्ला ( दोन्ही ता. वेल्हे). सिंधुदुर्ग जिल्हा - विजयदुर्ग (ता. देवगड), सिंधुदुर्ग (ता. मालवण) आणि रायगड जिल्ह्यातील सुधागड (ता. सुधागड). मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षामार्फत



सुकाणू समितीद्वारे घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. दुर्गप्रेमींना दुर्गसंवर्धनाच्या दृष्टीने काही सुचना करावयाच्या असतील, तर त्यांना त्या cmsankalpkakshamaharashtra.gov.in या मुख्यमंत्री सचिवालयाच्या संकल्प कक्षालाही पाठवता येणार आहेत.

## गडकोट–किल्ल्यांचा ठेवा...

जागतिक वारसा स्थळासाठी महाराष्टातील १२ गडकिल्ल्यांचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवण्यात आला आहे. राज्यात ४०० पेक्षा अधिक किल्ले आहेत. यापैकी केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत ४७, तर राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत ५१ किल्ले असून हे वर्गीकृत किल्ले आहेत. त्यांना आपण राज्य संरक्षित असेही म्हणतो. याशिवाय ३३७ अवर्गीकृत किल्ले आहेत. हे अवर्गीकृत किल्ले महसूल व वन विभागाच्या अखत्यारीत किंवा खासगी मालकीचे आहेत.

राज्य संरक्षित किल्ल्यांपैकी २८ किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम सुरू आहे. जतन संवर्धनामध्ये तटबंदी बुरूज, पदपथ व किल्ल्यांच्या आतील अवशेषांची दुरूस्ती इ. कामे पुरातत्व संकेतानुसार केली जात आहेत. किल्ल्यांपैकी अंबागड किल्ला, माणिकगड किल्ला, नगरधन किल्ला, कंधार किल्ला, कोयरीगड किल्ला, माहुर किल्ला आदी किल्ल्यांच्या संवर्धनाची कामे पूर्ण झाली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील पुर्णगड किल्ल्याचे संवर्धनाचे काम पूर्ण झाले आहे.

शिवनेरी किल्ला परिसर पर्यटन विकास आराखडा मंजूर. आराखड्यामधे मुख्य किल्ला व स्मारकाशी निगडित जतन दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. तटबंदीच्या भिंती, अंबारखाना, राजवाडा तसेच गडावरील प्राचीन लेण्यांची दुरुस्ती, नवीन दगडी पदपथ तयार करणे, बगिचा निर्माण करणे अशी कामे हाती घेण्यात येणार आहेत.

## समाधानाची बाब

सुकाणू समितीच्या रूपाने पहिले पाऊल पडले आहे. गडकिल्ल्यांच्या जतन-संवर्धनाबाबत सुकाणू समिती काम करणार आहे, ही समाधानाची बाब आहे. या प्रयत्नातून त्या किल्ल्याच्या परिसरात रोजगार-उदरनिर्वाहाच्या संधी निर्माण होतील, ही आशादायी बाब आहे. गडकिल्ल्यांचे जतन-संवर्धन हे एका बाजूला आपल्यासाठी भावनिक गोष्ट आहे, तर दुसऱ्या बाजूला एक संरक्षित वास्तु-स्मारक म्हणून ती आहे त्या स्थितीत जतन करण्याची व्यावहारिक जबाबदारीही आपल्याकडे येते.

**- इंद्रजीत सावंत**
इतिहास संशोधक आणि
गडकोट-किल्ल्यांचे अभ्यासक

**माहिती अधिकारी, जनसंपर्क कक्ष,**
**मुख्यमंत्री सचिवालय**

# आधारवड

वाढत्या वृक्षतोडीने वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढले आहे. वृक्ष हे पाखरांचे आश्रयस्थान आहेत, तसेच काही सजीव प्राण्यांचेही. अनेक पशुपक्षी आणि जीवजंतूंचे वृक्ष हे निवासस्थान आहे. त्यामुळेच वृक्षांना 'जगन्मित्र' म्हटले जाते अशा या मित्रांना वाचवण्यासाठी दूरगामी धोरणाची आवश्यकता होती. हे पाऊल शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाने टाकले आहे ते 'हेरिटेज ट्री' कृतिआराखड्यातून..

**डॉ. सुरेखा मधुकर मुळे**

जगण्यासाठी प्रत्येकाला प्राणवायू लागतो की पैसा हे एकदा श्वास बंद करून नोटा मोजा म्हणजे मग पर्यावरणशास्त्र महत्त्वाचे की, अर्थशास्त्र महत्त्वाचे हे लक्षात येईल असे एका पर्यावरण तज्ज्ञाने म्हटले होते. खरे तर साधे सूत्र आहे जिथे वनसृष्टी आहे तिथे जीवसृष्टी आहे. 'वन है तो जल है, जल है तो मनुष्य का कल है', हे आपण नेहमीच ऐकत आलो आहोत, तरी आज आपल्यासमोर गंभीर प्रश्न आहे तो जागतिक तापमान वाढीचा. याचे मुख्य कारण आहे हवेतील प्रदूषण, वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण आणि वाढती वाहनांची संख्या. नैसर्गिकपणे हवेचे प्रदूषण कमी करण्याची क्षमता फक्त वृक्षांमध्ये आहे. यासाठी वृक्षांनी भरलेल्या जंगलाची आणि वनांची आवश्यकता आहे. वृक्ष एक प्रकारे सर्व सजीवांच्या सुंदर आणि सुरक्षित जगण्याचे 'आधारवड'च आहेत. त्यामुळेच वेगवेगळ्या कारणांसाठी होणारी वृक्षतोड थांबवणे अगत्याचे झाले आहे.

वृक्षांचे पर्यावरणीय मूल्य नव्याने सांगण्याची आता गरज नाही. वृक्षापासून प्राप्त होणारे लाकूड, फळे, फुले, याची किंमत निश्चित करता येते पण पर्यावरण संतुलनातील त्याचे महत्त्व आणि मूल्य कसे ठरवणार? शिवाय हे पर्यावरणमूल्य वैयक्तिक आणि सामाजिक पातळीसाठी किती मोठे आणि महत्त्वाचे असेल हे वेगनिराळे सांगायला नको.


सांगली येथील ४०० वर्षांपूर्वीचे झाड

## स्थानिक वृक्ष प्राधिकरण

स्थानिक वृक्ष प्राधिकरणात वृक्षतज्ज्ञांचा समावेश असेल, तसेच वृक्ष प्राधिकरणाने घेतलेले निर्णय हे वृक्षतज्ज्ञांच्या सल्ल्यावर आधारित राहणार आहेत, तर नगर परिषदेच्या बाबतीत वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्याधिकारी राहतील.

## दर पाच वर्षांनी वृक्षगणना

दर पाच वर्षांनी वृक्षांची गणना करण्याचे काम स्थानिक वृक्ष प्राधिकरणाकडून केले जाईल. यामध्ये हेरिटेज वृक्षांची गणना आणि संवर्धनाच्या कामाचाही समावेश आहे. स्थानिक प्रजातींचे वृक्ष लावल्यास ते त्या वातावरणाशी लवकर एकरूप होऊन त्यातून एक समृद्ध अन्नसाखळी विकसित होऊ शकते हे लक्षात घेतले तर करण्यात येणाऱ्या वृक्षारोपणात स्थानिक प्रजातींची रोपे लागतील व त्यांचे जतन होईल हे पाहण्याचे काम ही स्थानिक वृक्ष प्राधिकरणाकडून केले जाईल.

शहरी भागात जिथे जमीन उपलब्ध आहे तिथे किंवा सरकारी मालकीच्या जागेवर वृक्षारोपण करताना ते वैज्ञानिक पद्धतीने स्थानिक प्रजातींच्या संरक्षणाच्या दृष्टीने आणि त्या क्षेत्राच्या ३३ टक्के वनक्षेत्राच्या तरतुदीची पूर्तता करण्याच्या उद्देशाने केले जाईल. वृक्षांची छाटणी करण्याचे एक शास्त्रशुद्ध तंत्र आहे. तंत्राधारित वृक्ष छाटणी केल्यास वृक्षांचे संवर्धन होणे सुलभ होते ही बाबही यामध्ये विचारात घेण्यात आली आहे.

स्थानिक पातळीवर विकास कामांसाठी वृक्षतोड मंजूर केली असेल तर त्या बदल्यात लावल्या जाणारी भरपाई वृक्षलागवड होईल याची काळजी घेणे, त्यांच्या संगोपनाकडे लक्ष देणे, जीपीएस वापरासाठी प्रोत्साहन देणे अशी विविध स्वरूपाची कामे ही स्थानिक वृक्ष प्राधिकरणाकडून करण्यात येणार आहेत.

## स्थानिक वृक्षांची लागवड

वृक्षलागवड करण्याची अनेकांना इच्छा असते परंतु त्यासाठी कोणते वृक्ष कुठे लावायचे, कशा पद्धतीने लावायचे याची माहिती त्यांना नसते. अशा वेळी स्थानिक वृक्ष प्रजातींची माहिती, ते लावण्याची शास्त्रोक्त पद्धत याचे मार्गदर्शन तर वन विभागाकडून केले जाते त्यांचीही या कामी मदत होणार आहे. वृक्षलागवडीसाठी आवश्यक असणारी जमीन निश्चित करणे खूपच गरजेचे असते. काही वेळा जमिनीची मर्यादित उपलब्धता हाही महत्त्वाचा विषय ठरतो. अशा वेळी कुठले वन कुठे आणि कशा पद्धतीने विकसित करावयाचे याची माहिती मिळाल्यास खूपच मदत होते. त्यातून कमी जागेत वनराई आणि वृक्षराजी फुलवता येते. याच्या अनेक पद्धती आहेत जसे की 'मियावाकी वृक्षारोपण, अमृत वन, स्मृती वन, शहरी वन' इत्यादी.

महाराष्ट्र वृक्ष प्राधिकरण वृक्ष उपकर वापरासाठीच्या मार्गदर्शक सूचनाही देणार असून वृक्ष संरक्षण आणि संवर्धनाच्या दृष्टीने आवश्यक असलेली सगळी मदत करतील. वृक्षतोडीच्या दंडाची रक्कम वेळोवेळी निश्चित केली जाणार असून ही रक्कम प्रतिवृक्षास जास्तीत जास्त १ लाख रुपयांपर्यंत मर्यादित राहणार आहे.

## 'हेरिटेज ट्री'चे वय

या धोरणानुसार ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या वृक्षांना 'हेरिटेज ट्री' अर्थात 'प्राचीन वृक्षा'चा दर्जा मिळणार आहे. अशा वृक्षांच्या प्रजाती या विविध असू शकतील व त्याची वेळोवेळी नोंद घेतली जाईल. वृक्षाचा व्यास, त्याचे विविध घटक लक्षात घेऊन वृक्षाचे वय निश्चित करण्याची माहिती किंवा ज्ञान हे वन विभागाकडे असते त्यामुळे हेरिटेज ट्री निश्चित करताना त्यांचे मार्गदर्शन घेऊनच ही कार्यवाही केली जाईल. त्यांच्याशी चर्चा करून पर्यावरण विभाग एक मार्गदर्शक सूचीही निश्चित करत आहे.

वृक्षाचे वय, प्रजाती आणि त्याचे पर्यावरणासाठीचे योगदान या आधारे हेरिटेज वृक्षांच्या आर्थिक मुल्यांकनासाठी प्रोटोकॉल स्थापन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानेही एक समिती गठित केली आहे. या समितीच्या शिफारसीही भविष्यात दिशादर्शक ठरणार आहेत. अनेकदा आपण पाहतो की, विकासकामांसाठी नाइलाज म्हणून काही वृक्षांची तोड करणे गरजेचे ठरते आणि आपण त्यापोटी भरपाई वृक्षारोपण करण्याचे निश्चित करतो. परंतु एक पूर्ण वाढ झालेला मोठा आणि प्राचीन वृक्ष आणि भरपाईपोटी लावण्यात येणारे नवीन वृक्ष यांच्या पर्यावरणीय मूल्यात तफावत असते ती दूर करावयाची असेल, तर त्या वृक्षाच्या वयाच्या संख्येएवढी नवीन झाडे भरपाई वृक्ष म्हणून लावण्याचे धोरण यामध्ये स्वीकारण्यात आले आहे.

## हेरिटेज ट्री धोरण

राज्यातील नागरी भागातील वृक्षांचे संरक्षण, संवर्धन आणि जतन करण्यासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ अस्तित्वात आहे. हा अधिनियम ऑक्टोबर २०२० मध्ये नगरविकास विभागाकडून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्यानंतर विभागाने नागरी भागात नवीन वृक्षांची लागवड करण्याबरोबर अस्तित्वात असलेल्या वृक्षांचे संरक्षण करून त्याचे जतन करण्यावर विभागाने भर देण्यास सुरुवात केली आहे. नवीन वृक्षलागवड करताना प्राचीन आणि अतिप्राचीन वृक्षांचे जतन करण्याच्या दृष्टीनेच हेरिटेज ट्री संकल्पना राज्यात राबवण्याचे निश्चित झाले.

या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. स्थानिक वृक्ष प्राधिकरणाच्या कामावर वेळोवेळी लक्ष ठेवणे, राज्यातील हेरिटेज ट्री वृक्षांचे संरक्षण आणि संवर्धन करणे, हेरिटेज वृक्षतोडीसाठीच्या अर्जाची सुनावणी करणे, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची २०० हून अधिक झाडे तोडण्याच्या अर्जांची सुनावणी घेणे, यासारख्या कामांबरोबर राज्य वृक्ष प्राधिकरण वृक्ष संरक्षण आणि संवर्धनाचे इतर कामही पाहणार आहे.

## भरपाई वृक्ष लावताना

हे करताना नवीन रोप ही ६ ते ८ फुट ऊंचीचे असणे आवश्यक आहे. जेवढे रोप मोठे तेवढी त्याची जगण्याची शक्यता जास्त असते हे लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आला आहे. शक्य असेल तर त्याच ठिकाणी ही रोपे लावणे, जागा उपलब्ध नसल्यास सार्वजनिक जमिनीवर त्याची लागवड करणे, लावलेल्या वृक्षाचे जिओ टॅगिंग करून सात वर्षांपर्यंत त्याचे संगोपन करणे यामध्ये आवश्यक करण्यात आले आहे.

अनेकदा असे होते की, नुकसानभरपाई म्हणून वृक्षलागवड करणे शक्य नसते तेव्हा तोडल्या जाणाऱ्या वृक्षांच्या मूल्यांकनापेक्षा कमी नसेल एवढी रक्कम अर्जदाराकडून जमा करण्याची तरतूदही या धोरणात ठेवण्यात आली आहे.

## अन्य महत्त्वाच्या बाबी

पाच वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची २०० हून अधिक झाडे तोडण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठवणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाने झाडे तोडण्याची शिफारस केली तरी स्थानिक वृक्ष प्राधिकरण महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणास त्यांच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती करू शकतील.

भरपाई वृक्षांची संख्या निश्चित करताना प्रकल्पांचे लहान लहान भागात विभाजन केले जाणार नाही, याची काळजी स्थानिक प्राधिकरण घेणार आहे. या निर्णयामुळे पर्यावरणस्नेही विकासाला वेग येईलच, परंतु माणसाच्या जगण्याला बळ देणाऱ्या वृक्षांच्या अस्तित्वालाही नवसंजीवनी मिळेल.

## 'वृक्षांची जपणूक' संस्कृतीचा भाग

वृक्ष जतन आणि संवर्धनाचा संस्कार हा काही आताचा नाही. आपण जर बारकाईने आपल्याच संस्कारांकडे मागे वळून बघू तर आपले सगळे जीवनच निसर्गसान्निध्यात गुंफले गेल्याचे दिसते. आपण प्राणिमात्रांशी असलेली आपली मैत्री स्वीकारली आहे म्हणूनच आपल्याकडे नागपंचमीच्या दिवशी नागांची पूजा होते, तर पोळ्याला बैलांची.

आपण वडाची पुजा करतो तशीच आवळीचीही. वाघ, सिंह, मोर, गरुड अशा अनेक वन्यजीव आणि पशुपक्ष्यांचेही या निसर्गचक्रात वावरताना देवत्वाशी नातं जोडलेल आपण पाहतो.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' असे म्हणत संत तुकारामांनी वृक्षवेलींशी आपले असलेले नाते गहिरेपणाने सांगितले आहे, तर जो खांडावया घाव घाली, का लावणी जयाने केली, दोघा एकचि सावली, वृक्ष दे जैसा असे ज्ञानेश्वरीच्या एका ओवीत म्हटले आहे. म्हणजेच वृक्षलागवड, जतन आणि संवर्धनाचा वारसा आपल्यासाठी नवा नाही हे यावरून स्पष्ट होते. 'तू झाड लाव आणि सावली मात्र मला मिळू दे, तुम्ही झाडे लावा फळे मात्र आम्हाला मिळू दे' हा आपला संस्कार कधीही नव्हता. वृक्ष संस्कारांचा हा वारसा आपल्याला पूर्वजांकडून मिळाला आहे. त्यांना कुठे तेव्हा वाढते जागतिक तापमान, कार्बन फूटप्रिंटची वाढती संख्या, ओझोनचा पातळ होत जाणारा स्तर कळत होता तरीही त्यांनी किती सहजपणे पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश या पंचमहाभूतांचे महत्त्व आपल्याला समजून सांगितले. पंचमहाभूतांशी मैत्री करण्याचा सल्ला त्यांनीच दिला. पण आपण विकासाच्या मार्गावर हळूहळू पुढे जाताना आपल्या या संस्कारांची उजळणी करायला विसरलो आणि मग ग्लोबल वॉर्मिंग, वाढते जागतिक तापमानासारखे शब्द शब्दकोशातून बाहेर येऊन आपले परिणाम दाखवायला लागले. कुठे दुष्काळ, कुठे पूर, कुठे अतिवृष्टी कधी गारपीट तर कधी वादळे, हे का होत आहे याचा अभ्यास केला तर एकच कारण पुढे आले.... वाढते जागतिक तापमान !

## लोकचळवळीसाठी

मग यावर उपाययोजना सुरू झाल्या. दिनविशेष साजरे करण्याच्या निमित्ताने लोकांमध्ये पर्यावरण जनजागृती सुरू झाली. वृक्षलागवडीचे आणि संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले जाऊ लागले. 'जंहा वन है, वंहा जल है, जल है तो कल है', 'वन से धनतक, जंगल से जीवन के मंगलतक' अशा संकल्पनांच्या माध्यमातून जनांचे



वनांशी नाते जोडण्याचा प्रयत्न जोरकसपणे होऊ लागला. 'चाहते हो यदी जीवन बचाना, मत भुलो वृक्ष लगाना, मृत्यू का जब खुला तांडव मनुष्य के सामने आयेगा, क्यूं नही बचाये हमने वृक्ष, यह सोचकर मानव पछतायेगा', अशा अनेक संकल्पना लोकमनात रुजवत या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला.

## बरेच काही महत्त्वाचे

जेव्हा वाढत्या जागतिक तापमानाची चर्चा सुरू झाली तेव्हा करावयाच्या उपाययोजनात महाराष्ट्राने नेहमीच पहिले पाऊल टाकले, मग ते वृक्ष लागवड असो की, वन्यजीव संवर्धन... नक्षत्र वने उभी राहिली, रानमळा पॅटर्न ने आयुष्यातील घटना प्रसंगांच्या निमित्ताने राज्यभरात झाडे लागली, तर गडचिरोलीचे ग्लोरी ऑफ आल्लापल्ली, पुण्याचे गणेशखिंड, जळगावचे लांडोरी फॉरेस्ट, सिंधुदुर्गचे मायरिस्टिका स्वॅम्प, हिरण्यकेशीसारखी ठिकाणे जैवविविधता वारसा स्थळे म्हणून घोषित करण्यात आली. देवाचा मासा असो की, देवराया... याच्या जतन आणि संवर्धनाला वेग आला. अलीकडच्या काळात राबवलेले 'माझी वसुंधरा' अभियान हे याच संस्कारांना आणि कृतीला उजाळा देणारे आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळील खाण साईटचा लिलाव रद्द करणे, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या रेल्वे मार्गासाठी पर्यायी जागा शोधण्याची केलेली मागणी, ही त्याचीच उदाहरणे आहेत. सांगली जिल्ह्यातला ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष वाचवण्यासाठी घेतलेला पुढाकार आणि महामार्गाच्या कामात केलेला बदलही याच पर्यावरणस्नेही वाटेवरून पुढे जाताना बदललेला दृष्टिकोन स्पष्ट करतो.

कोल्हापूरची पंचगंगा, औरंगाबादची खाम, मुंबईतील मिठी नदी असेल किंवा विदर्भातील वैनगंगा या नद्यांचे पुनरूज्जीवन करून त्यांच्या स्वच्छतेची पावले पुढे पडताना दिसत आहेत. मुंबईसारख्या महानगराच्या हृदयस्थानी असलेल्या आरेचे ८०० एकरपेक्षा अधिकचे क्षेत्र राखीव वन म्हणून घोषित करणे, कांदळवनाला राखीव वनांचा दर्जा देणे, कन्हारगाव अभयारण्याची, दहा संवर्धन राखीव क्षेत्रांची घोषणा, सफेद चिपी या कांदळवन वृक्षाला राज्य कांदळवन वृक्षाचा दर्जा, कांदळवन उपजीविका योजना अशा एकामागून एक निर्णयांची शृंखला शासनाच्या विकासविषयक संकल्पनांना नवी दिशा देते.

या वर्षी संयुक्त राष्ट्र संघानेही नैसर्गिक परिसंस्थांचे पुनरूज्जीवन या मध्यवर्ती संकल्पनेवर काम करण्याचे घोषित केले आहे. जलस्रोत, पाणथळ, कांदळवने, नदीची उगमस्थाने किंवा जंगले या सर्वच ठिकाणी असलेल्या नैसर्गिक परिसंस्थांचे आहे त्या अवस्थेत जतन आणि संवर्धन करणे, अनेक जीवजंतू आणि प्रजातींची समृद्ध अशी अन्नसाखळी जपणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.

हेरिटेज ट्री अर्थात जुन्या आणि प्राचीन वृक्षांचे जतन करण्याचा निर्णय हा या सगळ्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

जनसंपर्क अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय

# पाऊल पडते पुढे

**कोरोना संकट अजून संपले नाही. त्यासाठीच्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. अतिवृष्टीने बाधित झालेल्या जिल्ह्यांमध्ये मदतीचे कार्य सुरू आहे. या अतिवृष्टीमुळे खूप मोठे नुकसान झाले आहे. सर्वसामान्यांना शासन योग्य ती मदत करत आहे. अशा परिस्थितीतही शासन मोठ्या जिद्दीने आणि धैर्याने सर्व संकटांवर मात करत पुढचे पाऊल ठामपणे टाकत आहे. शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय, प्रकल्पांचा शुभारंभ अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...**



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

## स्वच्छता अभियानाचे पुरस्कार

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा २०१७-१८ च्या राज्यस्तरीय स्पर्धेत विजेत्या ग्रामपंचायतींना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत २०१७-१८ अंतर्गत अवनखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक या ग्रामपंचायतीस प्रथम, लोणी बु. ता. राहता, जि. अहमदनगर या ग्रामपंचायतीस द्वितीय तर कुशेवाडा, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग या ग्रामपंचायतीस तृतीय क्रमांकाचा पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात आला. नाशिक येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अवनखेड ग्रामपंचायतीस पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## धरणग्रस्तांसाठीच्या घरांचे लोकार्पण

रत्नागिरी जिल्ह्यातील तिवरे धरण दुर्घटनाग्रस्तांसाठी चिपळूण तालुक्यातील अलोरे येथे सिद्धिविनायक न्यासाने दिलेल्या ५ कोटी रुपयांच्या निधीतून बांधलेल्या २४ घरांचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यातील उर्वरित धरणग्रस्तांनाही एक वर्षाच्या आत घरे देण्यासाठी लागणाऱ्या ७ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव व आराखडा तातडीने पाठवावा, हा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली.



ई-पीकपाहणी प्रकल्पाचा ऑनलाईन लोकार्पण सोहळा संपन्न.

## युवकांना मिळणार प्रशिक्षण

कोरोना परिस्थितीत आवश्यक असलेल्या हेल्थकेअर, नर्सिंग, पॅरामेडिकल यांसारख्या क्षेत्रामध्ये विविध ३६ अभ्यासक्रमांमधून येत्या तीन महिन्यात २० हजार इतके प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रमाचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

## प्रकल्पाचे लोकार्पण

येत्या काळात ई-पीकपाहणी मोबाईल ॲप शेतकऱ्यांना आपलेसे वाटेल, याबद्दल विश्वास वाटतो. राज्यभरात राबवला जाणारा ई-पीकपाहणी प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

स्वातंत्र्यदिनापासून महसूल आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीकपाहणी हा संयुक्त प्रकल्प राबवण्यात येत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथिगृह येथे ई-पीकपाहणी प्रकल्पाचे ऑनलाईन लोकार्पण इलेक्ट्रॉनिक कळ दाबून करण्यात आले. या

वेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषिमंत्री दादाजी भुसे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार, ऑनलाईन पद्धतीने कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, मुख्य सचिव सीताराम कुंटे आदी उपस्थित होते.

## प्रकल्पाबाबत कालबद्ध कार्यक्रम

पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळवणे, वैनगंगा-नळगंगा प्रकल्प असे जलसंपदा विभागाने हाती घेतलेले महत्त्वपूर्ण प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी विभागाने कालबद्ध कार्यक्रम राबवावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पासंदर्भात वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या बैठकीत दिले. या वेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, तर जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

## मुंबई आयलँडिंग प्रकल्पांना मान्यता

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राची भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेऊन वीजनिर्मिती तसेच वीजवहन अर्थात पारेषणचे प्रकल्प जलद गतीने मार्गी लावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत मुंबई आयलँडिंगच्या विविध प्रकल्पांना त्यांनी तत्वत: मान्यतादेखील दिली. या बैठकीस ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, मुख्य सचिव सीताराम कुंटे आदी उपस्थित होते.

## संभाव्य लाटेसाठी नियोजन

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा मुकाबला करताना वाढणारी गर्दी हे एक मोठे आव्हान आहे. या दृष्टीने धार्मिक, सामाजिक कार्यक्रम तसेच राजकीय कार्यक्रम, आंदोलने यामुळे विविध ठिकाणी होणारी गर्दी थांबवण्यासाठी केंद्र सरकारनेच आता देशपातळीवर एक व्यापक धोरण आणावे, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना केली आहे.

कोविडच्या दुसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी महाराष्ट्राने उचललेली ठोस पावले आणि तिसऱ्या संभाव्य लाटेसाठी नियोजन याची माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत दिली. केंद्र शासनाने देशातील सहा राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसमवेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची बैठक आयोजित केली होती.

## लहान मुलांसाठी कोविड काळजी केंद्र

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील आयटीपार्कमध्ये उभारण्यात आलेल्या लहान मुलांसाठीच्या कोविड काळजी केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. कोविडचा धोका टळलेला नाही हे लक्षात घेऊन एक जबाबदार नागरिक म्हणून वागा, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

पहिल्या लाटेच्या शेवटी सणवार आले होते, पण आता दुसरी लाट ओसरता ओसरता सण-उत्सवांची सुरुवात होते आहे. त्यात आपण गेल्या पंधरा दिवसांपासून निर्बंध शिथिल केले आहेत, पण ही मोकळीक आपले दैनंदिन पोटापाण्याचे व्यवसाय सुरू राहावेत, अर्थचक्र थांबू नये म्हणून आहे. तिसऱ्या संभाव्य लाटेत लहान मुलांना संसर्गाचा धोका जास्त असल्याने राज्य शासनाने त्यांच्यासाठी कोविड टास्क फोर्स स्थापन केला आहे, असे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले. या कार्यक्रमास, परिवहन मंत्री अनिल परब, आमदार संजय पोतनीस, महापौर किशोरी पेडणेकर आदींची उपस्थिती होती.

## उड्डाणपुलाचे लोकार्पण

घाटकोपर-मानखुर्द जोड मार्गावरील नवीन उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला झाला असून या उड्डाणपुलाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौर किशोरी पेडणेकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक, खासदार राहुल शेवाळे, खासदार मनोज कोटक, आमदार रईस शेख, आयुक्त इक्बाल सिंह चहल व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. येथील एम पूर्व विभागातील वीर जिजामाता भोसले मार्गावर हा उड्डाणपूल बांधण्यात आला असून, त्यामुळे परिसरातील रहदारी मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. हा उड्डाणपूल शिवाजी नगर जंक्शन ते मोहिते-पाटील जंक्शनपर्यंत २.९९ कि.मी. लांबीचा आहे. या उड्डाणपुलामुळे शिवाजी नगरजंक्शन, बैंगनवाडी जंक्शन, देवनार डंपिंग ग्राउंड, फायर ब्रिगेड व मोहिते पाटील हे परिसर वाहतूक कोंडीतून मुक्त होण्यास मदत होणार आहेत. त्याचबरोबर नवी मुंबई, पनवेल, पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांचा २५-३० मिनिटांचा वेळही वाचणार आहे.

## उपचार सुविधेमुळे रुग्णांना नवजीवन

लहान मुलांमध्ये आढळून येणाऱ्या ‘स्पायनल मस्क्युलर ट्रॉफी’ या दुर्मीळ आजारावरील महागडी उपचाराची सुविधा येथील नायर रुग्णालयात सुरू करण्यात आली आहे. यामुळे योग्य वेळी उपचार मिळाल्याने या मुलांना नवजीवन मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. या सुविधेसोबतच मुंबईत जिनोम सिक्वेंसिंग लॅबदेखील सुरू करण्यात आली असून कोरोनाविरुद्धच्या लढ्याला त्यामुळे बळ प्राप्त झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय आणि बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर रुग्णालयाच्या शतकोत्तर महोत्सवास मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यानिमित्त जिनोम सिक्वेंसिंग लॅब आणि स्पिनराझा औषधोपचार प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, आमदार श्रीमती यामिनी जाधव, उप महापौर ॲड. सुहास वाडकर, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता रवी राजा, महापालिका आयुक्त आय. एस. चहल, टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय

ओक, सदस्य डॉ. शशांक जोशी, बालरोग तज्ज्ञांच्या टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. सुहास प्रभू आदी मान्यवर उपस्थित होते.

## विविध उपक्रमांचा शुभारंभ

महाराष्ट्राला नैसर्गिक, ऐतिहासिक, पौराणिक, भौगोलिक असे विविधांगी पर्यटन वैभव लाभले आहे. राज्यात जंगले, पुरातन गडकिल्ले, गुंफा, मंदिरे, समुद्र किनारे, वन्यजीव असे पर्यटन वैविध्य असून हे जगभर पोहोचवण्यासाठी पर्यटन विभागाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. यातून देशातील आणि जगभरातील पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित होतील आणि त्याद्वारे राज्याचा पर्यटनविकास होऊन रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) विविध उपक्रमांचा मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात शुभारंभ करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री कु. आदिती तटकरे आदी मान्यवर उपस्थित होते. परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, खासदार विनायक राऊत यांच्यासह पुणे आणि रत्नागिरीचे जिल्हाधिकारी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

## इमारतीचे लोकार्पण

पालघर येथील नवीन सुसज्ज जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नवीन सुसज्ज इमारतीचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी संस्कृती व कला देशामध्ये प्रसिद्ध आहेत. वारली चित्रकला तर जागतिकस्तरावर पोहोचली आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आदिवासी संस्कृती व जिल्ह्यातील परंपरा यांचे जतन करून विकासकामे करावीत. नवीन इमारतीचा नावलौकिक वाढवावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. या वेळी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील (ऑनलाईन), महसूल मंत्री बाळासाहेब थोरात (ऑनलाईन), नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, महसूल व ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार, पालघर जिल्हा परिषद अध्यक्षा वैदही वाढाण, खासदार राजेंद्र गावीत, आमदार श्रीनिवास वनगा, सुनिल भुसारा, राजेश पाटील, विनोद निकोले, रविंद्र पाठक, मुख्य सचिव सीताराम कुंटे (ऑनलाईन), कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## कर्मचारी वसाहतींचे बांधकाम

राज्यातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या घरांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनातर्फे अनेक प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे, पिंपरी चिंचवड शहर तसेच पुणे जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या इमारतींचे बांधकाम, मनुष्यबळाची उपलब्धता व कायदा-सुव्यवस्थेचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला. मंजुरी मिळालेल्या राज्यातील सर्वच पोलीस ठाण्यांची व कर्मचारी वसाहतींची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. या संदर्भात अडचणी असल्यास त्या तातडीने मार्गी लावण्यात याव्यात, तसेच कोणत्याही परिस्थितीत राज्यातील कायदा-सुव्यवस्था कायम राखली जावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पुणे, पिंपरी-चिंचवड शहरांसह जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांचे बांधकाम व अन्य प्रश्नांसंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

## फलोत्पादन वाढीसाठी सकारात्मक

महाराष्ट्रातील फलोत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेतील उत्कृष्ट वाण उपलब्ध करणे, राज्यातील फलोत्पादन वाढीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, प्रत्येक जिल्ह्यात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण फळपीक विकसित करून त्याचं ब्रॅन्डिंग करणे, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या धर्तीवर फळपिकांच्या संशोधनासाठी स्वतंत्र संस्था उभी करून प्रत्येक जिल्ह्यात फळनिहाय शाखा निर्माण करणे आदी, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी केलेल्या सूचनांवर राज्य शासन सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृहात 'महाराष्ट्रातील फलोत्पादन क्षेत्र : वस्तुस्थिती, संधी आणि दिशा' या विषयावर बैठक झाली. या वेळी कृषिमंत्री दादाजी भुसे, फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे, फलोत्पादन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे आदींसह राज्यातील फलोत्पादन, कृषी निर्यात क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या वेळी राज्याच्या कृषी, फलोत्पादन विभागातर्फे राज्यातील फलोत्पादनाबाबत सादरीकरण करण्यात आले.

## पर्यटन विकासासाठी निधी

राज्यातील महाबळेश्वर, एकविरा देवस्थान, लोणार सरोवर, अष्टविनायक, कोकणातील समुद्रकिनारे आदी पर्यटनस्थळांच्या विकासासाठी २५० कोटी रुपयांचा तातडीने निधी वितरित करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. राज्यातील पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या दहा जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर जिल्हा पर्यटन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासही त्यांनी मान्यता दिली. जिल्ह्यातील पर्यटन

विकासात खासगी संस्थांना सहभागी करून घेण्यासाठी जिल्ह्यांमध्ये पर्यटन सोसायटी स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील पर्यटनविकासाच्या प्रकल्पांचा आढावा आणि पर्यटन वाढीला प्रोत्साहन देण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, पर्यटन राज्यमंत्री कु.आदिती तटकरे आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पूरबाधित व्यावसायिकांना कर्ज पुरवठा

राज्यातील पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूरग्रस्त भागातील बाधित दुकानदार, व्यवसायिक, टपरीधारकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने पात्र बाधितांना सरसकट ५० हजार रुपयांची मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यापूर्वीच घेतला आहे. त्याचबरोबर या बाधित व्यावसायिकांना पुन्हा उभे करण्यासाठी सामाजिक बांधिलकी राखत तेथील जिल्हा मध्यवर्ती बँकांनी पुढाकार घेतला असून ना-नफा तत्त्वावर अत्यंत कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा फायदा राज्यातील अतिवृष्टी व पूरबाधित दुकानदार, व्यापारी, टपरीधारकांना होणार असून त्यांना केवळ ५ ते ६ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध होणार आहे.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिति सभागृहात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सातारा, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, मदत व पुनर्वसन प्रधान सचिव असीम गुप्ता, सहकार विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनासकर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अजित देशमुख यांच्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकांचे चेअरमन, मुख्य कार्यकारी अधिकारी व्हिसीद्वारे उपस्थित होते.

## योजनेची कामे सुरू करावीत

दमणगंगा, एकदरे - गोदावरी राज्यस्तरीय नदीजोड योजनेची कामे त्वरित सुरू करावीत, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ व जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विधानसभा उपाध्यक्षांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या वेळी उपाध्यक्षांनी योजनेसंदर्भात क्षेत्रीय स्तरावरील तांत्रिक बाबींबद्दल काही महत्त्वाच्या उपाययोजना सुचवल्या. ज्यामुळे या प्रकल्पाची किंमत कमी होऊ शकेल, असे त्यांनी सांगितले. त्यासंदर्भात विभागाने प्रशासकीय मान्यता व इतर बाबींकरिता प्रस्ताव त्वरित सादर करावे, असे निर्देश मंत्री श्री. पाटील यांनी दिले. या प्रकल्पामुळे दुष्काळी भागातील पाणीप्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. तसेच सिंचनात वाढ होईल, असेही जलसंपदा मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.



**जयंत पाटील**
जलसंपदा मंत्री

## ई–पीक पाहणी प्रकल्प

शेतजमिनीच्या उताऱ्यांवर पिकांची नोंद करण्याची पद्धती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन, शेतजमिनीची प्रतवारी, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज लावणे शक्य होते. या पीक नोंदणीच्या आधारित शेतकऱ्यांना पीक कर्जही दिले जाते. मात्र दोन-तीन गावांमध्ये मिळून एकच तलाठी असल्याने पीक पाहणी अचूक नोंदवली जात नाही असा शेतकऱ्यांचा कायम आक्षेप होता, आता महसूल विभागाने आपल्या पिकाची रिअल टाईम नोंदणी करण्याची सुविधा थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महसूल विभागाने यासाठी स्वतंत्र ॲप्लिकेशन निर्मिती केली असल्याची माहिती महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

टाटा ट्रस्टच्या साहाय्याने या ॲप्लिकेशनची निर्मिती करण्यात आली आहे. या मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये शेतकरी पिकांची माहिती भरतील, तलाठी या पिकांच्या नोंदी तपासून घेतील. यामुळे पीक पेरणीची रिअल टाईम माहिती ॲप्लिकेशनमध्ये संकलित होणार आहे. तसेच ही माहिती संकलित होताना पारदर्शकता येणार आहे. पीक पाहणी नोंदणीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग वाढवल्यामुळे पीक विमा आणि पीक पाहणीचे दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ होईल. शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यातही यामुळे सुलभता येईल. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि मदत देणेही शक्य होईल, असेही श्री. थोरात यांनी सांगितले.

ई-पीक पाहणीमुळे राज्यातील पिकांचे अचूक क्षेत्र कळणार आहे, त्यामुळे राज्यातील आर्थिक पाहणी आणि कृषी



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

नियोजन करणे शक्य होणार आहे. ई-पीक नोंदणी प्रकल्प यापूर्वी प्रायोगिक तत्त्वावर २० तालुक्यांमध्ये राबवण्यात आला होता. त्याला मिळालेल्या यशानंतर हा राज्यभर राबवण्याचा निर्णय महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी घेतला. त्यासंदर्भात राज्य सरकारने शासन आदेश जारी केला आहे.

शिवाय ई-पीक पाहणी प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागीय जिल्हा स्तरीय आणि तालुकास्तरीय सनियंत्रण समित्या गठित करण्यात आल्या आहेत. याशिवाय पूर्ण वेळ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष संचालक भूमी अभिलेख, पुणे यांच्या नियंत्रणाखाली सुरू करण्यात आला आहे.

## उपकेंद्रासाठी भूखंड

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे मराठी भाषा भवन उभारण्याचा निर्णय झाल्यानंतर आता उपकेंद्र उभारणीस गती मिळणार आहे. नवी मुंबईतील ऐरोली येथे हे उपकेंद्र होणार असून त्यासाठी लागणारा भूखंड सिडकोच्या वतीने मराठी



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

भाषा विभागाला देण्यात आला. मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी यासंबंधीची कागदपत्रे स्वीकारली.

नवी मुंबईतील या उपकेंद्रात भाषा संचालनालय, विश्वकोष महामंडळाची कार्यालये असतील. याशिवाय भव्य सभागृह, बाल विभाग, ज्येष्ठ नागरिकांसाठी दालने असतील. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने ही वास्तू उभारली जाणार आहे. अतिशय सुंदर असे हे उपकेंद्र असेल. नवी मुंबईत एक सांस्कृतिक केंद्र म्हणून हे भवन दिमाखात उभे राहणार आहे. मराठी संस्कृती जतनाच्या कार्यात यामुळे भर पडेल, असा विश्वास श्री. देसाई यांनी व्यक्त केला. या वेळी सिडको, एमआयडीसी व मराठी भाषा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे

मराठा समाजाच्या जवळपास सर्व मागण्यांची पूर्तता होत आली असून मराठा उमेदवारांच्या शासन सेवेतील नियुक्त्यांबाबत शासन निर्णय काढण्यात आले आहेत. तसेच उर्वरित प्रलंबित विषयांना गती देण्याचे



**अशोक चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मराठा विद्यार्थ्यांसाठी १४ ठिकाणी वसतिगृहे तयार असून स्थानिक पालकमंत्र्यांच्या हस्ते लवकरच त्यांचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी दिली.

मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सह्याद्री अतिथिगृहात झाली. या वेळी उपसमितीचे सदस्य तथा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील हे प्रत्यक्ष तर नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यात २३ ठिकाणी वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी १४ ठिकाणी वसतिगृहासाठी इमारती तयार असून त्याचे लवकरच उद्घाटन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये मुंबई व मुंबई उपनगर, पुणे, सातारा, मिरज, कोल्हापूर, बीड, लातूर, अमरावती, नागपूर येथे प्रत्येकी एक आणि नाशिक व औरंगाबाद येथे प्रत्येकी दोन वसतिगृहांचा समावेश आहे.

उर्वरित ठिकाणी वसतिगृह सुरू करण्यासंदर्भात जागा उपलब्धतेसाठी महसूल मंत्री हे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याबरोबर बैठक घेणार आहेत, असेही श्री.चव्हाण यांनी सांगितले.

## मल्हार पुलाच्या पुनर्बांधणीसाठी निधी

कोकणात झालेल्या मुसळधार पावसामुळे कोसळलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली - कनेडी राज्य मार्गावरील नाटळ मल्हारी नदीवरील मल्हार पुलाची पुनर्बांधणी करण्यासाठी तातडीने ६ कोटी रुपये देण्यास सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी मंजुरी दिली आहे. हा पूल कोसळल्यामुळे कनेडी परिसरातील गावांचा संपर्क तुटला होता. त्यामुळे तातडीने या पुलाची पुनर्बांधणी सुरू करण्याचे निर्देश श्री. चव्हाण यांनी दिले आहेत.

## 'संवेदना' प्रकल्प

ग्रामीण भागातील मानसिक आरोग्यावर अधिक लक्ष देणे ही काळाची गरज असून आरोग्य विभागाच्या जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत मानसिक आरोग्याच्या समस्यांवर उपचारासोबतच जाणीवजागृतीवर भर दिला जाणार आहे. त्यासाठी 'एम्पॉवर' संस्थेच्या सहकार्यातून जालना जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प राबवण्यात येत



**राजेश टोपे**
सार्वजनिक आरोग्य व
कुटुंब कल्याण मंत्री

असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात एम्पॉवर या मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेमार्फत ग्रामीण मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात जाणीवजागृती, प्रशिक्षण आणि उपचारासाठीचा प्रायोगिक तत्त्वावर 'संवेदना' हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ आरोग्यमंत्री आणि जालन्याचे पालकमंत्री श्री. टोपे यांच्या हस्ते करण्यात आला.

## कामगारांच्या हक्कांचे संरक्षण

राज्याच्या विकासात कामगार महत्त्वाचा वाटा देत असतात. त्यामुळे राज्यातील संघटित आणि असंघटित क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगारांच्या हक्कांचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी असल्याचे कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते कामगार आयुक्तालय येथे कामगार आयुक्तालय स्थापनेच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून आयुक्तालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. या वेळी कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, तत्कालीन कामगार आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार सह आयुक्त शिरीन लोखंडे यांच्यासह कामगार आयुक्तालयाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास, कामगार मंत्री

## महामंडळ स्थापन करण्यास मान्यता

महाराष्ट्रात जवळपास साडेनऊ लाख यंत्रमाग आहेत, तर यंत्रमागाशी निगडित साडेचार लाख कामगार असून ते असंघटित कामगार म्हणून गणले जात असल्याने आजपर्यंत त्यांना कोणतेही लाभ मिळत नाही. अनेक वर्षांपासून यंत्रमाग कामगारांची यंत्रमाग कामगार महामंडळ व्हावे, अशी मागणी प्रलंबित होती. त्यानुसार यंत्रमाग कामगार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात येत असल्याची माहिती कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

मंत्रालयात राज्यातल्या यंत्रमाग मालक संघटना व कामगार संघटना तसेच वस्त्रोद्योगातील तज्ज्ञ मंडळींच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीसाठी कृषिमंत्री दादाजी भुसे, आमदार प्रणिती शिंदे, आमदार अनिल बाबर, प्रकाश आवाडे, सुभाष देशमुख, मुनीफ इस्माईल, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, मालेगाव, भिवंडी, सोलापूर, सांगली, इचलकरंजी येथील मालक संघटना व कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## किमान वेतनश्रेणी लागू

सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांच्या हितासंदर्भात चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी केलेली मागणी लक्षात घेऊन या संदर्भातील परिपत्रकात बदल करून या उद्योगातील कामगारांना नवीन किमान वेतन लागू करणारे परिपत्रक काढणे, तसेच कामगारांना २१ हजार रुपये किमान वेतन लागू करण्यासंदर्भात तत्त्वत: मान्यता देण्यात येत असल्याचे कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्रालयात कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्या दालनात सिमेंट उद्योगातील कामगारांना किमान वेतनवाढ देण्यासंदर्भातील परिपत्रकात दुरुस्ती करून कामगारांना किमान नवीन वेतनश्रेणी लागू करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

## अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला गती

येत्या २०२५ पर्यंत राज्यात १७ हजार ३६० मे.वॅ. वीजनिर्मिती नवीन आणि नित्यनूतनक्षम ऊर्जास्रोतांच्या माध्यमातून करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी राज्य शासन आश्वासक पावले उचलत आहे. त्या दृष्टिकोनातून नुकतेच तयार करण्यात आलेल्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० चा आढावा घेऊन त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करण्यात येतील, असे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले.



**डॉ. नितीन राऊत**
ऊर्जा मंत्री

महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महाऊर्जा) यांच्या संयुक्त विद्यमाने अपारंपरिक ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील विकासक व इतर भागधारकांसोबत एक दिवसीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ऊर्जामंत्री डॉ. राऊत बोलत होते. यापूर्वी अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०१५ करण्यात आले होते. परंतु अपारंपरिक ऊर्जास्रोतांद्वारे वीज निर्मितीला गती देण्यासाठी नवीन धोरण करणे गरजेचे असल्याने नवीन धोरण २०२० मध्ये तयार करण्यात आले. या चर्चासत्राद्वारे या घटकांना आपल्या अडचणी, समस्या सोडवण्यासाठी राज्य शासनाची कशा प्रकारे मदत होऊ शकेल, या सूचना मांडण्याची संधी असून त्यातील व्यवहार्य सूचनांचा विचार नवीन अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० मध्ये सुधारणा करण्यासाठी केला जाईल.

## म्हाडाच्या सदनिकांसाठी सोडत

म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत ८ हजार २०५ सदनिकांसाठी सोडत काढण्यात येणार आहे, अशी माहिती गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी मुंबईतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार

परिषदेत दिली. सोडतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन १४ ऑक्टोबर २०२१ रोजी सोडत काढण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

सोडतीमध्ये समाविष्ठ एकूण सदनिकांपैकी अत्यल्प उत्पन्न गटासाठी ७०%, अल्प उत्पन्न गटासाठी २७% (म्हणजेच ९७% अत्यल्प व अल्प गटासाठी) घरे उपलब्ध होतील. अर्जाची किंमत ५६० रुपये (मूळ किंमत ५०० + ६० जीएसटी = ५६०/- रुपये) असेल. अर्जासमवेत भरावयाची अनामत रक्कम अत्यल्प उत्पन्न गटासाठी ५ हजार रुपये, अल्प उत्पन्न गटासाठी १० हजार रुपये, मध्यम उत्पन्न गटासाठी १५ हजार रुपये, तर उच्च उत्पन्न गटासाठी २० हजार रुपये इतकी असेल.

प्रवर्गनिहाय उत्पन्न मर्यादा (मासिक) अत्यल्प उत्पन्न गटासाठी २५ हजार रुपयांपर्यंत, अल्प उत्पन्न गटासाठी २५ ते ५० हजार रुपयांपर्यंत, मध्यम उत्पन्न गटासाठी ५० हजार ते ७५ हजार रुपयांपर्यंत, तर उच्च उत्पन्न गटासाठी ७५ हजार रुपयांपेक्षा जास्त अशी असेल.

संपूर्ण सोडत पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी उच्चस्तरीय देखरेख समिती गठित असून त्यांच्या उपस्थितीत प्रक्रिया पूर्ण होणार आहे.सोडतीमध्ये अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम त्यांच्या खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने परतावा करण्यात येईल.

या योजनेतून उपलब्ध होणारी घरे ही ठाणे जिल्ह्यातील शिरढोण, खोणी, भंडार्ली, गोठेघर, मिरारोड येथे, पालघर जिल्ह्यातील विरार बोळींज व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे आहेत.

## पात्र लाभार्थींना सदनिका

नायगाव बीडीडी चाळीत १ जानेवारी २०२१ पर्यंत जे नागरिक राहत आहेत ते सर्व जण सदनिका मिळण्यास पात्र आहेत. त्यांना ५०० चौरस फुटांची सदनिका देण्यात येणार असून शासन कोणालाही बेघर करणार नाही, अशी ग्वाही गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिली. नायगाव बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पासंदर्भात गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड यांनी नायगाव येथील ललित कलाभवन येथे भेट दिली, त्या वेळी ते बोलत होते. नायगाव बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पाचे काम सुरू करण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून कोणीही प्रकल्पात अडथळा आणू नये, असे आवाहन डॉ.आव्हाड यांनी या वेळी केले.

बीडीडी चाळींचा पुनर्वसन प्रकल्प हा आशियातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प आहे. नायगाव बीडीडी चाळीमध्ये ४१ इमारती असून ३ हजार ३४४ सदनिकांची निर्मिती करण्यात येणार आहे.



**डॉ. जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

## 'प्री-फॅब' पद्धतीने घरांची पुनर्बांधणी

रायगड जिल्ह्यातील तळीये गावातील सर्व सातही वाड्यांमधील एकूण २६१ घरांची पुनर्बांधणी म्हाडाने विहित कालमर्यादेत 'प्री-फॅब' पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिले. तळीये गावाच्या पुनर्वसनासंदर्भात मंत्रालयात गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली व उद्योग राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती, त्या वेळी ते बोलत होते.

गृहनिर्माण मंत्री डॉ.आव्हाड म्हणाले, तळीये गावातील घरांच्या पुनर्बांधणीसाठी मदत व पुनर्वसन विभागाने म्हाडास जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच तेथे रस्ते, वीज, पाणी, शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मदत व पुनर्वसन विभागाने म्हाडास आवश्यक तो निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार म्हाडाने लेआऊट तयार करून त्याचा विकास एजन्सी म्हणून करावा. म्हाडाच्या कोकण मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी पुढील आठवड्यात तळीये येथे जाऊन जागेची पाहणी करावी, असे निर्देशही त्यांनी या वेळी दिले. या वेळी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, रायगडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी निधी चौधरी, म्हाडाच्या मुंबई मंडळाचे अध्यक्ष मुख्याधिकारी योगेश म्हसे, म्हाडाच्या कोकण मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. नितीन महाजन, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्याधिकारी अरुण डोंगरे, उपसचिव सुनील तुंबारे उपस्थित होते.

## सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण

राज्यातील भटक्या विमुक्तांचे स्वतंत्र लोकसंख्येवर आधारित सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण लवकरच करून या समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, खार जमीन विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

मंत्रालयातील परिषद सभागृह येथे भटके विमुक्त हक्क परिषदेच्या राज्यातील सदस्यांची बैठक इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. भटके विमुक्त जाति-जमातीचे अनेक प्रश्न आहेत त्यामध्ये या समाजाचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण घरोघरी जाऊन होणे गरजेचे आहे. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाकडून देशातील सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना निर्देशित केलेल्या सूचनांनुसार



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन,
मदत व पुनर्वसन मंत्री

घरोघरी जाऊन सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण होण्याबाबत राज्यांनी कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यासाठी इतर मागासवर्ग विभागाने कार्यवाही करून घ्यावी.

देशात राजस्थान व हरयाणा या राज्यांनी लोकसंख्येवर आधारित असे सर्वेक्षण केले आहे. याची माहिती विभागाने घेऊन या सर्वेक्षणासाठी लागणाऱ्या बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करून तसा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठवून या विभागाने निधी उपलब्ध करून घ्यावा, अशा सूचनाही श्री. वडेट्टीवार यांनी इतर मागास बहूजन कल्याण विभागाला दिल्या.

## सर्किट योजना

मुंबईसह महाराष्ट्रात अनेक किल्ले आणि सागरी किल्ले आहे. या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व असून या किल्ल्यांचे जतन, संवर्धन काळानुरूप होणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात किल्ल्यांच्या विकासासाठी पुरातत्त्व संचालनालयाने



**अमित देशमुख**
वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री

सर्किट योजना तयार करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिले. सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी मुंबईतील किल्ले, सागरी किल्ले, राज्य संग्रहालय आणि पुराभिलेख विभागाच्या योजनासंदर्भात मंत्रालयात आढावा घेतला.

## विकासकामांचा आढावा

श्रीक्षेत्र गणपतीपुळे विकास आराखड्यातील विकासकामे प्रशासकीय यंत्रणांनी समन्वय साधून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले. आराखड्यातील



**उदय सामंत**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

विकासकामांच्या प्रगतीबाबत श्री.सामंत यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मंत्रालयात आढावा बैठक घेतली. श्रीक्षेत्र गणपतीपुळे विकास आराखड्याला यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून आराखड्यातील विविध कामे प्रलंबित आहे. विकासकामे तातडीने पूर्ण करावे. विकासकामांना पूर्णत्वास नेण्याची प्रत्येकाची सांघिक जबाबदारी आहे. जनतेला पायाभूत सुविधा पुरवणे ही नैतिक जबाबदारी ओळखून प्रशासनाने काम करावे. येत्या जानेवारीपर्यंत विकास आराखड्यातील सर्व पायाभूत सुविधांची कामे, शैक्षणिक क्षेत्रातील कामे, पाणीपुरवठा, नळपाणी योजना, रस्ते विकास आणि व्यापारी संकुलाविषयी प्रलंबित कामांची प्रक्रिया राबवून प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही श्री.सामंत यांनी दिले.

## विद्यार्थ्यांना शुल्क सवलत

राज्यातील कृषी विद्यापीठांच्या अधीनस्थ शासकीय व अशासकीय सर्व महाविद्यालयांचे सर्व पदवी, पदव्युत्तर व आचार्य या अभ्यासक्रमाचे विविध शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या



**दादाजी भुसे**
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

अध्यक्षतेखाली कुलगुरूंची बैठक झाली. या बैठकीत कोरोना प्रादुर्भावामुळे राज्यातील अकृषी विद्यापीठाच्या धर्तीवर चारही कृषी विद्यापीठांनी शासकीय व खासगी कृषी महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शुल्क सवलत देण्याचा निर्णय कृषिमंत्री श्री. भुसे यांनी जाहीर केला. त्यामुळे राज्यातील ३८ शासकीय, १५१ विनाअनुदानित अशा एकूण १८९ महाविद्यालयातील ४५ हजार विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील, पालक यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असेल अशा विद्यार्थ्यांचे सुरू असलेले पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतच्या संपूर्ण शुल्कात सूट देण्याचा निर्णयही कृषिमंत्र्यांनी घेतला आहे.

## पीक कर्ज वाटपाला गती

राज्यात यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन बँकांनी पीक कर्ज वाटपाला गती द्यावी, असे निर्देश सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिले. पीक कर्ज वाटपासंदर्भात व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची दूरदृश्य



**बाळासाहेब पाटील**
सहकार व पणन मंत्री

प्रणालीद्वारे आढावा बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली. या वेळी सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, वरिष्ठ अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा अग्रणी अधिकारी, तसेच व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील जवळपास ६९ टक्के शेती खरीप पिकाखाली असल्याने या

हंगामासाठी उद्दिष्ट ठरवून दिल्यापेक्षा अधिकचे पीक कर्ज वाटप होणे गरजेचे आहे. जून अखेरपर्यंत ५० टक्क्यांपर्यंत पीक कर्ज वाटप झाले आहे. यामध्ये व्यापारी बँका आणि खासगी बँकांचे प्रमाण अतिशय कमी आहे. या बँकांनी पीक कर्ज वाटपाला गती द्यावी.

पीक कर्ज वाटपाचे प्रमाण कमी आहे अशा बँकांनी जुलै २०२१ अखेर अपेक्षित सुधारणा न केल्यास त्याबाबतचा अहवाल शासनाकडून केंद्र शासन आणि रिझर्व्ह बँकेला पाठवण्यात येईल, असे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

## 'महाराष्ट्र ग्रॅण्ड चॅलेंज' उपक्रम

कौशल्य विकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिनाचे औचित्य साधून 'महाराष्ट्र ग्रॅण्ड चॅलेंज' उपक्रमाचा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते आणि



**अस्लम शेख**
मत्स्यव्यवसाय मंत्री

मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. मत्स्यव्यवसाय विभागातील समस्या जाणून घेणे आणि त्यावर नावीन्यपूर्ण उपाय शोधणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मासे पकडणे, उत्पादन आणि मासे प्रक्रियेसंदर्भातील सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक बाबींच्या आकलनानंतर विविध समस्या, आवाहने समोर आली, जी स्टार्टअपच्या आधारे काही नवीन पद्धतीने सोडवली जाऊ शकतात. याच हेतूने मत्स्यव्यवसाय विभागाच्या मुख्य चार समस्या विधानांसाठी नावीन्यपूर्ण उपाय सुचवण्याकरिता आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात जगभरातील नवउद्योजक सहभागी होऊ शकतात. मोठ्या आकाराच्या फिशपॉन्डचे स्वयंचलितीकरण, मत्स्यपालन प्रणाली (आरएएस) आणि बायोफ्लॉक (बीएफ) तंत्रज्ञानाची पुनर्रचना, बोटी, हार्बर आणि जेट्टीसाठी अपारंपरिक ऊर्जेचा वापर, माशांच्या कचऱ्याचा प्रभावी उपयोग या प्रमुख ४ समस्या विधानांसाठी उपाय सुचवण्याकरिता हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याकरिता https://www.msins.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'वात्सल्य' उपक्रम

कोरोनामुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी आणि विधवा झालेल्या महिलांसाठी अमरावती जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर 'वात्सल्य' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये निराधार मुले आणि महिलांच्या पुनर्वसनासाठी विविध विभागांच्या योजनांची सांगड घालण्यात येणार आहे. त्याच धर्तीवर हा उपक्रम पुढील काळात राज्यभरात राबवण्याचा मानस आहे, असे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले. कोरोनामुळे महाराष्ट्रात विधवा झालेल्या महिलांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा व उपाययोजना याबाबत महिला व बालविकास मंत्री ॲड. ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती, त्या वेळी त्या बोलत होत्या. महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती इद्झेस कुंदन, सहसचिव शरद अहिरे, आयुक्त राहुल मोरे, उपायुक्त दिलीप हिवराळे, कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीचे निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांच्यासह महिलांसाठी काम करणाऱ्या राज्यभरातील सुमारे दीडशे स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कृती दलाचा विस्तार

कोविड प्रादुर्भावामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी स्थापित जिल्हास्तरीय कृती दलाच्या (टास्क



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

फोर्स) व्याप्तीमध्ये वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून यामध्ये कोविडमुळे एकल/विधवा झालेल्या महिलांचे योग्य पुनर्वसन करण्याच्या व त्यांचे न्याय्य हक्क अबाधित राखण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याबाबतचा समावेश करण्यात आला आहे. महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी याबाबत केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

## परदेश शिष्यवृत्ती योजना

राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थी संख्या ७५ वरून वाढवून २०० पर्यंत करण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असून, आणखी ५० जागांची वाढ याच वर्षीपासून करण्यात येईल. तसेच याच शैक्षणिक वर्षात त्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. परदेश शिष्यवृत्ती योजनेसंदर्भात विद्यार्थ्यांनी मागणी केलेल्या काही निकषात सुधारणा करण्यासंबंधी सह्याद्री अतिथिगृह येथे श्री.मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांसह विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## सफाई कर्मचारी आयोग कक्ष

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत 'सफाई कर्मचारी आयोग कक्ष' हे स्वतंत्र कार्यासन निर्माण करण्यात आले असून, याबाबतचा कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आला आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नी झालेल्या बैठकीत

सफाई कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले होते. या निर्देशांची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. या कार्यासनास अधिकारी-कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले.



**धनंजय मुंडे**
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

## मिठी नदी : स्वच्छता पायलट प्रकल्प

मिठी नदी स्वच्छता पायलट प्रकल्पाचे उद्घाटन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, एमएमआरडीएचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास आदी उपस्थित होते. एमएमआरडीए आणि मरीन डेब्रिज पार्टनरशिप यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पात नदीतील तरंगता कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण केले जाईल. याद्वारे नदीमार्गातून समुद्रात जाणारा प्लास्टिक आणि इतर तरंगता कचरा कमी केला जाणार आहे.

## मिनी फॉरेस्टचा शुभारंभ

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून वांद्रे येथील म्हाडा कार्यालय परिसरात मिनी फॉरेस्ट निर्माण केले जात आहे. वनमहोत्सवाच्या निमित्ताने या मिनी फॉरेस्टचा शुभारंभ श्री.ठाकरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.

राज्यातील प्रत्येक नागरिकाने आपण राहत असलेल्या परिसरात तसेच कार्यालयांनी परिसरात शक्य असेल त्या प्रमाणात वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन पर्यावरण मंत्री श्री. ठाकरे यांनी केले. 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत सर्व प्रकारची कार्यालये, गृहनिर्माण संस्थांच्या परिसरात निसर्ग उपवन (मिनी फॉरेस्ट) निर्माण करावे. तसेच 'मिशन ग्रीन मुंबई' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून या मिनी फॉरेस्टची निर्मिती करण्यात येत आहे.

## इलेक्ट्रिक वाहन धोरण

राज्यात पर्यावरणपूरक अशा इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरास मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येणार आहे. यासाठी वापरकर्ते आणि कंपन्यांना विविध प्रोत्साहने देणाऱ्या राज्याचे महत्त्वाकांक्षी असे इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ची पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत घोषणा केली. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणास मान्यता देण्यात आली आहे. २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रिक वाहनाचा असेल असे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले असल्याचे श्री. ठाकरे यांनी सांगितले.



**आदित्य ठाकरे**
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनाला उत्तेजन देऊन, विक्रीला गती देण्याच्या दृष्टीने अस्तित्वात असलेले इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे पुन:परीक्षण करून ते अद्ययावत करण्यासाठी अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे (कार्यदलाचे) गठन करण्यात आले होते. या समितीने हे धोरण तयार करून ते पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर केले. या धोरणास ४ जुलै २०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणात मागणी विषयक, चार्जिंग सुविधांची निर्मिती व उत्पादनक्षेत्र अशी ३ प्रकारची प्रोत्साहने प्रस्तावित आहेत. या व्यतिरिक्त बिगर-वित्तीय प्रोत्साहने व कौशल्य विकास उपक्रम प्रस्तावित आहेत, ज्या अन्वये महाराष्ट्र राज्य हे इलेक्ट्रिक वाहनासंबंधी देशात अग्रेसर होईल. मागणीविषयक प्रोत्साहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहन वृद्धीसाठी सर्वांगीण सापेक्ष विचार करण्यात आला आहे. भारत सरकारच्या फेम-२ प्रोत्साहनांव्यतिरिक्त विविध प्रोत्साहने देण्यात येतील.

**टीम लोकराज्य**

### मालमत्ता करात सूट

इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ नुसार पायाभूत चार्जिंग सुविधा निर्मितीसाठीचे प्रोत्साहनेनुसार इलेक्ट्रिक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना हे धोरण लागू असेपर्यंत त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याचा शासन निर्णय नगर विकास विभागाने २० ऑगस्ट २०२१ रोजी जारी केला आहे. या निर्णयानुसार स्वत:च्या इलेक्ट्रिक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रिक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात २ टक्के सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही, याची दक्षता मालमत्ता धारकाने घ्यावी. तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात ५ टक्के इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

# मंत्रिमंडळात ठरले

**राज्य मंत्रिमंडळाच्या १८ आणि ११ ऑगस्ट २०२१ रोजीच्या बैठकीत गृहनिर्माण, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विकास, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, जलसंपदा, महसूल आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..**



## नाममात्र मुद्रांक शुल्क

बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मूळ रहिवाशांना (सदनिकाधारकांना) देण्यात येणाऱ्या पुनर्वसन सदनिकेचे करारनामे, दस्तावर आकारावयाचे मुद्रांक शुल्क प्रतिसदनिका नाममात्र एक हजार रुपये याप्रमाणे आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे मुळ सदनिकाधारकांना दिलासा मिळेल, शिवाय बीडीडी चाळींच्या विकासालाही गती मिळणार आहे.

मुंबई विकास विभागामार्फत (बी.डी.डी.) १९२१-१९२५ च्या दरम्यान मुंबई येथील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक चाळ ही तळ + ३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी जवळपास ८० रहिवाशी गाळे आहेत. या चाळी जवळपास ९६ वर्षे जुन्या झालेल्या असून, मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने गृहनिर्माण विभागामार्फत ३० मार्च २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यात येणार असून, या पुनर्विकास प्रकल्पांमध्ये जवळपास १५,५८४ भाडेकरूंचे पुनर्वसन करणे नियोजित आहे.

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मूळ रहिवाशांना ५०० चौ.फुट चटई क्षेत्रफळाची सदनिका मालकी तत्त्वावर विनामूल्य वितरित करण्यात येणार आहे. बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास प्रकल्प आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम ठरण्याच्या दृष्टीने, मुंबईमधील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील एकूण २०७ बी.डी.डी. चाळीतील पात्र भाडेकरूंचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना मालकी हक्काने देण्यात येणाऱ्या पुनर्वसन सदनिकेसाठी आकारण्यात येणारे करारनामे/दस्तावरील मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले.

## दूध भूकटी आणि बटर महानंदला

लॉकडाऊनच्या काळातील उत्पादित दूध भुकटी आणि बटर महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) यांना वर्किंग स्टॉक म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

लॉकडाऊनमध्ये प्रतिदिन १० लाख लिटर दूध शेतकऱ्यांकडून घेऊन त्याचे रूपांतरण दूध भुकटीमध्ये करण्याची योजना राबवण्यात आली होती. या योजनेत ७ हजार ७६४ मे.टन दूध भुकटीचे उत्पादन झाले. यापैकी १५०० मे.टन दूध भुकटी डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजनेत



देण्यात आली असून उर्वरित ६ हजार २६४ मे.टन भुकटीपैकी ३०१७ मे.टन भुकटी एनसीडीएफआय पोर्टलवर विक्री करण्यात आली आहे. महानंदकडे आता या योजनेंतर्गत ३२४७ मे.टन इतकी भुकटी शिल्लक आहे. याशिवाय ४०४४ मे.टन देशी कुकिंग बटर पैकी ३५८५ मे.टन बटर विकण्यात आले असून ४५९ मे.टन बटर शिल्लक आहे. शिल्लक राहिलेली भुकटी व बटर हे महानंदास वर्किंग स्टॉक म्हणून व्यवसायासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कोविड सद्य:स्थिती

- कोविड साथरोग आटोक्यात आणण्यासाठी राज्याने केलेल्या आरोग्यविषयक उपाययोजना व नागरिकांचे सहकार्य याचा परिणाम म्हणून राज्यात दुसरी लाट नियंत्रणात आलेली आहे.
- **शून्य रुग्ण :** १८ ऑगस्ट २०२१ रोजी नंदुरबार जिल्ह्यात एकही कोविड सक्रिय रुग्ण नाही.
- **दहापेक्षा कमी रुग्ण :** राज्यातील धुळे,

## आदितीचे कौतुक

औरंगाबादला सातवी इयत्तेत शिकणाऱ्या आदिती दीपक जाधव या मुलीने राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तिला डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेतली रौप्य पदकाची २००० रुपयांची पारितोषिकांची रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीत जमा केली असून या संकटकाळात आपणही काही तरी मदत करावी या भावनेने 'खारीचा वाटा' उचलत असल्याचे मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात तिने म्हटले आहे.

आदितीने आपल्या मदतीचा धनादेश पालकमंत्री सुभाष देसाई यांच्याकडे नुकताच दिला होता. मुख्यमंत्र्यांना तिने लिहिलेले पत्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत वाचून दाखवण्यात आले. या वेळी सर्व मंत्र्यांनी तिचे कौतुक केले. पत्रात आदितीने म्हटले आहे की, नुकताच राज्यात महापूर येऊन गेला. या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आपली धडपड पाहिली. यातून आपले नेतृत्व आणखी उठून दिसले. जया अंगी मोठेपण तया यातना कठीण असे वाटले. खरच अवघड आहे हे सगळे, आपले काम पाहून वाटायचे, आपण यात खारीचा वाटा उचलला पाहिजे, पूरग्रस्तांना मदत केली पाहिजे. मला माहीत आहे मी लहान आहे, पण मला डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत मिळालेली बक्षिसाची रक्कम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी द्यावी वाटली आणि म्हणून मुख्यमंत्री साहाय्यता निधीत जमा करत आहे. आदितीने दिलेली मदत अनमोल असल्याचे सांगून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तिला खूप सारे आशीर्वाद दिले आहेत. तसेच तुम्ही बालमंडळीच या देशाचा भक्कम आधारस्तंभ असल्याचेही म्हटले आहे.

वाशिम, यवतमाळ, भंडारा, वर्धा, गोंदिया या सहा जिल्ह्यांत सक्रिय रुग्णसंख्या दहापेक्षाही कमी आहे.

- **शंभरपेक्षा कमी रुग्ण** : राज्यातील परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, बुलडाणा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यात सक्रिय रुग्णसंख्या १०० पेक्षा कमी आहे.
- सद्य:स्थितीत जास्त रुग्णसंख्या असलेले जिल्हे सातारा, सांगली, अहमदनगर, पुणे, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदुर्ग.
- राज्याचा साप्ताहिक सरासरी रुग्णबाधेचा दर २.४४ टक्के इतका आहे.
- राज्यात गत काही दिवसात कोल्हापूर, रत्नागिरी या शहरातील रुग्णवाढीचा दर हा चिंताजनक होता. तथापि, आजघडीला (१८ ऑगस्ट २०२१रोजी) दिलासादायक बाब म्हणजे या जिल्ह्यांचा साप्ताहिक सरासरी रुग्णवाढीचा दर २.४४ टक्के यापेक्षाही कमी आलेला आहे.

### १७ ऑगस्ट २०२१ अखेरची सक्रिय रुग्णसंख्या

- **आजपर्यंत बाधित झालेले एकूण रुग्ण** : ६४ लाख १ हजार २१३.
- **बरे झालेले रुग्ण** : ६२ लाख १ हजार १६८.
- **एकूण मृत्यू** : १ लाख ३५ हजार २५५
- **सक्रिय रुग्ण संख्या** : ६१ हजार ३०६.
- **रुग्ण बरे होण्याचा दर** : ९६.८७ टक्के.

## लसीकरण सद्य:स्थिती

- राज्यात आजघडीला पाच कोटी सात लाखांपेक्षा अधिक कोविड प्रतिबंधक डोस देण्यात आलेले आहेत.
- राज्यातील ४५ वयोगटावरील जवळपास ५० टक्के नागरिकांना किमान एक डोस देण्यात आलेला आहे. १८ ते ४४ वयोगटातील जवळपास २५ टक्के नागरिकांना किमान एक डोस देण्यात आलेला आहे. राज्यातील एक कोटी तेहतीस लाख सात हजार नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसीच्या दोन्ही मात्रा देण्यात आलेल्या आहेत हा देशातील उच्चांक आहे.
- १४ ऑगस्ट २०२१ रोजी राज्यात एकाच दिवशी नऊ लाख चौसष्ट हजार नागरिकांचे कोविड लसीकरण करण्यात आले आहे. हा देखील महाराष्ट्रातील उच्चांक आहे.
- राज्य नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत आर्थिक गतिविधींना चालना देण्याचाही प्रयत्न करत आहे. यासाठी 'ब्रेक द चेन'अंतर्गत काही निर्बंध शिथिल करण्यात आलेले आहेत.
- नजीकच्या काळात येणारे विविध सण व उत्सव लक्षात घेता गर्दी व्यवस्थापनासाठी नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच कोविड प्रतिबंधक उपाययोजना जसे मास्कचा वापर, हाताची स्वच्छता व सुरक्षित शारीरिक अंतराचे पालन करणे आवश्यक आहे. याचबरोबर जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण होऊन नागरिकांचा कोविड प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी नागरिकांनी भविष्यात देखील असेच सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह

केंद्र पुरस्कृत नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह योजनेत राज्य सरकारही सहभागी होणार आहे. राज्यात अशा पद्धतीने वसतिगृह चालवण्याचा निर्णय घेण्यात आला.

यापूर्वी ही योजना केंद्र आणि स्वयंसेवी संस्था यांच्या ७५:२५ अशा सहभागातून राबवण्यात येत होती. या योजनेच्या केंद्र शासनाच्या २२ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अंशत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी/वसतिगृहाची इमारत भाडे तत्वावर उपलब्ध करून अनुदान देण्याची सुधारित योजना राबवण्यात येणार आहे.

यात केंद्र : राज्य : स्वयंसेवी संस्था यांच्या हिश्श्याचे प्रमाण अनुक्रमे ६०:१५:२५ असे राहणार आहे. असे वसतिगृह योजना राबवण्यास इच्छुक संस्थेला त्यांच्या इमारत भाड्यापोटी वार्षिक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. वसतिगृह प्रवेश आणि त्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबत नियम, अटी-शर्ती या पूर्वीच्या योजनेप्रमाणेच राहतील.

## दुय्यम निबंधक, मुद्रांक निरीक्षकांची पदे

नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील सरळसेवेची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

विभागाच्या सेवाप्रवेश नियमानुसार, दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण ५०:५० करण्याचा तसेच दुय्यम निबंधक (श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) ही पदे नामनिर्देशनाने आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

## अनाथांचे आरक्षण धोरण

अनाथ मुलांना शिक्षण व नोकरीत एक टक्का आरक्षण देण्याच्या धोरणात बदल करून आता तिन्ही वर्गातील अनाथांना शिक्षण आणि नोकरीत तसेच आरक्षण देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

अनाथांचे 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन प्रवर्गात वर्गीकरण करून तिन्ही प्रवर्गातील अनाथ मुलांना शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

- अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून लागू करण्यात आलेल्या १ टक्का समांतर आरक्षणाऐवजी दिव्यांगांच्या धर्तीवर १ टक्का समांतर आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात आली.
- अनाथ आरक्षणासाठी पदांची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी एकूण पदसंख्येच्या १% इतकी लागू करण्यास मान्यता देण्यात आली.
- अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित केलेले वय, शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, किमान गुणवत्ता पात्रता इत्यादी निकष लागू करणार.
- अनाथ मुलांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती तर उच्च शिक्षणासाठी (पदवी व पदव्युत्तर) शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनाथ मुलांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती महिला व बालविकास विभागाच्या बाल न्याय निधीमधून करणार.

## सिंचनाचा लाभ

अमरावती जिल्ह्यातील राजुरा बृहत लघू पाटबंधारे योजनेंतील मौजे राजुरा (ता. चांदुर बाजार) येथील लघु पाटबंधारे धरणात पाणी आणणे व उजव्या कालव्याद्वारे सिंचन करण्याच्या प्रकल्पासाठीच्या १९३ कोटी ८१ लाख खर्चाच्या तरतुदीस मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.



प्रकल्पाद्वारे अमरावती जिल्ह्यातील ६ गावांतील एकूण १००० हे. क्षेत्रास सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. हा प्रकल्प राजुरा गावाजवळील राजुरा नाल्यावर प्रस्तावित असून खारपाण पट्ट्यातील योजना आहे. यामध्ये बेलोरा गावाजवळ काशी नदीवर वळण बंधारा बांधुन त्यातुन फिडर कालव्याद्वारे (पुरवठा कालवा) प्रस्तावित राजुरा बृहत लपा धरणात पाणी आणण्यात येणार आहे. तसेच त्यातून उजव्या कालव्याद्वारे सिंचन करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाची साठवण क्षमता ५.९८९ दलघमी इतकी आहे.

या योजनेस विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने २००८-०९ मध्ये ४४ कोटी ७९ लाख रुपयांच्या तरतुदीस मुळ प्रशासकीय मान्यता दिली होती. या प्रकल्पाचे २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित १९३.८१ कोटी रुपये इतक्या किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेची शिफारस राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिकने केली होती. त्याला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार खास बाब म्हणून या प्रकल्पाच्या खर्चाच्या तरतुदीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## अमृत महोत्सवानिमित्त कार्यक्रम

भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष राज्यभर १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत विविध कार्यक्रमांनी साजरे करण्यात येणार असून मंत्रिमंडळ बैठकीत त्याचे सादरीकरण करण्यात आले.

केंद्र शासनाने प्रत्येक राज्याचे राज्यगीत तयार करण्यात यावे, अशी सूचना केली आहे. त्याअनुषंगाने राज्य गिताची निर्मिती करण्यावर देखील चर्चा करण्यात आली. या सोहळ्यानिमित्त राज्यभर शिक्षण, सांस्कृतिक, पर्यटन, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, सहकार, कृषी व महिला व बालकल्याण इत्यादी विभागांतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. त्यामध्ये विद्यार्थी, नागरिक, विविध संस्था यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असेल.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला पुढील वर्षी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत राज्यभर विविध कार्यक्रम राबवून अमृतमहोत्सवी वर्षाचा सोहळा साजरा करणे अपेक्षित आहे. त्यासंदर्भात हे सादरीकरण करण्यात आले.

इंडिया ७५ या अंतर्गत विविध कार्यक्रम राबवावयाचे असून, स्वातंत्र्य लढा, संकल्प, संकल्पना, साध्य व कार्यवाही या बाबींवर आधारित कार्यक्रमाची आखणी करण्यात येईल. कार्यक्रमांची संकल्पना स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव याभोवती गुंफलेली असेल. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम, नावीन्यपूर्ण कल्पना, नवे संकल्प, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती आणि अंमलबजावणी या संकल्पनेवर कार्यक्रम आधारलेले असतील. स्वातंत्र्य चळवळीतील अज्ञात नायकांना आदरांजली वाहण्यासाठी त्यांचा इतिहास जतन करणे, त्यांच्या निवासस्थानी भेट देणे, संबंधित जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढ्यातील निगडित महत्त्वाची ठिकाणे, स्वातंत्र्य चळवळींशी संबंधित व्यक्तिमत्त्वे यांचा इतिहास जतन करणे, पथनाट्य, महानाट्य, चर्चासत्र, प्रदर्शन मेळावे, लोककलेचे सादरीकरण, हेरिटेज वॉक, सायकल वॉक या कार्यक्रमांचे लोकसहभागातून आयोजन करण्यात येईल.

**टीम लोकराज्य**

महाराष्ट्र शासन

# रोजगार हमी योजनेतून समृद्ध महाराष्ट्र

## मागेल त्याला/तिला काम, मागेल तेव्हा काम, मागेल तितके काम, पाहिजे ते काम, केलेल्या कामाचे दाम

- कामाची मागणी ग्रामसेवक/ग्रामरोजगार सेवक यांच्याकडे करायची व कामाच्या मागणीची पोहच घ्यायची.
- कामाची मागणी केल्यावर १५ दिवसात गावातच काम सुरु
- कामाच्या ठिकाणी हजेरीपट व रोजची हजेरी
- दर आठवड्याला मोजमाप
- दर १५ दिवसाला मजुरी

- मजुरी आपल्या बँक किंवा पोस्टाच्या खात्यावर जमा होते
- आपले जवळचे पोस्ट आता आपली जवळची बँक झाली आहे
- पोस्ट व बँकेत नवीन खाते झिरो बॅलन्स वर काढता येईल.
- या खात्यातील रक्कम देणे-घेणे हे व्यवहार आपल्याला गावातील
- पोस्टमन सोबत आणि शहरातील पोस्टात देखील करता येणार आहे.





### लक्षाधीश होण्यासाठी, वैयक्तिक लाभाची कामे

१) सिंचन विहीर
२) शेततळे
३) शोषखड्डा
४) बांधदुरुस्ती (भातखाचरं)
५) दगडी बांध
६) सिसिटी
७) व्हर्मी कंपोस्टिंग
८) नाडेप कंपोस्टिंग
९) फळबाग
१०) वृक्ष लागवड
११) रोपवाटिका
१२) वैयक्तिक वनजमीन पट्टयांचा विकास
१३) घरकुल
१४) शौचालय
१५) गोठा
१६) कुक्कुटपालन शेड

### गावाच्या समृद्धीसाठी सार्वजनिक लाभाची कामे

१) वनतळे
२) गावतलावे
३) ग्रामपंचायतसाठी विहीर
४) माती नालाबांध
५) जलाशयातील गाळ काढणे
६) भूमिगत बंधारा
७) बंधारे
८) वनबंधारे
९) सलग समतल चर
१०) कालव्याचे नुतनीकरण
११) रस्ता
१२) क्रीडांगण
१३) वृक्षरोपण
१४) वृक्ष लागवड
१५) वृक्ष संगोपन
१६) रोपवाटिका
१७) रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड
१८) पडिक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड
१९) सार्वजनिक वनजमीन पट्टयांचा विकास
२०) जंगलातील जाळरेषा

### कामाच्या ठिकाणी सुविधा

● सावली ● पिण्याचे पाणी ● पाळणाघर ● दर फलक
● प्राथमिक औषध उपचार पेटी ● नमुना खड्डा



- ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक किंवा ग्राम रोजगार सेवकाकडे नोंदणी करायची
- जॉब कार्ड मजूर कुटुंबाकडे ठेवायचे आहे
- नोंदणी केल्यावर जॉब कार्ड मिळते
- जॉब कार्ड साठी मजूर कुटुंबाला काहीही खर्च नाही
- केलेल्या कामाची किती मजूरी मिळाली ते कळते
- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, सदस्य, ग्रामसेवक व ग्राम रोजगार सेवक यांनी महिन्यातून दोनदा रोजगार दिवस भरवायचा आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री (महसूल)

श्री. संदिपान भुमरे
मा. मंत्री
(रोहयो व फलोत्पादन)

श्री. संजय बनसोडे
मा. राज्यमंत्री
(रोहयो, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

रोजगार हमी योजनेच्या कामासाठी जवळचे ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.
संकेतस्थळ : mahaegs.maharashtra.gov.in | विनामूल्य मदत वाहिनी क्र. (Toll Free Helpline) १८००२२३८३९

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे